वर्ष - २०१६

SAFETY FOR ALL
ALL FOR SAFETY

सुरक्षा अभियान

(Reg. No. MAH/MAR/23893/TC)

संपादक : डॉ. विलास ज. पवार

सुरक्षा अभियान

(REG. NO. MAH/MAR/23893/TC)

२०१६

-: संपादक :-

डॉ. विलास ज. पवार

प्रकाशक : ओम पब्लिकेशन

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२
दूरध्वनी क्रमांक - ०२२-२५३६४१४१

स्वागत मूल्य - १०/-

'सुरक्षा अभियान' एक चळवळ आहे. सुरक्षा या विषयात ज्यांना रस आहे, ज्यांना या क्षेत्रात काम करायचे आहे त्यांनी अवश्य संपर्क साधावा.

ओम पब्लिकेशने 'सुरक्षा अभियान' हा वार्षिक विशेषांक संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक
डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, ठाणे. फोन. - ०२२-२५३६४१४१
येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

अंतरंग

१	रस्ता सुरक्षा अभियान	- विकास पांडकर	५
२	रस्ता सुरक्षेचा इतिहास	- संजय ससाणे	११
३	अे बी एस ब्रेक बद्दल नवीन नियम	- संजय डोळे	१७
४	रस्ते सुरक्षा - एक वेगळा दुष्टीकोन	- हेमंत जगताप	१९
५	रस्ता सुरक्षा	- सुरेश गोविंद देहेरकर	२२
६	रस्त्यांवरील वाहतूक	- अरुण भालेराव	२४
७	रस्ता सुरक्षा - अपघात, रहदारी	- वसुधा गोसावी	२७
८	रस्ता अपघात - आपले कर्तव्य	- राजश्री रामचंद्र खरे	३१
९	रस्ते सुरक्षा - शुन्य अपघात	- चारुलता कुळकर्णी	३४
१०	रस्ते अपघात आणि माझी भूमिका	- विंद्या उजवणे पडवळ	३७
११	सुरक्षा कवच	- श्वेता स्वप्निल डाबरे	४०
१२	गती व गतीमानता	- कै. स. गो. बिवलकर	४२
१३	सूरक्षेची जाणीव	- डॉ. कृष्णकांत विनायक नाबर	४५
१४	रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात!	- सुरेश गोविंद देहेरकर	४८
१५	अती वेग अपघाताचे प्रमुख कारण	- कै. स. गो. बिवलकर	५३
१६	कुटुंबासमवेत प्रवास	- ॲड. महेश वाघोलीकर	५६
१७	रस्ता सुरक्षा - काळाची गरज	- ओमनी फीचर्स	५८
१८	रस्ते-सुरक्षा म्हणजे जीवन सुरक्षा	- सुनंदा सपकाळ	५९
१९	वेग	- रुपाली केळुसकर	६२
२०	रस्ता	- सरोज आपटे	६४
२१	वाहतूक	- घनश्याम शेंडगे	६७
२२	वाहनचालक परवाना कसा मिळवायचा ?	- केतकी सोनावणे	७०
२३	रस्त्यावर चालताना चिन्हांचा वापर अत्यावश्यक	- मेघना देसाई	७२

कविता

१	वाहतुकीचे नियम	- राजेश बा. अधटराव	८२
२	मार्ग व पायवाट	- सुरेश देहेरकर	८२
३	कायदा पुस्तकावर -सुरक्षा वाऱ्यावर	- र. सोनार	८३
४	कधी चांगले दिवस येणार...	- रमाकांत सोनार	८३
५	रस्त्याचे वास्तव	- सुनंदा सपकाळ	८४
६	वाहतुक-सुरक्षा	- गिरीजा पागनीस	८४

संपादकीय...

"कृती करायची हिच वेळ आहे"...

नवीन वर्षाचे स्वागत अनेक शुभेच्छा एकमेकांना देवून घेवून आपण करीत असतो. नवीन संकल्प आपण ठरल्याप्रमाणे करत असतो त्यातले किती संकल्प पूर्ण होतात हा प्रश्न वेगळाच आहे. प्रत्येक चांगली गोष्ट आपण मुहूर्त बघून करत असतो. किंबहुना मुहूर्त अगोदर शोधून नंतर कुठली तरी चांगली गोष्ट आपण करीत असतो. काही वेळेला खूप सारे संकल्प आणि खूप साऱ्या चांगल्या सवयी आपण लावून घेण्याचा संकल्प करीत असतो परंतु पुन्हा पुन्हा त्याच चूका आपण करत राहतो आणि चूका सुधारण्यासाठी मात्र आपण मुहूर्त शोधत असतो.

या वर्षी रस्ता सुरक्षा सप्ताहासाठी केंद्र सरकारने 'Time for action' अर्थात "हिच वेळ कृती करण्याची आहे" हे बोधवाक्य घोषित केले आहे. रस्ता सुरक्षा हा विषय खरेतर रस्त्यांशी संबंधित असलेल्या सगळ्यांचाच आहे त्यामुळे रस्ता सुरक्षा पालन हाच आपल्या नवीन वर्षासाठी संकल्प आहे असे ठरवून तो विचार तात्काळ आमलात आणायला हवा.

"कृती करण्याची हिच वेळ आहे" आणि हि कृती रस्ता सुरक्षेची चळवळ जनमानसांत पसरवण्याची हिच वेळ आहे. असा आपण निर्धार करायला हवा. दैनंदिन आयुष्यात आजूबाजूला अनेक गोष्टी घडतात त्यापैकी अनेक अपघात आपल्या आजूबाजूला होत असतात. जेव्हा अपघात आपल्या जवळच्या कोणाचा होतो तेव्हा गांर्भीय येतेच परंतु आपल्या जवळपास कोणाचाही अपघात होऊ नये यासाठी प्रयत्न करण्याचा विचार फार क्वचितच लोक गांभिर्याने घेतात. आज नक्कीच ती वेळ आली आहे अपघात होऊ नये यासाठी मी काय करू शकतो हे ठरविण्याची! रस्ता सुरक्षा हे कोणाचेही व्यक्तीगत काम नाही. तर ती एक सामाजिक आणि सर्वाची अटळ अशी जबाबदारी आहे आणि ती आपण सामर्थ्यपूर्वक बजावण्यास सक्षम आणि सशक्त असायला हवे.

रस्ता सुरक्षा चळवळीत सुरक्षा अभियानच्या साथीने तुम्ही आम्ही सर्व मिळून 'Safety for all, all for safety' हा मूलमंत्र जपूया! आणि 'Time for action' हे बोध वाक्य खऱ्या अर्थाने अंमलात आणूया!

With Best
Compliments From

Krish Cars Private Ltd.

Solitare Honda

C/o. Shakti Industrial & Comm. Business Centre,
Shakti Insulated Wires, Rajendra Nagar,
Dattapada Road, Borivali (E.) Mumbai - 400 066
Tel. : 67385555/5566/67385500

रस्ता सुरक्षा अभियान

विकास पांडकर
(प्रा. परि. अधि.)

चाकाचा शोध ही मानवी जीवनाच्या उत्कर्षाच्या पायरीवर इंजिनाच्या शोधाने कळस चढवून दळणवळणामध्ये क्रांती केली. सदर शोधामुळे प्रवासी वाहतूक व माल वाहतुकीमध्ये अग्रमुक्त बदल होऊन शेती, सेवा, उत्पादन अशा क्षेत्रांना चालना मिळाली.

त्याच बरोबर या फिरत्या यंत्राचे व्यसन लोकांना लावले व घराबाहेर पाऊला ऐवजी चाके पडू लागली परिणामतः रस्तेचा विकास उड्डाणपूल, सागरी सेतू निर्मितीतून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

अमेरिकेच्या विकासात / उभारणीत रस्ते बांधणीचे महत्व अमेरिकेचे अध्यक्ष श्री. एफ.टी. केनेडी यांच्या "**अमेरिकेतील रस्ते चांगले आहेत म्हणून अमेरिका विकसित आह**" या अभिप्रायाने इतिहासबध्द झाले आहे.

विकसित राष्ट्राचे अनुकरण करित विकसनशील देशातील मध्यमवर्गीयांच्या अर्थिक विकासामुळे वैयक्तिक वापराच्या वाहनाच्या खरेदीत अप्रमाणबध्द वाढझाली, परिणामता रस्त्यावरिल वाहतूकीची कोंडी, प्रदुषण, पार्कींगच्या समस्या या सोबत रस्ते अपघात व त्यांचे परिणाम यास प्रामुख्याने सर्व विकसनशील राष्ट्रांना सामोरे जावे लागत आहे.

या सर्व बाबींचा आढावा घेऊन भारतातील केंद्र शासनाने १९८८ पासून रस्ता सुरक्षा सप्ताह (जानेवारीचा पहिला सप्ताह) म्हणून आयोजित करणे सुरु केले. या वर्षी आपण २७ वा रस्ता सुरक्षा सप्ताह १० जानेवारी ते १६ जानेवारी या काळात आयोजित करित आहोत. महाराष्ट्र राज्य शासनाने गेले ३ वर्षापासून रस्ता सुरक्षा पंधरवड्याचा कालावधी जन जागृतीस्तव जाहिर केला आहे. सबब महाराष्ट्रात या कार्यक्रमाचे २४ जानेवारीपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. रस्ता सुरक्षा अभियानाचे दरवर्षी वेगवेगळ्या घोषवाक्यांनी आयोजन केले जाते.

रस्ता सुरक्षा कार्यक्रम राबवितांना प्रामुख्याने खालील बाबी राबवितात

१. वाहन चालकांच्या वर्तणूकीतील सुधारणा कौशल्यविकास

२. वाहनाची यांत्रिक सुस्थिती

३. रस्ते बांधणी कामाचे परिक्षण व त्यामधील सुधारणा

४. अपघात ग्रस्त व्यक्तीस प्रथमोपचार व हॉस्पिटलमध्ये पोचविण्यासाठी ॲम्बुलन्स सेवा पुरविणे व या ॲम्बुलन्ससाठी असलेली

गोल्डन अवर्सची तरतुद पाळण्यासाठी रस्त्यात प्राधान्य देणेविषयी जनजागृती करणे.

५. जनतेमध्ये सार्वजनिक सेवा वाहतुकीच्या वापराविषयी जागृती निर्माण करणे

६. शालेय मुलांमध्ये सुरक्षित रस्ता वाहतुक

संस्कृती (Safe Road Safety Culture) रूजविणे.

रस्ता सुरक्षा परिषद व समिती

रस्ता सुरक्षा सप्ताह दरम्यान मोटार वाहन विभागातर्फे देशभरात वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात. यामध्ये देशातील शासनकर्ता मंत्री,

शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी यांना सोबत घेऊन कार्यक्रम आयोजित केले जातात. यासाठी देशस्तरावरील मार्गदर्शक सुचना रस्ते व परिवहन, मंत्रालय राष्ट्रीय रस्ता सुरक्षा परिषद (National Road Safety Council) यांच्या निर्देशानुसार जाहिर करते. केंद्रीय परिवहनमंत्री या परिषदेचे अध्यक्ष असतात, तर विविध राज्याचे परिवहनमंत्री, संबंधीत विभागाचे केंद्रीय मंत्री व सचिव तसेच अशासकीय सदस्य या परिषदेचे सभासद आहेत.

प्रत्येक राज्यासाठी राज्यस्तरावरील रस्ता सुरक्षा परिषद असून राज्याचे परिवहन मंत्री त्यांचे अध्यक्ष असतात तर सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, शिक्षण, माहिती व प्रसारण इत्यादी विभागाचे मंत्री व सचिव त्यांचे सदस्य आहेत. राज्यात प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय रस्ता सुरक्षा परिषदेचे गठन करण्यात आले आहे.

मुंबई वगळुन इतर सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा समिती कार्यरत असून जिल्हास्तरीय सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, शिक्षण, पोलिस विभागाचे प्रमुख अधिकारी समितीचे सदस्य असुन परिवहन विभागाचे जिल्हा प्रमुख त्या त्या जिल्ह्याचे सदस्य सचिव असतात. ज्या जिल्ह्यात परिवहन सेवा आहे. त्या त्या विभागात परिवहन सेवेचे अधिकारी तसेच महाराष्ट्र मार्ग परिवहन सेवेचे विभाग स्तरावरील अधिकारी या समितीचे नामनिर्देशित सदस्य आहेत. याशिवाय स्थानिक स्तरावरील अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी व गरजेनुसार इतर विषयाशी संबंधित तज्ञ यांना निमंत्रित सदस्य म्हणून समितीच्या बैठकीला बोलविण्यात येते.

जागतिक आरोग्य संघटनेचा पुढाकार

रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीने जागतिक आरोग्य संघटनेनेही रस्ते अपघातात बळी पडणाऱ्या व्यक्तीची व जखमी व्यक्तीची मोठी संख्या विचारात घेऊन नोव्हेंबर महिन्याचा तिसरा रविवार हा दिवस रस्ते अपघातात मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या स्मरणाचा दिवस आयोजित करण्याचे धोरण स्विकारले आहे. तसेच ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिवस म्हणून आयोजित केला जातो. २००४ साठी ७ एप्रिल हा रस्ते वाहतूक अपघात निवारण आरोग्य दिन म्हणून आयोजित करण्यात आला होता.

जागतिक आरोग्य संघटनेने **सुयोग्य वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षित रस्ते, सुरक्षित वाहने, सुरक्षित चालक, रस्ते अपघात आकस्मित रुग्णसेवा'अशी** पंचशील तत्वे रस्ते अपघात शुन्याकडे नेण्यासाठी निश्चित केली आहेत.

सुयोग्य वाहतूक व्यवस्थापन

पुर्वी रस्त्यावर तुरळक वाहने होती. त्यावेळी वाहनाचा वेगही कमी होता. त्यामुळे अपघाताच्या व वाहतूक कोंडीच्या शक्यता कमी होत्या. जसजशी

वाहनाच्या वाहतूक नियोजनासाठी मनुष्यबळ व तंत्रज्ञानाची गरज भासू लागली त्यातून ट्रॅाफिक पोलिस, वाहतूक नियंत्रक दिवे यांचा उगम झाला. तथापी वाहनाची वाढती संख्या विचारात घेऊन सध्या वाहतुकीच्या गर्दीनुसार बदलात्या वेळेच्या लाईट्स तसेच अंमलबजावणीस्तव सीसीटीव्ही कॅमेरे कंट्रोल रुम अशा माध्यमाचा उपयोग करणे ही काळाची गरज आहे.

सुरक्षित रस्ते

रस्ते बांधताना ते चालकाच्या चुकांना माफी देणारे असतील अशाप्रकारे त्याची बांधणी करण्याचे सुचित केलेले आहे. रस्ता हा चालकास त्यावरिल परिस्थितीची पूर्व कल्पना देईल अशाप्रकारे सिग्नल व रोड मार्कींगने सज्य असावा. चुकुन चालक रस्ता सोडून कडेस जावू लागला तर त्याची जाणीव करुन देण्यासाठी रस्त्यावरिल बॉर्डर लाईनचे डिझाईन असावेत. त्यापलीकडे चालक रस्त्याकडेस गेला तर त्यास थोपऊन ठेवणारे बॅरीकेट जे वाहन आदळल्यासमुळे उत्पन्न होणारी ताकद शोषून वाहनातील व्यक्तींना कमीत कमी इजा होईल याची काळजी घेतील तसेच रस्ते हे पादचारी व हातगाड्या सारख्या इंजिन नसलेल्या वाहनासाठी सुविधा देणारे बांधकाम असावे जेणेकरुन पादचारी व वाहने यांचा संपर्क रस्त्यावर कमीत कमी यावा यासाठी पादचारी दिलेल्या सुविधेचा वापर करेल.

सुरक्षित वाहने

वाहनाची बांधणी ही वाहनातील चालक, प्रवासी यासोबत रस्त्यावरिल पादचाऱ्यांना सुद्धा सुरक्षित ठेवणारी असावी. यासाठीच वाहनाचे डिझाईन व वाहनातील सुविधामध्ये फायबर बंप्पर, सिट बेल्ट, लावल्यानंतर एअर बॅग उघडण्याची सुविधा, ए. बी. एस. ब्रेक इत्यादी सुविधा वाहनात पुरविण्यात येत आहेत.

सुरक्षित रस्ता वापरणारे - यामध्ये वाहनावरिल चालक, प्रवासी याबरोबरच रस्त्यावरिल पादचाऱ्याचा सुध्दा समावेश होतो. वाहनातील स्वतःच्या सुरक्षेसोबत पादचाऱ्यांनी सुध्दा स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आणि त्यास सहकार्याने करणे ही वाहन चालकाचे कर्तव्य आहे.

सुरक्षित चालक

रस्त्यावर वाहन चालविताना स्वतःबरोबर वाहनातील इतरांची काळजी घेणे तसेच रस्ता वापरणाऱ्या इतरांची उदा. पादचारी, अयांत्रिक वाहनाचा वापर करणाऱ्याची सुरक्षा वाहन चालकाने प्राधान्याने सांभाळणे अपेक्षित आहे. यासाठी वाहनाचा चालक वाहतूक नियम तंत्रज्ञान यासोबत रस्ता सर्वांसोबत वापरण्याची जाणीव चालकाला असावी.

यासाठी पुस्तकी ज्ञानासोबत, प्रात्यक्षिक व जुन्या चालकाच्या चुकांपासूनचा धडा अशा प्रकारे प्रशिक्षण चालकाने घेणे अपेक्षित आहे.

चालक हा वाहतूक क्षेत्रातील महत्वाचा घटक असल्याने त्याची शारीरिक व मानसिक स्वास्थ चांगले असावे तसेच बदलत्या काळासोबत रस्ते विकास व वाहनाचा तंत्रज्ञानातील बदलामुळे उजळणी अभ्यासक्रमाची जोड सुध्दा चालकाला द्यावी लागणार आहे.

रस्ते अपघात आकस्मित रुग्णसेवा

सर्व प्रकारची काळजी घेऊन अपघात झालाच तर जखमी व्यक्तीस गोल्डन ऑनरचा फायदा मिळण्यासाठी पुरेशी जलद व सुसज्य वैद्यकिय मदत मिळणे गरजेचे असते. यासाठी ॲक्सीटेंड ट्रामा केअरच्या अमंलबजाणीसाठी ॲम्बुलन्स, प्रशिक्षित पॅरामेडीकल स्टॉफ व ॲम्बुलन्स वाहतूकीस्तव प्राधान्य देण्याची जाणीव इतरामध्ये असणे महत्वाचे ठरते. राज्यात महाराष्ट्र शासनाने १०८ या दुरध्वनी क्रमांकावर तातडीची रुग्णवाहीका सेवा उपलब्ध

करुन दिली आहे.

रस्ते सुरक्षा जनजागरण अभियानांतर्गत कार्यक्रम

रस्ते सुरक्षेविषयी जनजागृती कार्यक्रमाची आखणी करताना तो विविध गटाचे वय, कर्तव्य, रस्त्यावरील वेळ, जबाबदारी इ. बाबींचा विचार करुन करावी लागेल.

शालेय विद्यार्थी

विद्यार्थी प्रामुख्याने पादचारी, सायकल चालक, बस प्रवासी या गटात मोडतात. या गटाचा खेळकर, खोडसाळपणा व बंधनमुक्त राहण्याचा कल असतो. परंतू विशिष्ट सुचनांना हा गट उत्तम प्रतिसाद देतो. या वयात रुजविलेले विचार पुढे आयुष्यभर मानवी मनावर बडगा ठेवतात. सबब या गटाकडे "CATCH THEM YOUNG" म्हणून पाहताना चित्रकला, वक्तृव स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी माध्यमाचा उपयोग करावा लागतो. मुलांचे घर ते शाळा या प्रवासाचा सुरक्षित प्रवासासाठी सर्वेक्षण व्हावे.

कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी

या गटामध्ये बंडखोरी, जोश, नाविन्याची आवड, धाडसीपणा असतो त्यामुळेच या वयात धोक्याची जाणीव वारंवार करुन देणेची गरज भासते. मुले वाहन चालविण्यासाठी ईर्षा, ऊर्मी घेत असावे. अपुरे तांत्रिक, कायद्याचे ज्ञान व कौशल्य असताना चुकीच्या फाजिल आत्मविश्वासामुळे या गटातील सदस्य अपघाताच्या सामोरे जातात हे टाळण्यासाठी पुरेसा वाहन चालविण्याचा अभ्यासक्रम समजावून घेऊन सुरक्षित वाहन चालविण्यासाठी बचावात्मक वाहन चालविण्याचे तंत्रज्ञान आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे. हे रुजविणे व राबविणे या गटासाठी महत्वाचे ठरते.

पादचाऱ्यांना जाणून घेऊन वाहनाचा थोडासासुध्दा धक्का धोका निर्माण करु शकतो हे जाणून त्यांना महत्व देणे ही बाब लक्षात ठेवून वाहन चालविण्याचे तंत्र विकसित करणे महत्वाचे ठरते.

नविन कंपनी अधिकारी

शिक्षण पुर्ण होऊन सुरवातीच्या दरमहा पाच आकडी ते सहा आकडी दरम्यान पगार घेणारी मंडळी नोकरीच्या पहिल्या दुसऱ्या वर्षात भारदस्त दुचाकी किंवा चारचाकी खरेदी करित असतात. नोकरीतील स्थान टिकविण्यास्तव उशीरापर्यंत काम करुन पुन्हा सकाळचे ईन कार्ड स्किप करण्यासाठी गाड्या दौडत असतात. वाहन चालविताना कामाचा विचार, नविन जोडीदाराचा विचार डोक्यात ठेवून एक हात व नजर फोनवर ठेऊन स्वतः वैयक्तिक वाहने चालविण्याचा धोका पत्करणारी मंडळी इतरांनाही धोका निर्माण

करतात. त्यांना कंपनीच्या रस्ता रस्ते सुरक्षा धोरणात जखडून ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे.

सर्वसाधारण नागरिक

दुचाकी, चारचाकी चालविताना स्वतःसोबत आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याची जाणीव या वर्गाला करुन देण्याची गरज निर्माण झाली आहे. यामधे चालकासोबत दुचाकीवरील दुसऱ्या व्यक्तीने हेल्मेट परिधान करणे, वाहनातील सर्वांनीसुध्दा (मागील सिट वरील) सिट बेल्ट परिधान करणे, सार्वजनिक वाहनाचा दैनंदिन कामाच्या प्रवासासाठी वापर करणे, स्कूल बस धोरणास प्राधान्य देणे इत्यादी बाबींचा यामधे समावेश होणे.

व्यावसायिक चालक

सर्व प्रकारच्या व्यावसायिक चालकांना रूल्स ॲन्ड रोड रेग्युलेशन सोबत व्यावसायिक कामाचे तास, थकवा, इतर चालाकाच्या चुका लक्षात घेऊन त्यास प्रतिसादर देणे, वाहनाच्या तांत्रिक

बाजुची माहिती असणे, कोणत्याही मद्यार्कापासून दुर असणे या बाबीबाबत जागरुकता ठेवणे आवश्यक ठरते.

ड्रायव्हींग स्कूल

प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमधील पायाभुत सुविधा प्रशिक्षकाचे ज्ञान, वाहन प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम राबविण्याची पध्दती व विद्यार्थ्यांचे ज्ञान व कौशल्याची पडताळणी करण्याची पध्दत या बाबी प्रशिक्षण संस्थांच्या दृष्टीने महत्वाच्या ठरतात. रस्त्यावरील वाढती गर्दी विचारात घेऊन जिमखाना/स्विमिंग ट्रक व क्रिडा केंद्राच्या धर्तीवर प्राथमिक ड्रायव्हिंग प्रशिक्षणासाठी सामूहीक ड्रायव्हींग ट्रक निर्माण करणे ही काळाची गरज झाली आहे.

वाहन वितरक

वाहन हे एक मशीन आहे. कोणताही वाहन वितरक, मशीन विक्रेता आपली मशीन नक्की कशी वापरायची आहे याचे प्रात्यक्षिक जागेवर (On the site) मशीनच्या वापर करण्यास देत असतो. तसे वाहन वितरकाकडे प्रत्येक वाहनाच्या खुले वाहन विकत घेणाऱ्या ग्राहकास समजावून देणे गरजेचे आहे. तसेच या ग्राहकास वाहन सोपविण्यापूर्वी त्याचा सुरक्षित वापर करण्याची त्यास माहिती आहे, याची खातरजमा करणे आवश्यक आहे. या बाबींची पूर्तता होण्यासाठी उजळणी प्रशिक्षण अभ्यासक्रम वितरकाकडे राबविणे आज गरजेचे झाले आहे.

पायाभुत सुविधांचा विकास

यामध्ये नगररचना मुख्य रस्त्यापासून पार्कींगच्या जागा, सर्व्हीस रोड, वाहतूक नियत्रंणासाठीची योजना, पादचारी सुविधा, पावसाळी पाणी निचरा व्यवस्था इत्यादी बाबींचा समावेश होतो. आतापर्यंतचे वाहनाला प्राधान्य देण्याचे धोरण बदलून आंतरराष्ट्रीय स्तरावर अवलंबलेले पादचारी व NMT ला प्राधान्य देण्याचे धोरण देशभरात राबविण्याची गरज आहे.

तरी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन **"रस्ते अपघात शुन्याकडे!"** या उदिष्टाची पुर्तता होण्यास वेळ लागणार नाही.

With Best Compliments From

M/S Prabhat Construction

With Best Compliments From

Mokhada Tal Mokhada

Palghar

रस्ता सुरक्षा

संजय ससाणे
(उप. प्रा. परि. अधिकारी)

जगामध्ये भारत देशातील रस्त्यांवरील अपघाताची स्थिती अत्यंत गंभीर आहे. भारतात मागील दहा वर्षात सुमारे रस्त्यावरील अपघातात १० लाखापेक्षा जास्त लोक अपघातात मरण पावलेले आहेत. ५.३ दशलक्षांपेक्षा जास्त माणसे विकलांग झालेली आहेत. झगातील एकूण वाहन संखेच्या ३ टक्के वाहन संख्या भारतात आहे परंतू अपघातात मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या अंदाजे १०% आहे. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने भारतामध्ये रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी होण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने सुचविलेल्या उपाय योजनांमध्ये

१ मोटार सायकल स्वारांना हेल्मेट घालणे अनिवार्य करणे.

२ अतिवेगाने वाहन चालविणा-या चालकाविरुध्द कडक कारवाई करणे.

३ रस्त्याच्या कडेस सुरक्षा कठडे उभारणे इ.

४ डोक्यास मार बसलेल्या अपघातग्रस्तांसाठी रुग्णालयाची साखळी उभारणे

जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या प्रयत्नानुसार भारतातील तामिळनाडू, केरळ राज्यांनी रस्ता सुरक्षिततेच्या बाबतीत विशेष कार्य केले आहे. तामिळनाडू राज्याने रस्त्यावरील अपघाताच्या संभाव्य ठिकाणी जी आय एस प्रणाली उपलब्ध करुन दिलेली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या निरिक्षणानुसार वाहनांच्या अपघातांत अतिवेगाने वाहन चालविल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून वाहन समोरील वाहनावर/वस्तूव धडकणे याचे प्रमाण जास्त आहे. तसेच रस्त्यावरील वाहतूक चिन्हांच्या नियमांची माहिती नसणे हे ही एक कारण आहे. या साठी मोठया प्रमाणात लोकांना प्रबोधन करण्याची जरुरी आहे. या साठी शासनाबरोबरच शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, खाजगी क्षेत्रातील कंपनी इ. यांच्या सहकार्य व सहभागामुळे हे साध्य होईल.

आता आपण या विविध उपाय योजनापैकी काही उपाययोजना का व केव्हापासून लागू करण्यात आल्या याची माहिती घेऊया.

१. लायसन्स २. वाहन नोंदणी पध्दती ३. हेल्मेट ४. सिट बेल्ट ५. अपघात ग्रस्तांसाठी वैदकिय मदतीबाबत.

अनुज्ञप्ती/ लायसन्स

मोटार वाहनाची पहिली अनुज्ञप्ती /लायसन्स-सन १८८८ मध्ये कार बेन्झ या मोटार वाहन उत्पादकास त्याची मोटार वॅगन चालविण्यासाठी

ग्रॅड डुकेट यांज कडून परवाना घ्यावा लागला तद्नतंर इंग्लड मध्ये १९०३ मध्ये मोटार वाहन कायदा अस्तीत्वात आला आणि वाहन



चालविण्यासाठी अनुज्ञप्ती काढणे ऐच्छिक करण्यात आले. प्रशियाच्या बादशहाने दि २९.०९.१९०३ रोजी वाहन चालविण्यासाठी अनुज्ञप्ती धारण करणे अनिवार्य केले. सदर लायसन्स साठी अर्जदाराची तांत्रिक चाचणी घेण्यात येत असे. सन १९१० मध्ये जर्मन साम्राज्यात वाहन चालविण्यासाठी अनुज्ञप्ती धारण करणे ऐच्छिक करण्यात आले.

भारतामध्ये १९१४ पासून वेगवेगळ्या ब्रिटीश प्रातांत वेगवेगळे मोटार वाहन कायदे अस्तित्वात होते. भारतामध्ये १.०४.१९३९ रोजी मोटार वाहन कायदा १९३९ अस्तित्वात आला सदर कायदयातील तरतूदीनुसार वाहन चालकाकडे अनुज्ञप्ती /लायसन्स असल्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी वाहन चालविता येणार नाही. लायसन्स साठी खाजगी वाहनासाठी आयुमर्यादा १८ वर्षे पुर्ण तर परिवहन संवर्गातिल वाहनांसाठी २० वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. वाहन चालविण्यासाठी चालकास रस्त्यावरील चिन्हांची माहीती असणे तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मधील विविध तरतूदींची माहिति असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मोटार वाहन कायदयातील ठरवून दिलेल्या तरतूदीप्रमाणे वाहनांची वेगमर्यादा पाळणे आवश्यक आहे.

वाहन नोंदणी

सन १९०१ मध्ये मोटार वाहनाची नोंदणी करणे न्युयॉर्क मध्ये अनिवार्य करण्यात आले त्यावेळी नोंदणी क्रमांक प्लेट वाहन मालक स्वतः बनवित असत पण नंतर सन १९०३ मध्ये अमेरिकन शासनातर्फे पहिली नंबरप्लेट देण्यात आली

भारतामध्ये सन १९१४ ते १९३९ पर्यंत फक्त एकच आद्याक्षर व चार अंकी क्रमांक देण्यात आला. सन १९३९ ते १९४७ पर्यंत दोन आद्याक्षरे व चार अंकी क्रमांक देण्यात आले. सन १९४७ ते ३०.०६.१९८९ पर्यंत राज्याच्या कोड प्रमाणे क्रमांक देण्यात आले व दि ०१/०७/१९८९ पासून सद्यस्थितीतील नोंदणी क्रमांक देण्याची पध्दत लागू करण्यात आली.

जसे सार्वजनिक ठिकाणी वाहन चालविण्यासाठी अनुज्ञाप्ती काढणे गरजेचे आहे. तसे वाहन सार्वजनिक ठिकाणी चालविण्यापूर्वी वाहनांची नोंदणी होणे आवश्यक आहे. वाहनाच्या

उपयोगानुसार वाहनांचे खाजगी वाहन व परिवहन वाहने असे वर्गीकरण केले जाते. खाजगी संवर्गातील वाहनांची आयुमर्यादा वाहनाच्या योग्यता प्रमाणपत्रानुसार ठरविण्यात येते. खाजगी वाहनांसाठी पांढ-या रंगाच्या पार्श्वभूमीवर काळ्या अक्षरांत अणि परिवहन संवर्गातील वाहनांना

पिवळया रंगाच्या पार्श्वभूमीवर काळया अक्षरांत नोंदणी क्रमांक देण्यात येतो.

वाहन चालवितांना वाहनाची कागदपत्रे जसे नोंदणी प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, पीयुसी प्रमाणपत्र व चालकाचे लायसन्स इ. कागदपत्रे तर परिवहन वाहनांबाबत उपरोक्त कागदपत्रांशिवाय योग्यता प्रमाण व परवाना इ. कागदपत्रे ठेवावी लागतात.

रस्त्यावर अपघात झाल्यास अपघाताच्या वेळेस उपरोक्त नमूद कागदपत्रे वैध असणे आवश्यक आहे.

मोटार सायकल हेल्मेट (शिरस्त्राण)-

सध्या रस्त्यावर धावत असलेल्या अदयावत कार्स मधे हवेच्या पिशवीची (एअर बॅग्ज) ची सोय केलेली असते. पण मोटारसायकल बाबत हे शक्य



नाही. त्यामुळे डोक्यास गंभीर इजा होऊ नये यासाठी मोटार सायकल चालकाने हेल्मेट घालणे अनिवार्य आहे.

दुचाकी वाहनांवरुन प्रवास करतांना दुस-या वाहनासोबत अपघात झाला किंवा दुचाकी वरुन चालक किंवा मागिल प्रवासी जमिनीवर किंवा इतर वाहनांवर / वस्तूवर आदळला तर त्याचे डोके आघातापासून वाचून मेंदू सुरक्षित रहावा या साठी हेल्मेट चा उपयोग केला जातो.

हेल्मेटचा वापर केल्यास डोक्याच्या इजा ६९ टक्के कमी होतात तर मृत्यूची शक्यता ४३ टक्क्यानी कमी होते.

१९१४ मध्ये इंग्लडमधील ब्रुकलेंड येथील मोटारसायकल टॅकवर दर दोन आठवडयास एका व्यक्तीचा मृत्यू डोक्याला मार लागल्यामुळे होतो, असे वैदयकिय चिकित्सक डॉ. इरिक गार्डनर यांच्या लक्षांत आले. त्यांनी कॅनव्हॉस व जाड पत्र्याच्या कव्हर यांच्या पासून बनविलेला हेल्मेट रेससाठी वापरण्याचे आवाहन केले त्यानंतर मात्र डोक्याला मार लागून मृत्यू होण्याचे थांबले.

अचानक रस्त्यामध्ये आडव्या आलेल्या दोन सायकल स्वारांना वाचविण्यासाठीच्या प्रयत्नांत तोल गमावलेल्या टी.ई.लॉरेन्स (अरबिया) यांचा वारहेन या शहराजवळ मे १९३४ मध्ये मृत्यू झाला त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. हुम कैरन



(न्युरोसर्जन) यांनी सादर केलेल्या संशोधनानंतर हॅल्मेटचा वापर आर्मी व खाजगी दुचाकी धारकांकडून वाढला.

मोटार सायकल चालवितांना रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी व्हावे आणि हेल्मेटचा वापर करण्यासाठी जनतेस प्रोत्साहीत करावे म्हणून अमेरिकन सरकारने मोटार सायकली मुळे अपघातातील प्रमाण कमी व्हावे यासाठी सन १९६० मध्ये हायवे सेफ्टी ऍक्ट पास केला. मोटार सायकलस्वारांचे शिरस्त्राणाचे मानांकन ठरविण्यात आले. भारतात चालक व सहप्रवासी दोघांनीही

हेल्मेट घालणे अनिवार्य असून वाहन विकतांना विक्रेत्याने किमान १ हेल्मेट वाहना सोबत देणे बंधनकारक आहे. हेल्मेट धारण न करणारी व्यक्ती रस्त्यावर आढळल्यास त्यास दंडाच्या शिक्षेशिवाय हेल्मेट न वापरल्या बद्दल दुष्परिणाम समुपदेशन वर्गास उपस्थित राहाणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सिल्टबेल्ट -

मोटार वाहन चालवितांना वाहनाची गती रोखण्यासाठी अचानकपणे ब्रेक मारावे लागतात किंवा अपघातप्रसंगी वाहनाचा वेग क्षणात ८०/९०किमी पासून शुन्यावर येतो. अशावेळी वाहनामधून प्रवास करणा-यांना समोरच्या काचेवर आदळण्यापासून अटकाव व्हावा या उद्देशाने सिटबेल्ट लावणे अनिवार्य करण्यात आले. रस्त्यावर अपघाताच्या वेळेस अचानकपणे वाहन थांबल्यामुळे पुढील आसनांवरील व्यक्तीचे डोके समोरील बाजूस जोराने आपटून गंभीर इजा होण्याची कदाचित मृत्यू पावण्याची शक्यता असते मागिल सीट वरुन प्रवास करणा-या व्यक्तीसुध्दा वाहनास अचानक ब्रेक लावल्यास पुढे फेकल्या जाऊन त्यांना डोके व तोंडास इजा होण्याची शक्यता असते म्हणून मागील सिटला सुध्दा नंतरच्या काळात सिटबेल्ट देण्यात आले आहेत. सिटबेल्टमुळे रस्त्यावरील अपघातात गंभीर इजा न झाल्यामुळे मृत्यू पावणा-यांचे प्रमाण कमी होऊन दरवर्षी १० हजारपेक्षा जास्त लोकांचे प्राण वाचले आहेत असे अमेरिकेतील National Highway Traffic Safety Administration (NHTSA) या संस्थेने केलेल्या अपघाताच्या सर्वेक्षणावरुन आढळून आले आहे.

भारतामध्ये दि. २५/०३/१९९४ नंतर उत्पादित झालेल्या मोटार वाहनांमध्ये प्रथमतः पुढील आसनांसाठी सिटबेल्ट देण्यात आले . सन २००२ मध्ये सदर नियमामध्ये दुरुस्ती करण्यात येऊन मागील आसनांना सुध्दा सिटबेल्ट देण्यात आले.चालकाने सिट बेल्ट न वापरल्यास त्यास रस्तासुरक्षा समुपदेशनास प्रादेशिक परिवहन कार्यालय किंवा समुपदेशन देणा-या मान्यताप्राप्त संस्थेत उपस्थित राहून समुपदेशन घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

मद्यपान करुन वाहन चालविणेवर बंदी-

मद्यपानामुळे मनुष्य मेंदुवरील स्वतःचा ताबा गमावतो. मद्यपान करुन मोटार चालविण्या संबंधातील पहिल्या गुन्हयाची नोंद लंडन मध्ये १०/०९/१९८९ मध्ये झाली टॅक्सी ड्रायव्हर जॉर्ज स्मिथ यांस दारु पिऊन वाहन चालविण्यामुळे

अटक करण्यात आली मद्यपान करुन वाहन चालविल्यामुळे होणा-या अपघातांच्या घटनांस आळा घालावा म्हणून जागतिक स्तरावर प्रयत्न करण्यात आले अमेरिकेत सन १९१० मध्यं पहिला कायदा अस्तीत्वात आला नंतर सन १९३६ मध्ये डॉ. रौसा हॅर्गर याने ड्रकोमीटर (मदयाचे प्रमाण मोजणारे यंत्र) तयार केले पुढे १९५३ मध्ये रॉबर्ट बोर्केस्टीन यांने मद्यपानानंतरच्या श्वासांचे विश्लेषण करणरे यंत्र बनविले. तसेच सन १९८० मध्ये कॅलिफोर्निया येथे मद्यपान करुन वाहन चालविणा-या चालकाने दिलेल्या धडकेने तेरा वर्षाची मुलगी

अरी हिचा मृत्यू झाल्यामुळे तिची आर्द कॅंडी वाईटनर हीने Mothers Against Drunkn Drivers (MADD) ही संस्था स्थापन केली ही संस्था मद्यपान करुन वाहन चालविणा-या चालकाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यास व अपघातग्रस्त व्यक्तीना कायदयाची मदत देण्याचे काम करते

भारतात मद्यपान करण्याविषी वयोमर्यादा निश्चित केलेली आहे पण ही वयोमर्यादा सर्वत्र एकच नसून प्रत्येक राज्यात वेगवेगळी आहे. महाराष्ट्रात बीयर साठी २१ वर्षे आणि इतर मद्यासाठी २५ वर्ष अशी विहीत केलेली आहे. तर केरळ आणि बिहार या राज्यांत दारुबंदी करण्यात आलेली आहे. मोटार वाहन कायदा १९८८ मध्ये ३० मिली इतके मद्य प्राशन करुन वाहन चालविण्यास परवानगी दिलेली आहे. पण मद्यपान करुन वाहन चालकाने केलेल्या अपघातांचे प्रमांण वाढल्यामुळे दि.१.०३.२०१२ रोजी केंद्रशासनाने मद्यपान करुन वाहन चालविणा-या चालकांविरुध्द कारवाई करण्याच्या नियमामध्ये सुधारणा केली असून नविन नियमांनुसार मद्यपान करुन वाहन चालविणा-या दोषी चालकास किमान रु.२००० ते रु.१००००/- इतका दंड आणि ६ महिने ते ४ वर्ष इतका कारावास होऊ शकतो. नुकतेच मुंबई हायकोर्टाने दारूचा अंशही चालकाने वाहन चालविण्यापुर्वी घेता कामा नये अशी सूचना केली आहे.

अपघात ग्रस्तांना तातडीची मदत-

मोटार वाहनांच्या समोरासमोरील धडकीमध्ये गंभीर इजा किंवा हानी पावलेल्या व्यक्तीसाठी ट्रामासेंटर मध्ये उपचार करणे अनिवार्य असते. सदर सेंटर मध्ये अत्यावश्यक औषधे, शस्त्रक्रिया, अतिदक्षता केंद्र, न्युरोसर्जरी, ऑर्थोपेडीक सर्जरी, ऍनेस्थेशिलॉजी आणि रेडिओलॉजी यांचा समावेश असून तेथे अपघातग्रस्तांची विशेष शुशुश्रा केली जाते.

भारतामध्ये १९८४ मध्ये दिल्ली येथे सुरु करण्यात आलेले जयप्रकाश नारायण ऍपेक्स ट्रामासेटंरची मध्ये रोड ऍक्सीडेन्ट ट्रामा केअर सेंटर दि २६.११.२००७ रोजी अखिल भारतीय आर्युवेदीक संस्थान (AIMS) यांच्या अधिपत्याखाली जनतेस खुले करण्यात आले केंद्र शासनाने ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये सुवर्ण चतुष्कोन रस्त्यावर १४० ठिकाणी प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजने अंतर्गत ट्रामा सेंटर्स सुरु करण्यात आली असून या शिवाय ८५ अतिरिक्त सेंटर्सना केंद्र शासन व खाजगी सहभाग यांच्यासह मान्यता दिली.या शिवाय इंडिया हेड एन्जुरी



प्रिव्हेन्शन फाऊन्डेशन, जयपुर, लोकमान्य मेडिकल फाऊंडेशन, पुणे अशा काही खाजगी संस्थानी सुध्दा गेल्या दशकात खाजगी तत्वावर ट्रामा सेंटर्स उभारण्यास सहभाग नोंदविला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने सुरक्षेविषयी दक्षता घेऊनही मोटार वाहनाचा अपघात झाल्यास अपघातग्रस्तास तात्काळ रुग्णालयात पुढील उपचारांसाठी दाखल करावे लागते. यासाठी रुग्णालयाची साखळी निर्माण करण्याविषयी आपल्या अहवालात नुकतेच दर्शविलेले आहे.

With Best Compliments From

J. V. Ambavane Construction Wada

Dist - Palghar

With Best Compliments From

Harshad Construction

Wada

अेबीएस ब्रेक बद्दल नवीन नियम

संजय डोळे
(प्रा. परि. अधिकारी)

यापूर्वी काही मोजक्या प्रकारच्या मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक वाहनांसाठी अे बी एस ब्रेक सिस्टीम असणे अपरिहार्य केले होते. अे बी एस ब्रेक सिस्टीम जर वाहनात असेल तर वाहन स्किड होण्यापासून बचाव होतो.

दिनांक १ एप्रिल २०१५ पासून उत्पादित झालेल्या परंतु नवीन मॉडेल्स अश्या M3 आणि N3 प्रकारच्या वाहनांमध्ये वाहनाच्या उत्पादकाकडून अे बी एस ब्रेक सिस्टीम अनिवार्य करण्यात आलेले आहे. M3 आणि N3 प्रकारच्या वाहनांच्या सध्या उत्पादन होत असलेल्या मॉडेल्स मध्ये दिनांक १ ऑक्टोबर २०१५ पासून वाहनाच्या उत्पादक कंपनीने अे बी एस ब्रेक सिस्टीम बसवून देणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

साधारण ३१ मे २००२ पासून वाहनांची वर्गवारी करण्याची पध्दत सुधारण्यात आली. L ने सुरू होणारा प्रकारात दुचाकी वाहने अंतर्भूत होतात. M ने सुरू होणाऱ्या प्रकारात कमीत कमी चार चाकी तसेच त्यापुढील परंतु फक्त प्रवासी वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने अंतर्भूत होतात. N ने सुरू होणाऱ्या प्रकारात कमीत कमी चार चाकी तसेच त्यापुढील परंतु प्रामुख्याने मालवाहतूक आणि मालासोबत गरज असल्यास प्रवासी वाहतूक करणारी वाहने अंतर्भूत होतात. T ने सुरू होणाऱ्या प्रकारात इतर वाहनाद्वारे ओढले जाणारे ट्रेलर अंतर्भूत होतात.

N3 वाहन याचा अर्थ असे मालवाहतूक वाहन ज्याचे मोटार वाहन कायद्यानुसार मालासहीत वजन १२ टनापेक्षा जास्त असते.

M3 प्रकारचे वाहन याचा अर्थ असे प्रवासी वाहतूक वाहन ज्यामध्ये ९ किंवा त्यापेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक करता येते आणि ज्या वाहनाचे मालासहीत वजन ५ टनांपेक्षा जास्त आहे.

या नियमातील सुधारणेचा अर्थ असा दिसून येतो की आता अे बी एस ब्रेक सिस्टीम ची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढवणार आहे!!! यापूर्वी हा नियम केवळ ट्रेलर, टुरिस्ट बसेस आणि धोकादायक रसायनांची वाहतूक करणाऱ्या मालवाहतूक ट्रक्स यांना लागू होता. दिनांक १ ऑक्टोबर २०१५ पासून सध्याच्या मॉडेल्स मध्ये अे बी एस ब्रेक सिस्टीम लागू होणार म्हणजेच असे की दिनांक १ ऑक्टोबर २०१५ सर्व N3 आणि म M3 या प्रकारातल्या सर्व वाहनांना अे बी एस ब्रेक सिस्टीम असणार आहे.



With Best Compliments From

SYMBOL OF WOMAN'S STRENGTH

Lijjat PAPAD

(श्री महिला गृह उद्योग)

लिज्जत

पापड

रस्ते सुरक्षा - एक वेगळा दृष्टीकोन

हेमंत जगताप
(उप. प्रा. परि. अधिकारी)

रस्ता सुरक्षा पंधरवडा म्हणजे सालाबादाप्रमाणे येणारे विचार, कार्यक्रम, आकडेवारी, गांर्भिया इ. बाबींची वेगवेगळ्या पातळीवर होणारी चर्चा आलीच. या वर्षी २७ वा रस्ता सुरक्षा कार्यक्रम करतांना या सर्व बाबींवर कृती झालीच पण ती करतांना एका वेगळ्या बाजूबाबत ही विचार मनात डोकावला.
कुणी तरी म्हटलं आहे....

"नजर बदली तो नजारे बदल जायेंगे...
सोच बदली तो सितारे बदल जायेंगे।"

त्या दृष्टीने हा छोटासा प्रयत्न

रस्ते सुरक्षा म्हटलं की अपघातांची कारण मिमांसा ही आलीच. यातील बहुतांश अपघात हे मानवी चुकांमुळे होतात असं निदर्शनास आलं आहे. यातील अजून खोलवर आकडेवारीचा विचार केला तर अपघातांमधील जखमी वा मृत व्यक्तिंच्या वयाच्या विचार केला तर चाळीस वर्षाखालील व्यक्तींचा म्हणजेच अत्यंत कार्यप्रवण गटांचा यात समावेश आहे असे दिसते. हा गट सततच्या ताणतणांवाखाली असल्यामुळे तर तो जास्त अपघातांना सामोरा जात नसेल ?

आता मानवी चुकांचे विश्लेक्षण केलास असे लक्षात येते की अपघातांची कारणे ही मद्यपान, अपूरी झोप, कामाचा अति ताण, मोबाईलवरील संभाषण व व्यक्तिगत समस्या ही आहेत. तरूण पिढीमध्ये या व्यतिरिक्त अहंकार Ego या कारणाचाही समावेश करावा लागेल. आज काल वर्तमानपत्रात 'रोड रेज' म्हणजेच रस्त्यावरील हमरी तुमरीच्या घटनांबद्दल ही वारंवार वृत्त प्रसिध्द होत असतात.

एकंदरीत काय आपण सर्व मंडळी वाहन चालवण्याच्या तांत्रिक बाबींकडे व वाहनांच्या आधुनिकतेकडे बऱ्यापैकी लक्ष देत असलो तरी वाहन चालवतांना असलेल्या आपल्या मानसिक स्थितीबद्दल आपण जागरूक असतो कां? असं म्हणतात की रागाच्या भरात व्यक्तीने निर्णय घ्यायचा नसतो. असं असलं तर रागामुळे किंवा वर उल्लेखलेल्या विविध कारणांमुळे आपली मानसिक स्थिती संतुलित नसेल तर क्षणोक्षणी निर्णय घ्यावयास लागणाऱ्या वाहन चालविणे ही कृती अशा मानसिक स्थितीत कारण योग्य होईल कां ?

वाहन चालक व त्याचे मानसिक स्वास्थ या दृष्टीने रस्ते अपघातांची कारणमिमांसा या बाबीकडे तज्ञ मंडळींने विशेष लक्ष देण्याची आज गरज निर्माण झाली आहे. मानसिक स्वास्थ

जपण्यांसाठीच्या उपाययोजना यासाठी करणं गरजेचे आहे.

काही छोटया छोटया गोष्टीमुंळे

वाहनचालवितांना मानसिक स्वास्थ उत्तम प्रतिचे ठेवणे आपणांस सहजपणे शक्य होईल. अशाच काही कृतींचा आपण विचार करूया.

१. वाहनामध्ये मंद सुरावट, आवड असल्यास शास्त्रिय संगितामुळे वातावरण आल्हाददायक ठेवणे. मात्र संगित ऐकून झोप येईल अशा प्रकारचे संगित टाळावे (उदा.Trance Music)

२. वाहनातील वातावरण, हवा शुध्द व प्रसन्न ठेवण्यासाठी मंद सुगंधांचा वापर करणे. आपल्या चित्तप्रवृत्ती उत्साही ठेवण्यासाठी आपल्या आवडीचा Car Perfume चा वापर केल्यास मन निश्चितच प्रसन्न रहाते.

३. प्राणायाम व दिर्घ श्वसनामुळे मन स्थिर रहाण्यास निश्चितच मदत होते. विशेषतः वाहतूक कोंडीत अडकलेले असतांना जर बसल्याजागी दिर्घ श्वसन केल्यास मन शांत रहाण्यास मदत होते. ज्या गोष्टींवर आपले कोणतेच नियंत्रण नाही अशा बाबींवर नाराज होऊन चिडचिड केल्यास मन अशांत तर होतेच पण काही कारण नसतांना रक्तदाब वाढून अधिकच गुंतागुंत वाढण्याची शक्यता निर्माण होते. अशा परिस्थितीतून वाहतूक कोंडीतून बाहेर पडल्यावर वाया गेलेला वेळ भरून काढण्यासाठी जोरात वाहन चालविणे, रागाच्याभरात ओवरटेक करणे, चुकीच्या पध्दतीने ओवरटेक करणे या कारणांमुळे अपघात होत असतात.

४. वेळेचे नियोजन व मानसिक स्वास्थ याचा एकमेकांशी खुप जवळचा संबंध आहे. बऱ्याच वेळा वाहतूक कोंडी, रस्ते दुरूस्तीची कामे, Peak Hour Traffic या बाबींमुळे प्रवासास लागणारा वेळ वाढतो. या सर्व बाबींचा तसेच प्रतिकूल हवामानाचा जर आपण अगोदरच गांर्भियपूर्वक विचार केला तर या सर्व बाबीमुळे प्रवासास लागणाऱ्या अधिकच्या वेळेचा आपल्यास प्रवास सुरू करण्यापूर्वीच अंदाज येईल. त्यानुसार निघण्याच्या व पोहोचण्याच्या वेळेचे नियोजन केल्यास मानसिक ताणतणावांना सामोरे जावे लागणार नाही व अपघात घडणे टाळता येईल.

५. वाहन चालवितांना भ्रमण ध्वनीचा वापर केल्यास कसे अपघात होतात याबाबत आपण जाणतोच. याचाच एक वेगळा पैलू म्हणजे भ्रमण

ध्वनीवरून बोलतांना काही अप्रिय संभाषण घडले तर त्याचा परिणाम मानसिक अस्वास्थ निर्माण होण्यास होऊ शकतो. त्यामुळे भ्रमण ध्वनीवरून संभाषण टाळलेलेच बरे.

६. बऱ्याचदा गाडीत बसल्यावर सहप्रवाशांसोबत काही कारणांमुळे कुरबुरी होतात. यातील प्रमुख कारण म्हणजे आपल्या जोडीदाराचे आपल्या वाहन

चालविण्याच्या कौशल्यावरचे शेरे ही अगदी नियमित व सर्वांनी अनुभवलेली बाब असेल. जोडीदाराने किंवा सहप्रवाशाने वारंवार वाहनचालकास सुचना दिल्या किंवा वाहनचालन कौशल्यावरून टोमणे मारल्यास वाहनचालकाचे मनोबल कमी होण्याची व काही वेळा मानसिक अस्वास्थ निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. शक्यतो सहप्रवाशांनी व वाहनचालकांनी समजूतदारपणे संभाषण केल्यास वाहन अपघात टळू शकतात.

एकंदरीतच वाहनचालकाचे मनोबल, मनःस्वास्थ, शारिरीक तंदुरूस्ती ही कारणे देखिल अपघात कारण मिमांसेत विचारात घेवून त्यावर मानसोपचार तज्ज्ञांकडून उपाययोजना निश्चित केल्या जाव्यात. कोण जाणे काही वर्षानंतर परिवहन विभागातर्फे वाहन चालविण्याचा परवाना देतांना या बाबतच्या चाचण्यांचा समावेश करावा लागेल.

तसं पाहिलतर आपण फक्त आपल्या गंतव्य स्थानांचा विचार करूनच प्रवासास सुरूवात करतो, पण आपण रस्त्याचा, रम्य परिसराचा, धुंद वातावरणाचा आनंद घेत प्रवास केला तर प्रवास अपघात विरहीत सुखाचा तर होईलच शिवाय मनःस्वास्थ ही उत्तम राहील ..कारण....

"जो मुसाफिर सिर्फ मंजील का इंतजार करते है
वो अक्सर सारा सफर दुश्वार करते है,
खुशगंवार मुसाफिर तो वो होते है..,
जो मंजील से नही रास्तों से भी प्यार करते है।"

With Best Compliments From

MANBA FINANCE LTD.

306, Runwal Heights, Opp. Nirmal Lifestyle,
L.B.S. Marg, Mulund (W.),Mumbai - 400 080
Tel : 022-67695555 / Mob.: 9820053755
Email : manish@manbagroup.com
Web : www.manbagroup.com

रस्ता सुरक्षा

सुरेश गोविंद देहेरकर

चालणे हे मानवी आयुष्यात खूप महत्त्वाचे आहे. चालणे हे क्रियापद खूप मजेशीर आहे. त्याला अनेक अर्थ आहेत. चेंलणे म्हणजे टु वॉक (To walk) हे तर आहेच पण जेंव्हा एवादा माणूस मी हे चालून घेणार नाही असे म्हणतो तेंव्हा त्या माणसाला दुसऱ्या माणसाची वर्तणूक पसंत नसते. काही माणसे असेही म्हणतात की आमचे नाणे खणखणीत आहे ते कुठेही चालेल; तेंव्हा त्यांचा आत्मविश्र्वास दिसून येतो. रस्त्याच्या बाबतीत या दोन्ही गोष्टी लागू पडतात. चांगला रस्ता कुणाला चालणार नाही या प्रश्नाचे उत्तर सर्वांना चालेल असेच आहे. इथे चालणे म्हणजे आवडणे हा अर्थही अभिप्रेत आहे. दोन रस्त्यांतून एक रस्ता निवडण्याची वेळ आली तर ड्रायव्हर चांगल्या रस्त्याला पसंती देतात. लोकानांही चांगल्या रस्त्यावरून चालायला मजा येते. ओबडधोबड, खड्डे असलेले अरुंद रस्ते कुणालाच आवडत नाहीत याउलट ऐसपैस, लांबसडक, उतार-चढाव कमी असलेले रस्ते सर्वांनाच आवडतात कारण ते सोयीचे असतात.

वाहनांची जा-ये ज्या रस्त्यावरून चालते तो रस्ता चांगला आखीव-रेखीव, लांब-रुंद, ऐसपैस व मजबूत आणि टिकाऊ तर हवाच पण प्रवासाकरता तो सुरक्षितही हवा. कारण प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न असतो. वाहनांच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. जेवढे रस्ते टिकाऊ आणि मजबूत असतील तेवढी वाहनेही जास्त टिकतील व अपघातही कमी होतील. याकरिता बांधकाम खात्याने दीर्घकाळ टिकणारे, वाऱ्या-पावसातही तग धरणारे रस्ते बांधायला पाहीजेत. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा व परदेशी तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला पाहिजे. रस्त्याचे आयुष्य त्यामध्ये वापरल्या गेलेल्या बांधकामाच्या साहित्यावर अवलंबून असल्याने ते उत्कृष्ट हवे. जर असे रस्ते बांधले गेले तर जनताही म्हणेल की हा रस्ता चालेल किंवा हा रस्ता ठणठणीत व मजबूत आहे. प्रवासाकरिता चांगला आहे वगैरे वगैरे.

रस्त्यावरून प्रवास करताना सुरक्षा ही तेवढीच महत्त्वाची आहे. प्रवाशांना धोका असतो तो प्रवाशांना लुटणाऱ्या लुटारूंचा आणि वाहन अपघाताचा. अशा वेळी त्यांना विनाविलंब बांधकाम खात्याकडून, पोलिसांकडून सहकार्य व मदत मिळायला पाहिजे तसेच अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळायला हवेत. तसे झाले तर गंभीररीत्या जखमी होणाऱ्या प्रवाशांचे प्राण वाचवता येतील. सरकारचे बांधकाम खाते, गृह खाते व आरोग्य खाते यांच्यात योग्य तो ताळमेळ व समन्वय हवा तरच हे साध्य आहे. लुटारूंच्या बंदोबस्तासाठी फिरती गस्ती पथके व बिनतारी संदेश यंत्रणेचा परिणामकारक वापर केला गेला पाहिजे. रात्रीच्या गाडीतून प्रवास बऱ्याच वेळा धोकादायक ठरतो हे

लक्षात घेऊन सरकारी व खाजगी प्रवासी गाड्यांमध्ये सुरक्षा रक्षक जो बंदूकधारी आहे असा असायलाच हवा असा कायदा केला पाहिजे कारण प्रवाशांच्या जिविताची हमी ही सर्वांत महत्त्वाची



आहे.

शहरांमधली सिग्नल व्यवस्थाही कार्यक्षम हवी. सिग्नल तोडून गाड्या पुढे नेणारे नियमभंग तर करतातच पण लोकांच्या जीवाशीही खेळतात तेंव्हात्यांना दयामाया दाखविण्याची गरज नाही. तसे करणारे कितीही मोठे असोत त्यांना शिक्षा ही व्हायलाच हवी. मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवणारे सरकारी व खाजगी गाड्यांचे ड्रायव्हर यांना नुसते दंड करून चालणार नाही तर संबंधित अधिकारी व खाजगी गाड्यांचे मालक यांनी त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करायला हवी. शिवाय कायद्यानुसारही त्यांना कडक शिक्षा मिळण्यासाठी आग्रह धरला जावा तरच अशा प्रकारांना आळा बसेल. कारण लोकांच्या जिवाशी खेळण्याचा त्यांना कुठलाच हक्क नाही.

वेगमर्यादा ओलांडणे व ओव्हरटेक करणे या गोष्टींनाही आळा बसायलाच हवा. जड वाहने, छोटी वाहने यांना आखून दिलेल्या मार्गिकेतूनच पुढे जायला हवे. कारण बरेचसे अपघात हे एकमेकांना ओव्हरटेक करण्यामुळेच होतात असे पाहणी अहवालात आढळून आले आहे. रस्त्याची सुरक्षा अशा अनेक गोष्टींवर अवलंबून असते याचे भान सर्वांनीच ठेवणे गरजेचे आहे.

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जोपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान वापरून दीर्घकाळ टिकणारे पाण्या-पावसात तग धरून राहणारे व खड्डे न पडणारे रस्ते तयार होत नाहीत तोपर्यंत रस्ते सुरक्षित आहेत असे म्हणता येणार नाही. त्यासाठी रस्त्यांचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांना कडक शासन करून तुरुंगात पाठवावे लागले तरी चालेल. तसे झाले नाही तर दर्जाहीन व एका पावसाळ्यातच वाहून जाणारे व खराब होणारे रस्ते यापुढेही आपल्याला पाहावे लागतील.

चांगले रस्ते बांधणे व प्रवाशांना जास्तीत जास्त सुविधा देणे यासाठी सरकारी पातळीवरून प्रयत्न व्हायला हवेत. कारण चांगले रस्ते देण्यासाठी सरकार बांधील असून त्याकरता टोलही आकारला जातो. तेंव्हा चांगले टिकाऊ रस्ते, सुरक्षित रस्ते हा प्रवाशांचा म्हणजेच जनतेचा हक्क आहे तो नाकारता येणार नाही.

वात्रटिका

सडक

एक होती सडक
ठणठणीत आणि कडक
तिच्यावरुन वाहन जायचे
बिनधास्त बेधडक

रस्ता

एक होता रस्ता
तो होता खूपच खराब
त्याला पाहून ड्रायव्हर प्यायचे
थोडीसी शराब

- सुरेश देहेरकर

रस्त्यांवरील वाहतूक

अरुण भालेराव

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असूनही तिची जागतिक ओळख आज 'झोपडपट्टीचे शहर' म्हणूनच होत आहे. एकेकाळी व्यापारामुळे, बंदरामुळे आणि नंतर मॅन्चेस्टर म्हणून गिरण्यांनी भरभराटीला आलेली मुंबई आता राजकारणी-बिल्डरांच्या हातातले बाहुले झाली आहे. शिवाय प्रदूषण आणि अफाट गर्दी, वाहनांनी ओसंडणारे रस्ते आणि माणसांनी गच्च भरलेल्या उपनगरी गाड्या, त्यावरचे अपघात आणि रस्त्यांवरची जीवघेणी अपघाती वाहतूक हीच आता मुंबईची ओळख बनली आहे.



मुंबईचे सिंगापूर किंवा शांघाय करण्याच्या कल्पनेची साहाजिकपणे हेटाळणीच होत आली आहे. प्रत्यक्षात एकेकाळी अतिशय कार्यक्षम आणि आधुनिक, सांस्कृतिक, सुसंस्कृत म्हणून जगात प्रसिध्दी मिळालेल्या मुंबईला नाना समस्यांनी घेरले आणि बघता बघता शहर अधिकाधिक प्रमाणात बकाल झाले.

शहरांच्या विकासाच्या दृष्टीने रस्त्यांची सुरक्षितता ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. विकसित शहरांमध्ये एका रस्त्यावर वाहतूक बंद पडली आहे, ती अपघातामुळे किंवा इतर कारणाने हे नियंत्रण कक्षात लगेच दिसते. ती माहिती वापरून त्या विभागातील इतर वाहनांचा मार्ग बदलण्याच्या सूचना सिग्नल-यंत्रणेच्या दिल्या जातात. आजूबाजूचे सिग्नल लाल होतात. वाहतूक अडविली जाते. कुणी घुसण्याचा प्रयत्न केला तर वाहनाचा नंबर ताबडतोब आपोआप पोलीस स्टेशनकडे नोंदला जातो. लगोलग त्याच्यावर गुन्हा दाखल होतो. पोलीस जवळपासची इस्पितळे, अग्निशामक दल आणि रुग्णवाहिका यांना अपघाताची खबर लगेच मिळते. जे कोणी अधिकारी त्या स्थळाच्या जवळ असतील त्यांना ताबडतोब संदेश दिला जातो. तातडीने बचाव-कार्य आणि रस्ता मोकळा करण्याचे कामही लगोलग सुरू होते. निर्णय अतिशय झटपट आणि कार्यक्षमपणे घेतले जातात. राजकीय नेत्यांना सजग करून सल्ला घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलावून त्याच्या मर्जीनुसार निर्णय घेण्याची प्रथाच त्यामुळे निकालात निघाली आहे. अर्थात या सर्व यंत्रणेत शहरात जागोजागी बसविलेले आणि माहिती प्रक्षेपित करणारे हजारो कॅमेरे असतात त्यांना वीजपुरवठा करणारी त्यांची चित्रे ताबडतोब नियंत्रण-कक्षाला पाठविणारी अत्यंत आधुनिक संदेश वाहन करणारी, आकाशातल्या उपग्रहांशी जोडलेली मोठी यंत्रणाच उभी केलेली असते. याच्या पाठीमागे कामाचा झपाटा, पध्दतशीर नियोजन त्वरित अंमलबजावणी आणि यश खेचून आणण्याची तीव्र इच्छा या गोष्टीच प्रकर्षाने दिसतात. वाहतूक वेगवान आणि सुरक्षित होते. बसच्या थांब्यावर किती वेळात कोणती बस येते हे

निश्चितपणे समजते. अर्थातच तेथील समाज सार्वजनिक शिस्त जपणारा, कायदे पाळणारा प्रगल्भ नागरिकांचा आहे.

आपल्याकडे हे तंत्रज्ञान यायला नक्कीच वेळ लागेल. परंतु तोपर्यंत अपघात झाल्यास मोटार चालकाने भीतीमुळे लोकांच्या भावना उद्रेकामुळे पळून न जाता जखमी व्यक्तीला त्वरित जवळच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची व्यवस्था केली पाहिजे. पोलिसाला आपले वाहन-प्रमाणपत्र दाखविणे आवश्यक आहे आणि घडलेली घटना २४ तासांच्या आत पोलीस स्टेशनला कळविणे आवश्यक आहे. कमीत कमी या गोष्टी केल्याच पाहिजेत.

रेल्वे फाटकाजवळ क्रॉस करण्यापूर्वी वाहनचालकाने वाहन थांबविले पाहिजे. तेथे मोटार चालकाला RTO अधिकाऱ्याने विनंती केल्यास परवाना दाखविला पाहिजे. नंतर सावधानता बाळगून रेल्वे क्रॉसिंग केले पाहिजे.

गाडी अशा ठिकाणी उभी केली पाहिजे की, दुसऱ्या माणसाला अथवा वाहतुकीला अडथळा येता कामा नये. गाडी पार्किंगच्या नियमानुसार उभी केली पाहिजे. एवढे प्राथमिक नियम पाळले तरी



पुष्कळ फायदा होईल.

हल्ली अनेक भंगार वाहने रस्त्याच्या कडेला वर्षानुवर्षे पडलेली दिसतात कारण वाहतुकीसाठी त्यांचा उपयोग नसतोच. पोलीससुध्दा गावातली एवढी भंगार वाहने कुठे नेऊन टाकणार? पोलीस स्टेशनचे आवार अशा वाहनांनी भरलेले असते. पोलीस विभाग जागा कुठे शोधणार? आयुर्विमा कंपन्यांकडून अशा वाहनांचे claims लवकर

मिळत नाहीत. अनेक हाऊसिंग सोसायट्यांमध्ये वाहने ठेवण्यासाठी पार्किंगची व्यवस्था नसते. अशा एक ना अनेक अडचणींमुळे वाहने कायमची रस्त्यावरच असल्यामुळे इतर वाहनांना बाहेर प्रवास करतांना अत्यंत त्रास होतो. ज्येष्ठ नागरिकांना रस्ता क्रॉस करणे दिव्य वाटते केव्हा 'राम' म्हणावा लागेल याची शाश्वती नाही. लहान मुलांना, शालेय विद्यार्थ्यांना, महिलांना रस्त्यातून जाणे अत्यंत त्रासदायक होते. खड्डयांच्या रस्त्यांमधून जाणे नकोसे वाटते. म्युनिसिपालिटीवाले, टेलिफोनवाले, पाण्याची लाईन टाकणारे, घरे बांधणारे कंत्राटदार रस्ते खणून ठेवतात. परंतु नंतर ते परत दुरुस्त करणे हे त्यांचे कर्तव्य नाही असेच समजतात. इतके कर्तव्यशून्य, बेदरकार, बेजबाबदार लोक आपल्या देशातच दिसतात.

आपल्याकडचे वाहनचालक जसे आहेत तसे कोणत्याच देशात सापडणार नाहीत हे नक्की. त्यांचे वाहनांच्या वेगावर नियंत्रण नसते. ते गतिरोधक पाहत नाहीत. रिक्षा, ट्रक्स, बसेस यांच्यामध्ये किती प्रवासी कोंबून पैसा मिळवावा यांतच ते मशगुल असतात. सिग्नल तोडणे, गर्दीतून लेन तोडून, ओव्हरटेक करून आपले वाहन पुढे

कसे दामटायचे यांत अगदी हुशार! वाहन चालवताना गुटखा खाणे, दारू पिणे, मोबाईलवर बोलणे, पचापच थुंकणे, शेजाऱ्याशी गप्पा मारणे, चूक नेहमी दुसऱ्याचीच असते असे समजणे, अचकट-विचकट बोलणे, शिव्या देणे, समोरच्याचा अपमान करणे, विनयाने न बोलणे, रिक्षा-टॅक्सीवाले जवळच्या रस्त्याने वाहने न नेता दूरच्या रस्त्याने नेतात आणि अवाच्या सव्वा भाडे आकारतात. स्त्रिया, मुले, ज्येष्ठ नागरिक यांना आदराने वागवणे ही गोष्ट त्यांना माहीतच नसते. मीटर असून ते न पाडणे यात ते कौशल्य समजतात. सुटे पैसे परत न देण्याचे व्रत सर्वानीच घेतलेले असते. वाहन स्वच्छ ठेवण्याच्या बाबतीत आनंदच असतो.

ड्रायव्हर मंडळी वाहन चालवायचे प्रशिक्षण घेतानाचे अनुभव ऐकल्यावर मी थक्कच झालो. प्रशिक्षणाला वेळेवर हजर राहत नाहीत. 'लायसन्स' साठी ते मिळवण्यासाठी प्रॅक्टिस न करता, मेहनत न घेता, नियमांचा अभ्यास न करता ते लाच देऊन 'ड्रायव्हिंग' लायसन्स मिळवतात. सर्वचजण वाईट आहेत अशातला भाग नाही परंतु ही 'कीड' फार मोठ्या प्रमाणांत पसरत आहे हे नक्की.

आपल्या देशात लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे वाहनांची संख्यासुध्दा भरमसाठ आहे हे लक्षात घेऊनच वाहनचालकांनी जबाबदारी ओळखून, माणसांच्या जिवाची किंमत ओळखून काळजीपूर्वक वाहने चालविली पाहिजेत. एवढा एकच उपाय आपल्या हातात आहे, हे लक्षात घेऊन रस्ता वाहतुकीवर नियंत्रण राहू शकेल, नाही तर सर्वच रामभरोसे!!

With Best Compliments From

BARKAT HIRING CO.®

CRANE, FORK-LIFT & TRAILOR OWNERS

11/12/13, Shroff Bhuvan, 1st Floor, 159, P. D' Mello Road, Carnac Bunder, Mumbai - 400 001

Phone : + 9122 2261 3009 / 2262 1448 / 2261 3870 Fax : 2261 5990

E-mail : info@barkatworld.com / **Website :** www.barkatworld.com

रस्ता सुरक्षा - अपघात, रहदारी

वसुधा गोसावी

आजकाल रस्ता सुरक्षा, अपघात, रहदारी, वाहतूक हे अगदी जटील प्रश्न झाले आहेत. मनुष्यप्राण्याच्या जिवाशी खेळणारे झाले आहेत. लोकसंख्यावाढ हा तर साऱ्या देशापुढीलच मोठा चिंतेचा विषय झाला आहे आणि त्याची झळ मोठ्या रहदारीसाठी डोकेदुखी ठरली आहे कारण जो उठतो तो रोजि रोटी मिळविण्यासाठी शहरांकडे धाव घेतो. अशांच्या आणि अनेक बड्या लोकांच्या, नेत्यांच्या तसेच त्यांच्या आप्तेष्टांसाठी काही बिल्डर्स खाड्या बुजवून, नद्यांचे मार्ग बदलून, डोंगर फोडून व सागर मागे हटवून त्या जागी उंच इमारती उभारतात. या आलिशान जागेत राहणाऱ्या लोकांच्या आलिशान महागड्या

गाड्याही आल्याच. शर्यतीत भाग घेतल्यासारख्या ती भर गर्दीच्या रस्त्यातून पळवीत असतात. अशा वेळी मार्गात येणारे मनुष्यप्राणी चिरडले जातात. काही वेळा काहींचा गाडीवरचा ताबा सुटतो व फुटपाथवरील माणसं, फेरीवालेही चिरडले जातात तर काही वेळा दुकानांना धडकतात आतही शिरतात. दुकानातील सामानाची नासधूस करतात. अलीकडे नवीन फॅड निघालय ४/४, ५/५ वर्षांच्या मुलांना ड्रायव्हिंग सीटवर बसवून त्यांना गाड्या चालवायला शिकवितात. म्हणजे रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यांना जीव मुठीत घेऊनच चालावे लागते. बरे हे सगळे बडे लोक असल्यामुळे पैसे दाबले की यांच्यावरची कार्यवाही शून्य. या बड्यांच्या अशा वागण्यामुळे पोलिसखातं निष्कारण बदनाम होत. त्यांच्यातही खूपजण प्रामाणिक असतात. पण बड्यांची नाराजी नको किंवा गैरसोयीची बदली नको अथवा खोटे दोषारोप लादले जाऊन नोकरी गमवावी लागू नये म्हणूनही नाइलाजाने ते तसं वागत असतील. काही असल तरीही दुर्लक्ष करण्याची बाब नाही. बड्यांच्या नावाचा जराही मुलाहिजा न ठेवता खुद्द माजी पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांची गाडी गैरमार्गावरून जात असता ती अडविण्याचे धाडस केले ते त्यावेळी दिल्लीच्याच एका महिला पोलिस ऑफिसर किरण बेदी हिने कर्तव्यदक्ष राहून. माणसाजवळ जिद्द, स्वाभिमान, आपल्याकरिता असलेल्या कामावर निष्ठा असली म्हणजे अशा असामान्य घटना घडतात.

रस्ते दुरुस्त करणारे कंत्राटदार तरी कुठे मनापासून, प्रामाणिकपणे कामं करतात? त्यांच सार लक्ष सरकारकडून जास्तीत जास्त अनुदान उकळण्याकडेच असते. उन्हाळ्यात कसातरी हलक्या प्रतीचा माल वापरून थातुर मातुर रस्त्याच काम करायचं मग काय पावसाळ्यात येतात ते रस्ते परत मूळ पदावर म्हणजे परत रस्त्यावर खड्ड्यांच

साम्राज्य सुरू होतं. मग अपघात ठरलेलेच कधी गाड्यांचे, तर कधी पादचाऱ्यांचे, कारण नोकरदार लोकांना कामावर जाण भागच असतं आणि मुलांना

शाळा-कॉलेजात. रस्त्याने जातायेता वाहनांमुळे होणारी चिखलफेक टाळणेही जिकिरीचे होऊन बसते आणि ती टाळतांना काही वेळा बाजूच्या खड्ड्यात वा गटारात पडण्याची पाळी येते. छोट्या छोट्या मुलांना माणसाचा डोळा चुकवून साठलेल्या पाण्यात खेळायची फार हौस असते. पण पाणी साठलेल्या खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज त्यांना येत नाही आणि बिचारी ती त्या पाण्यात गटांगळ्या खातात आणि नाकातोंडात पाणी जाऊन प्राणास मुकतातही. तेव्हा पालिकेने अशा निष्काळजी कंत्राटदारांना काम देताना दहा वेळा विचार करावा. कारण निरपराधी जनतेच्या जिवाशी खेळण्याचा कोणालाही अधिकार नाही. आजच्या घडीला भारतातील एकही राज्य सोवळं राहिलं नाही की जिथं भ्रष्टाचार, अफरातफर, लाचलुचपत, अपहरण, घोटाळे, खंडण्याची वसुली व त्यापायी हत्या होत नाहीत. या अशा अवैध प्रकारांपासून पोलिस खाते, संरक्षण खाते, तसेच बांधकाम, शिक्षण ना वैद्यच खातं घोटाळ्याचं आगर बनली आहेत आणि या भ्रष्टाचारी लोकांना वरदहस्त लाभलाय तो बडे नेते आणि मंत्रिगणांचा. मग यांच्यावर कार्यवाही कशी होणार? करणार तरी कोण? सामान्य जनता मात्र यांच्या जुलमाखाली भरडली, चिरडली जाते म्हणून वयोवृध्द, कट्टर गांधीवादी स्वातंत्र्यसैनिक अण्णा हजारे या भ्रष्टाचाऱ्यांचे पितळ उघडे पाडून, दंड थोपटून उभे राहिले. लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी मोर्चे काढले, पदयात्रा काढल्या. त्यांच्या या कार्यात सबंध देशातून उदंड प्रतिसाद मिळाला. त्यात अनेक लहान-थोर, लहान मुले, कॉलेजमधील तरुण, इंजिनीयर्स, वकील, डॉक्टर्स सगळे ठामपणे उभे राहिले. लाखोंच्या संख्येने दिल्लीच्या आझाद मैदानावर जमले. त्यामुळे केंद्र सरकार गडबडले तरीही उलट अण्णांवरच भ्रष्टाचाराचे आरोप करू लागले आणि केंद्र सरकार अण्णांच्या लष्करातील नोकरीमध्ये अण्णांनी काही गैरव्यवहार केलेले आहेत का? केले असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करता येईल या विचाराने पछाडलेले पण स्वच्छ व शुध्द चारित्र्याचे अण्णा त्यांना प्रसंगी छातीवर गोळ्या झेलीन, लाठ्या खाईन पण मागे हटणार नाही असे आव्हान देऊन मोकळे झाले.

परदेशातील भारतीय रहिवासी आणि तेथील स्थायिक नागरिकांनीही त्या त्या देशातून पदयात्रा, मोर्चे काढून उपोषणे करून अण्णांना पाठिंबा जाहीर केला. सगळीकडेच अण्णामय वातावरण झालं होतं. २०११ साल अण्णांचं झालं होतं.

जगातील शंभर सर्वोत्तम विद्यापिठापैकी पहिल्या गणल्या जाणाऱ्या इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात अण्णा हजारेंच हे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन अभ्यासाचा विषय ठरणार आहे. कारण त्यामुळे जगातील सर्व देशांतील लोकांनी त्यांच्या देशातील भ्रष्टाचार संपविण्याचे केलेले प्रयत्न का सफल होत नाहीत हे कळायला त्याचा उपयोग

होईल असे विद्यापीठ प्रमुखांना वाटते. यावरून अण्णांचं हे आंदोलन किती प्रभावी आणि महान झालं होतं लक्षात येईल. पण खरी गोष्ट ही आहे की या भ्रष्ट नेत्यांनी, राजकारण्यांनी व बिल्डरांनी तसेच सर्व खात्यांतीलच भ्रष्ट अधिकाऱ्यांनी यापासून बोध घेतला पाहिजे. पण याउलट ही भ्रष्ट मंडळी स्वतःला कट्टर गांधीवादी असल्याची छातीठोकपणे विधानं करीत मिरवतात. बिच्चारे गांधीजी हे सर्व पाहून स्वर्गातही 'हरे राम'चा जप करीत असतील वर असही म्हणतील 'देवा' या साऱ्यांना तू क्षमा कर कारण हे सारे अजाण आहेत यांना कळतच नाही की आपण काय करतो काय बोलतो आणि करतो, वागतो जसे या भ्रष्ट लोकांचे एकेक घोटाळे उजेडात येऊ लागले ना तशी मलाही एक कविता सुचली.

घोटाळे

घोटाळ्यांवर घोटाळे करतात, कधी तरी ते
उजेडात येतात
पकडले जाऊ या भीतीने, दडी मारून बसतात
शेवटचा उपाय म्हणून इस्पितळात दाखल होतात
कायद्याचे हात लांब असतात, म्हणून पकडले
जातात
पण काहीतरी करामती करून, डोकी लढवून
बाहेर येतात
जणू काही विशेष घडलचं नाही या थाटात
समाजात साळसूदपणे वावरत असतात
हाताखालचे, कनिष्ठ मात्र चौकशीला सामोरे
जातात
चौकशी अगदीच असह्य झाली म्हणजे आत्महत्या
करतात
कधी एकटे तर कधी कुटुंबासमवेत
पण घोटाळे मात्र अव्याहत चालूच राहतात
कुठे चारा घोटाळा तर कुठे स्टँप घोटाळा
मुद्रांक घोटाळा तर कोठे कोळसा घोटाळा
आणि सतत गाजणारा आदर्श हाही आहेच की
मोठा घोटाळा.
लोकसेवा आयोगात घोटाळे, शिक्षण खात्यात
घोटाळे
बांधकाम खात्यात घोटाळे, तसे वैद्यक खात्यातही
घोटाळे
घोटाळ्यांचे पीक देशात भरपूर आहे
पण तरीही माझा भारत देश महान आहे
येथे आश्वासनांचा पाऊस धो धो पडतो
आणि बिचारा गरीब शेतकरी, कामगार,
रस्त्यावरचा
मजूर मात्र नाहक मरतो, नाहक मरतो.

आतापर्यंत आपण या बड्या लोकांच्या घोटाळ्यांचे

कारनामे पाहिले. हे करताना त्यांनी सामान्य लोकांच्या हिताचा, पर्यावरणाचा मुळी विचारच केला नाही. नैसर्गिक संपत्तीची अगदी राजरोसपणे धूळधाण चालविली आहे. डोंगर, नद्या, खाड्या, सागर, जंगल झाडी ही सारी मानव-प्राण्यांच्या संवर्धन-रक्षणासाठी निर्माण झालेली नैसर्गिक संपत्ती आहे. याकडेही लोक कानाडोळा करतात पण त्यामुळे निसर्गाचा समतोल ढासळतो आणि भूकंप, त्सुनामी यांना हे लोक आमंत्रणच देतात. म्हणून माझ्या 'निसर्ग' या कवितेद्वारे त्या लोकांना सावध करण्याचा प्रयत्न

निसर्ग

अरे माणसा माणसा, नको होऊ उन्मत्त असा।
नको छेडू निसर्गाला, जाण त्याच्या सामर्थ्याला ।।
त्याने निर्मियल्या नद्या, नालेही निर्मियले त्याने।
तसे डोंगरदऱ्या, आणि पशुपक्षी बनविले।।
त्यांची नेमलेली कामे, करितात ते निष्ठेने।
नको आणूस तूं बाधा, त्यांच्या कार्यात तू स्वार्थाने।।
नको कुरघोडी, अशी स्पर्धा नको निसर्गाशी।
जर सोडिलास ताळ, रूप दावील तो विक्राळ।।
होत्याचे नव्हते तो रे, एका क्षणात करील।
मग सांगा रे पामरा, कोण कोणा वाचवेल।।
तुला देवानं दिल रं, बुध्दी, चातुर्य अपार।
नीट करून विचार, करी त्याचा रे वापर।।
नको ओढून घेऊ तूं, अशी आपत्ती स्वहस्ते।
सुखी ठेवी रे सर्वांना तू, जोडी निसर्गाशी नाते।।

स्वार्थाने अंध झालेल्या किंवा पछाडलेल्या म्हणा हवं तर या भ्रष्ट लोकांच्या डोक्यात कधी चांगले विचार घुसतील अशी आशा करणे व्यर्थ आहे असं यांचे कारनामे पाहून वाटतं. अहो, तीन तीनशे कोटीची मालमत्ता करून त्यावर १९ ठिकाणी छापे घातले गेले तरी ती मालमत्ता माझी नाहीच असे छातीठोकपणे म्हणून मीच स्वच्छ धुतल्या तांदळासारखा आहे अशी विधाने करणारे हे व ह्यांना पाठीशी घालणारे त्यांचे नेते म्हणजे अजब राजकारणाचा नमुनाच आहे.

हल्ली टी. व्ही. वरील कोणत्याही चॅनलवरील



बातम्या वा यांच्याबाबत होणारी चर्चा, परिसंवाद व जनताजनार्दनाची मतं अजमावून पाहिली तरी यांनी सगळ्यांचीच विश्वासार्हता गमावल्याचे चित्र दिसून येते. यांनी लोकशाही संकल्पनेला अगदी बदनाम करून टाकलं आहे असंच म्हणावं लागेल.

वात्रटिका

वाट

एक होती पायवाट
तिचा काय वर्णावा थाट
चालताना तिच्यावरुन
सारे पडायचे चाट

गल्ली ते दिल्ली

बोळ म्हणाला गल्लीला
तुझी खरंच कमाल आहे
तुझ्यामधून येरझारा करणारा
आज ना उद्या दिल्ली गाठणार आहे

- सुरेश देहेरकर

रस्ता अपघात - आपले कर्तव्य

राजश्री रामचंद्र खरे

सुरक्षा अभियान, स्वच्छता अभियान, आरोग्य अभियान अशी निरनिराळ्या अभियानांची कल्पना नेहमीच निघते. पण अभियान प्रत्यक्षात येण्याऐवजी कागदोपत्रीच राहतात. यातले कुठलेच अभियान फारसे यशस्वी होत नाही. याला कारण लोकांची झालेली वृत्ती. आज विचार केला तर सर्वच बाजूंनी मानवाची सुरक्षितता धोक्यात आली आहे. कधी बिल्डिंग पडून माणसे मरतात तर कधी मोठमोठ्या टॉवरला आग लागून पुरेशा सोयीअभावी माणसे मरतात. कधी साथीत मरतात तर कधी अपघातात. पण त्याचे सोयरसुतक कोणालाच नसावे. रस्त्यावरची बेवारशी कुत्री, मांजरे मरावीत, त्याचे दु:ख कोणाला नसावे. मेली तर मेली आपण कशाला पर्वा करायची ही मनोवृत्ती.

त्यामुळेच अपघातात मरणाऱ्यांबद्दल नुसतेच अरेरे म्हणून सोडून द्यायचे. त्याबद्दल काहीच उपाय करायचा नाही. याला कारण बदलती मानसिकता आणि वाढलेला भ्रष्टाचार. आम्ही काय कुणाचे खातो रे तो देव आम्हाला देतो रे असे म्हणत गुन्हे करायचे आणि देवाला दान देत सुटायचे. म्हणजे गुन्हे पचतात. अशी भावना आणि म्हणूनच अनेक अपघात करूनही अपघाताला कारणीभूत असलेला नुसताच उजळ माथ्याने फिरत नाही तर तोच गुन्हा वारंवार करतो. इतकेच नव्हे तर बेदरकारपणे गाडी चालविल्यामुळे चालताना कोणी एखाद्याला गाडीखाली चिरडले तरी तो जामिनावर सुटतो ही सत्यस्थिती आहे.

तूर्त काही अपघातांचा विचार करू. मध्यंतरी कोकण रेल्वेवर जेसीबी मशीन पडून झालेला अपघात आणि त्यामुळे झालेली मनुष्यहानी आणि रेल्वेचे नुकसान सर्वज्ञात आहे. घाटात बरेचवेळा वेगावर ताबा न राहिल्याने बस दरीत कोसळून झालेल्या मनुष्यहानीबाबतच्या बातम्या आपण नेहमीच वाचतो. कधी रस्त्यात एखादा टँकर उलटून तो पेटतो तर कधी बसच्या मागून येणारी गाडी बसस्टॉपवर बस थांबल्यावर वेग आवरता न आल्यामुळे बसवर जोरात आदळते. गाडी पेट घेते आणि आतली माणसे होरपळून मरतात. अशा एक ना अनेक बातम्या आपण रोज पेपरात वाचतो. त्यांची दृश्ये दूरदर्शनवर पाहतो. या साऱ्या अपघातांचा गंभीरपणे विचार करायची वेळ आली आहे. अपघातांची कारणे शोधून त्यावर ठोस उपाय केले गेले पाहिजेत. वाहनचालकांनी जर मनाशी पक्का निश्चय केला तर एकही अपघात होणार नाही. कारण अपघात घडण्याचे एकमेव कारण चालकाने नियम तोडणे हे होय.

मोठमोठे टॉवर्स आणि रस्त्यावर होणारे गाड्यांचे पार्किंग फारच त्रासदायक ठरू लागलेले आहे.

रस्ता अरुंद त्याच्या दोन्ही बाजूला बहुमजली इमारती अर्थातच खाली दुकाने आणि दुकानदारांनी अडविलेले फूटपाथ, त्यापुढे गाड्यांचे पार्किंग,

मध्येच मिळालेल्या छोट्याशा जागेत बसलेले विक्रेते आणि उरलेल्या जागेतून जीव सांभाळून जाणारे बिच्चारे पादचारी. ट्रकपासून सायकलपर्यंतची सारी वाहने या रस्त्यावरून मार्ग काढत असतात. दर पंधरा मिनिटांनी होणारा ट्रॅफिक जॅम. आणि त्यातून घाईने वाट काढण्याच्या प्रयत्नात अपघात घडविणारे वाहनचालक हे सर्वत्र दिसणारे दृश्य आहे.

हे अपघात घडण्याचे सर्वात मुख्य कारण वाहनचालकांना दिले जाणारे परवाने-भारतात ट्रकसारखी अवजड वाहने किंवा इतर कुठलीही वाहने किंवा इतर कुठलीही वाहने चालविण्याचे परवाने कोणतेही शिक्षण (वाहन चालविण्याचे) घेतले नसताना घरपोच आणून दिले जाते. तर कधी साध्या रस्त्यावरून थोडीशी गाडी चालविली तरी परवाना दिला जातो. थोडक्यात काय गाडी चालविण्याचे कोणतेही शिक्षण नसताना त्याच्या हातात असा परवाना आहे तो अपघाताशिवाय काय करणार ? घाटात गाडी चालविण्याचे नियम वेगळे असतात, गाडी उतारावर चालविताना ब्रेकवर ताबा कसा ठेवायचा हे सारे शिकावे लागते. त्यातून अगदी नियमाने वागून एखाद्या चालकाचा परवाना रद्द झाला तर तो दुसऱ्या भागातून परवाना मिळवतो त्यामुळे आपल्याकडे नियम आहेत पण त्याची अंमलबजावणी होत नाही.

ज्या चौरस्त्यांच्या जवळ मुलांच्या शाळा आहेत तेथेही अपघात होतात. जेव्हा मी नातवाला आणायला शाळेत जाते तेव्हा तेथली परिस्थिती पाहून पोटात भीतीचा गोळा उठतो. शाळा सुटली की मुले सैरावैरा धावत असतात. चारी बाजूंनी सर्व प्रकारच्या गाड्या येत असतात मग धावणारी मुले कधी सायकलवर आदळतात तर कधी रिक्षा समोर येतात. अमेरिकेत जेव्हा शाळा भरायची वेळ असते, मुले रस्ता ओलांडून जातात अशा वेळी शाळा भरायच्या आणि सुटायच्या वेळेत स्वयंसेवक गाड्यांना थांबविण्यासाठी फलक घेऊन उभे राहतात. जेव्हा स्कूलबस स्टॉपवर थांबतात तेव्हा चालकाच्या बाजूला एक बाण असतो तो बाण बाहेर काढला जातो. बसमधून उतरलेली मुले जाईपर्यंत सर्व गाड्या जागीच थांबतात. आपल्याकडे फक्त गाड्या त्यांच्यासारख्या पिवळ्या रंगाच्या झाल्या पण बाकी सुरक्षितता नाही. शाळेत मुलांना सोडणाऱ्या रिक्षात किती मुले कोंबली जातात यावर तर न बोललेलेच बरे. तेव्हा आपल्याकडेही शाळा सुटताना व भरताना अशा प्रकारे गाड्या

थांबविण्याची सोय झाली पाहिजे.

त्यामुळे सर्वच गोष्टी कायदा करून होत नाहीत.

प्रत्येकाने आपली मानसिकता बदलली पाहिजे. स्वतःची स्वतःला शिस्त लावून घेतली पाहिजे. प्रत्येक चालकाने ठरविले पाहिजे माझ्यामुळे दुसऱ्याचे प्राण जाणार नाहीत, कोणाला इजा होणार नाही याची मी काळजी घेईन. मी वेगमर्यादा सांभाळीन. वाहन चालविण्याबाबतचे नियम काटेकोरपणे पाळीन. बरेचसे नियम हे आपल्या सुरक्षिततेसाठीच असतात हे लक्षात ठेवून वागले पाहिजे. हेल्मेट घालणे, सीटबेल्ट लावणे हे नियम आपल्या सुरक्षिततेसाठी आहेत मग त्यांचा आळस कशाला करायचा? कमीत कमी याचा वापर न केल्यामुळे आपल्याला पकडण्याची संधी पोलिसांना देऊ नये.

आणखी एक जाणवलेली गोष्ट सुरक्षा अभियान हे मर्यादित काळापुरते राबविले जाते. त्या काळात जिकडे तिकडे पोस्टर्स लावलेली असतात. बारकाईने पाहिले तर या काळात अपघात कमी होतात. का तर पोलीस जागृत राहून काम करीत असतात. चालकाला माहीत असते आता नियम तोडले तर माझी धडगत नाही. एवढी काळजी घेतल्यावर अपघात कमी होत असतील तर हे अभियान कायमच का राबविले जाऊ नये? शेवटी त्यात वेगळे काय आहे? ठराविक काळासाठी प्रत्येकाने कर्तव्यदक्ष राहायचे एवढेच!

थोडक्यात काय चालकाने नियमानुसार वागावे. पादचाऱ्यांनी रस्त्यात गप्पा मारत उभे राहून रहदारीचा खोळंबा करू नये आणि ट्रॅफिक पोलिसांनी, परवाने देणाऱ्यांनी आपले कर्तव्य चोख बजावावे म्हणजे बघा अपघात कमी होतात की नाहीत?

With Best Compliments From

PRAFULL

AUTO CONSULTANT
R.T.O. & INSURANCE AGENT

KIT FITTING CENTRE

Hiranchand Desai Road, Municipal Market, Shop No. 8,
Ghatkopar West, Mumbai - 400086
Tel. - 25106644 / 25162345

रस्ते सुरक्षा - शुन्य अपघात

चारुलता कुळकर्णी

विख्यात वाहतूक तज्ज्ञ बुचानन यांचे म्हणणे आहे की, 'आपण एक धोकादायक गोष्ट म्हणजे आपण त्याच्यावर प्रेमही करतो. मोटार वाहन ही एक भयानक समस्या आहे जी आमच्या जीवनात विषही कालवू शकते'.

एखादे निष्पाप जीव जे रस्त्यांवरील अपघातात व्यर्थ-वाया गेले, त्या सगळ्यांच्या नातेवाईकांना काय वाटेल? किती तरी माता, पत्नी, बंधूभगिनी, वडील जे सर्व आयुष्यभर त्या निरपराधी जिवांच्या निधनाने होरपळून निघालोत. त्यांच्याजवळ आता आठवणी व अश्रूंशिवाय आता काही नाही. निव्वळ आयुष्यभर भेडसावणारे दु:ख आहे.

सकाळी पेपर उघडल्यावर किंवा टी.व्ही. चे बटन ऑन केल्यावर रेल्वे अपघात, गाड्यांचे अपघात, ट्रकने किंवा डंपरने मोटार उडवल्याने झालेले अपघात, कुटुंबातील सदस्य उद्ध्वस्त झालेले. एवढेच नाही तर शोरूममधून नवीन मोटार घरी आणताना ट्रकच्या धडकीत एक पूर्ण परिवार काळाच्या जबड्यात गडप, चार तरुणींचा रस्ते अपघातात मृत्यू. अशा एक नाही तर अनेक प्रकारच्या अपघातांची बातमी आपल्याला मिळते. घरचा कामावणारा एकुलता एक मनुष्य अपघातात मरण पावल्यास, त्या पूर्ण कुटुंबाची वाताहत होते. म्हणूनच 'रस्ते सुरक्षा' ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

गेल्या काही वर्षात रस्त्यांवर मोटारगाड्यांचा जणू 'पूरच' आलेला आहे. भारतात जवळजवळ दोन कोटी पन्नास लाख वाहने आहेत. प्रत्येक वर्षी जवळजवळ २० ते २२ लाखांची भर पडते. ह्या प्रगतीबरोबर अपघातही वाढत चालले आहेत. रस्ते असुरक्षित असल्यामुळे प्रत्येक वर्षी ह्या देशात होणाऱ्या तीन लाख अपघातांत पन्नास हजार जीव मृत्युमुखी पडतात. अडीच ते तीन लाख लोक जखमी होतात. हे भयानक आकडेच आपल्याला 'अपघात' रोखण्यासाठी आणखी किती प्रयत्न करण्याची गरज आहे, हे अधोरेखित करतात.

मानवी जीवनाच्या दैनंदिन गरजांची व्याप्ती अन्न, वस्त्र व निवारा ह्या पलीकडेही वाढलेली असल्यामुळे गतिमान जीवन ही अलीकडे काळाची गरज आहे. थोडक्यात काम, काळ, वेग हेच

आपल्या जीवनाचे सूत्र झालेले आहे. त्यामुळे वेळेशी जमवून घेणे अत्यावश्यक झाले आहे.



गतीमुळे आर्थिक प्रगती झाली. पैशाचा जास्तीत जास्त उपयोग व उपभोग करण्यावर भर दिला गेला. आपल्याला मर्यादांचा विसर पडला म्हणूनच गाड्यांचा महापूर दिसू लागला. 'रस्ते सुरक्षा', 'रस्ते दुरुस्ती' हे गाड्यांपुढे लोटांगण घालू लागले. परिणाम अपघातांचे प्रमाण वाढले.

जगभरात अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अनेक देश ते कमी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करीत आहेत. रस्ता सुरक्षेचे महत्त्व लक्षात घेऊन युनोने २०१० मध्ये २०१० ते २०२० हे दशक आंतरराष्ट्रीय रस्ते सुरक्षा दशक म्हणून घोषित केले. म्हणजेच भारताचा रस्ते सुरक्षेसाठी केल्या जाणाऱ्या उपायांमध्ये क्रमांक किती खालचा आहे हे स्पष्ट होते.

वाहनांची वाढती संख्या हे सर्वांत मोठे रस्ते अपघाताचे कारण आहे. सततच्या वेगामुळे अपघात, प्रदूषण, रस्ते नादुरुस्त, खराब होणे, लोकांना रस्ते ओलांडताना होणारा अपघात, रस्त्यावरील वाहनांची टक्कर, रस्त्यामध्ये निर्माण होणाऱ्या खड्डयांमुळे वाहनांचा अपघात ह्या सर्व समस्या निर्माण होतात. ह्या सर्व समस्यांचा परिणाम म्हणजे निष्पाप जीवांचा मृत्यू-अंत किंवा जखमी !

'रस्ते सुरक्षा' हा विषय गांभीर्याने घेऊन उपाययोजना, उद्दिष्टे आणि तंत्रज्ञानाचा मिलाफ घडवून जपानमध्ये शून्य अपघातांचे लक्ष्य ठेवले आहे असेही माझ्या वाचनांत आले आहे.

इंग्लंडमध्ये रस्ते सुरक्षा आणि रहदारीच्या नियमांची माहिती म्हणे लहानपणापासूनच मुलांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला जातो. अपघाताला कारणीभूत असणाऱ्या वाहनांचा वेग कमी करण्याचा प्रयत्न केला. मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करता यावी म्हणून नियम तयार केले.

सिंगापूरसारख्या देशाने तर वाहनांच्या खरेदीवर काही बंधने आणली. वाहनांची संख्या मर्यादित ठेवण्यासाठी एखाद्याला नवीन वाहन द्यायचे असेल तर त्याला त्याचे जुने वाहन भंगारात काढावे लागेल. या उटल आपल्याकडे परिस्थिती आहे. रस्ते अरुंद, रस्त्यांवर जागोजागी पडलेलं खड्डे, पदपथावर दुकानदारांचा कब्जा, पदपथावर असणारा कचरा, भिकाऱ्यांची वसाहत अशा परिस्थितीत पादचारी रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन कसेबसे चाललेले दिसतात. पावसाळ्यात

खड्ड्यांत तुंबलेले पाणी अंगावर घेत कसे तरी बिचारे पादचारी वाट काढीत जाताना दिसतात. कांही ठिकाणी पदपथाच्या जागेवर आपापली दुकाने थाटात मांडून बसलेले विक्रेते दिसतात. पदपथाच्या बाजूलाच रस्त्यावर गाड्या पार्क

केलेल्या असतात. रस्त्यावर गाड्या, दुचाकी, रिक्षा यांची जणू धावण्याची शर्यतच असते. अशा बिकट परिस्थितीत माणसांनी कोठून व कसे चालावे हे कळतच नाही. कारण आपल्याकडे अशी अवस्था

असताना पार्किंगला जागा नसतात, वाहनांची संख्या मात्र वाढतच आहे. ह्याबाबत असे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

आपल्याकडे मात्र, 'दुसऱ्याच्या जिवाचे काही कमी-जास्त झालं तर मला काय त्याचे?' ही वृत्ति फोफावली आहे. काही वेळा तर वाहतुकीच्या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याऐवजी अनेक वेळा वाहतूक पोलिसच तडजोड करतांना दिसतात. कधी अधूनमधून आपल्याकडे 'रस्ता सुरक्षा अभियान' सुरू केले जाते. अशा वेळी लोक ऐकतात, सहकार्य करतात. तेवढा कालावधी दोन-तीन आठवड्यांकरिता तरी 'जनजागृती' झाल्यासारखे वाटते पण पुढे काय? येरे माझ्या मागल्या ह्यासाठीच प्रत्येक लोकांकडे, यंत्रणांकडे, संस्थांकडे, सरकारकडे आपले रस्ते सुरक्षित असावेत त्यावर अपघात होऊ नयेत, ही वृत्ति असायला पाहिजे. 'रस्ते सुरक्षा' या विषयाचा शालेय शिक्षणात समावेश करायला हवा. ह्यासाठी कठोर दंडात्मक कारवाई, रस्त्यांचे सक्षमीकरण, लोकांसाठी स्वच्छ पदपथ, फेरीवाल्यांसाठी विक्रेत्यांसाठी योग्य क्षेत्राची निवड, सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करणे, जनजागृति करणे रस्ते, दुरुस्तीसाठी सुरक्षेसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करणे ह्या सर्व उपाययोजना हळूहळू राबविल्या पाहिजेत, ही काळाची गरज आहे. कारण अपघातांचा आकडा हळूहळू वाढत चालला आहे, ही गांभीर्याची गोष्ट आहे. रस्त्यांवरील दुरुस्तीची कामे, खड्डे, पदपथावरील विक्रेते, झोपड्या, भिकारी, वाहनांचा वेग +धूर-वाहक व चालक यांना योग्य शिक्षणाचा अभाव, लोकांच्या चुका, पाऊस, धुके, मिरवणुका, रात्रीची वाहने चालविणे, गाड्यांसाठी पार्किंगची व्यवस्था, लोकांचा ताणतणाव, धका-धकिचे जीवनमान, मद्यपान करून गाडी चालवणे इत्यादी कारणे किंवा, ज्यामुळे अपघात घडतात ती नष्ट करण्याचा प्रयत्न करणे.

आपल्याकडे वाहतुकीचे नियम न पाळण्याबद्दल लोकांची मानसिकता सर्वांत अधिक आहे. ही मानसिकता घातक आहे. लोकांची भावना, त्याने नियम पाळले नाहीत, मग मी का पाळायचे? ही असते. काहींना तर कुठलेच नियम पाळायची इच्छाच नसते. अपघातांचा आकडा वाढविण्यात तुम्ही, आम्ही, सरकारी यंत्रणा, वाहनचालक सर्वच जबाबदार आहेत. आता सगळ्यांनाच 'शून्य अपघात'वर लक्ष केंद्रित करावे लागेल.

''माणसाला जन्म एकदाच मिळतो तो

अपघातामुळे कोमेजू नये, खुडला जाऊ नये'' याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे.

रस्ते अपघात आणि माझी भूमिका

विद्या उजवणे पडवळ

''अग परवा मकरंदला ॲक्सिडंट झालाय. कुलकर्णी डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे तो. काल म्हणे त्याच्या पायामध्ये रॉड टाकला. आज संध्याकाळी पाच वाजता आम्ही त्याला भेटायला चाललोय तूही ये.'' सकाळी सकाळीच स्मिताचा फोन आला. मला एकदम धस्स झालं. मकरंद आणि अपघात? मकरंद हा माझ्या मैत्रिणीचा मुलगा. अतिशय सालस, संयमी, मर्यादशील! सावधपणे, काळजीपूर्वक बाइक चालवणारा! त्याला कसा काय अपघात झाला? मनात दिवसभर या प्रश्नाचे काहूर उठले होते. संध्याकाळी हॉस्पिटलमध्ये मी पोहोचले. बाकीच्या मैत्रिणीसुध्दा आल्या. मकरंदच्या पायात रॉड घातला होता. तसा तो बराच सावरलेला दिसत होता. बेडवर झोपूनच होता, ''अरे, तुला अपघात कसा काय झाला?'' माझा प्रश्न मलाच स्वस्थ बसू देत नव्हता. मकरंदकडून कळलं की, तो नेहमीप्रमाणे सावकाश बाइक चालवत होता. रस्त्यामध्ये होता आणि अचानक समोर मोठा खड्डा आला. बाइक बाजूला घ्यावी तर बाजूने गाड्या वेगाने जात होत्या. त्याने एकदम ब्रेक लावला तसा मागून आलेल्या स्कूटरने त्याला धक्का दिला आणि बाइकसहित तो त्या खड्ड्यातच पडला. परिणामी पाय फ्रॅक्चर झाला.

दोन दिवस शोभा घरी कामाल आली नाही म्हणून तिच्या घरी चौकशीला गेले तेव्हा समजलं की शोभाच्या नवऱ्याला अपघात झाला आणि तो सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. दवाखान्यात गेल्यावर शोभा भेटली. तिने सांगितल्यानुसार तिचा नवरा रस्ता ओलांडत होता. समोरून येणारी कार त्याला पाहून थांबली पण कारच्या बाजूने येणाऱ्या रिक्षावाल्याला हा दिसलाच नाही. रिक्षा वेगात होती. तिने याला उडवला.

ही अशी उदाहरणं पाहिली की मन विषण्ण होतं. आज ऐन विशीतला मकरंद पायात रॉड घालून फिरतो आहे. शोभाच्या पतीच्या मणक्याला जबर मार बसल्यामुळे अंथरुणाला खिळला आहे. यात दोष कोणाचा? रस्त्यात अचानक खड्डा समोर आला आणि मकरंदला अपघात झाला. असे जीवघेणे खड्डे रस्त्यात जागोजागी अचानक पुढे येतात. अपघातांच्या संदर्भात रस्त्यांच्या स्थितीचाही विचार होणे आवश्यक आहे. आमच्याकडे नवीन रस्ते बनवतात, पण सहा महिन्यांतच त्यांची दुर्दशा झालेली दिसते. काँक्रीटच्या रस्त्यांचा दर्जा तर इतका सुमार असतो की एक तर ते अतिशय खडबडीत असतात, त्यांच्या सांधणी (joint) मधील

काँक्रीट निघालेलं असतं, त्यामुळे या रस्त्यावरून जाताना वाहने, विशेषतः दुचाकी वाहने शब्दशः खडखडत जातात. पावसाळ्यात रस्त्यावरील

खड्ड्यांत पाणी साठलं की त्या खड्ड्यांचा त्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही, त्यामुळे मग अपघात ठरलेला! मी स्वतः पावसाळ्यात दोनदा अशी स्कूटरवरून पडले आहे.

आपल्याकडे मधून मधून पेव्हर ब्लॉक बसवतात, पण तसेही रस्त्याची पातळी (level) बिघडणे, रस्ता वरखाली होणे असे प्रकार होतात. मध्यंतरी पेव्हर ब्लॉकचा रस्ता अचानक खचल्यामुळे मुंबईत एका ट्रकचा अपघात झाला होता. या पेव्हर ब्लॉकवरून जाताना दुचाकी गाड्या अक्षरक्षः खिळखिळ्या होतात. रस्त्यात मधूनच ड्रेनेजचे मेन होल दिसतात ते कधी रस्त्याच्या पातळीपेक्षा वर असतात तर कधी खाली असतात. खाली असतील तर त्या ठिकाणीही खड्डेसदृश जागा तयार होतात. (उदाहरणादाखल ठाण्यातील टेलिफोन एक्सचेंज कडून कोपरी पुलाकडे जाणारा रस्ता पाहावा.) या जागाही अपघाताला निमंत्रण देतात.

शोभाच्या नवऱ्याच्या बाबतीत जे घडले ती तर आपली फार मोठी समस्या आहे. आमची रस्त्यावरची वाहतूक चालणाऱ्या लोकांचा कधी विचारच करत नाही. कुठल्याही चौकात काय किंवा रस्त्यावरून काय, चालणं आणि रस्ता ओलांडणं एक दिव्य झालं आहे. सगळीकडून वाहनं येत -जात असतात. कुणीच थांबायला तयार नसतं. मग चालणाऱ्यांनी रस्ता ओलांडायचा केव्हा आणि कसा? माणसं रस्ता कसा ओलांडतात हे ठाण्यातील तीन हात नाका, आंबेडकर चौक, समर्थ भांडार (आता टायटन शोरूम) वगैरे ठिकाणी पाहावे. जीव मुठीत धरून, येणाऱ्या गाड्यांना चुकवत त्यांच्यामधून पळत पळत लोक रस्ता ओलांडत असतात. फूटपाथवरून चालावं म्हटलं तर फूटपाथ फार कमी रुंदीचे असतात. त्यातून त्यांचा बराचसा भाग हा फेरीवाल्यांनी व्यापलेला असतो. फूटपाथच्या फरश्या बऱ्याच ठिकाणी उखडलेल्या असतात. मध्येच असलेल्या ड्रेनेजची जाळी निघालेली असते. अचानक त्यात पाय जाऊन पडण्याची शक्यता वाढते. रस्त्यावरुन चालावं म्हटलं तर दोन्ही बाजूंना गाड्या पार्क केलेल्या असतात. येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांनाच कशीबशी वाट मिळते. त्यातून चालणाऱ्या लोकांनी कसं चालावं? वृध्दांना तर रस्त्याने चालायची, रस्ता ओलांडायची सोयच राहिलेली नाही. पाश्चात्त्य देशात चालणाऱ्या लोकांचा प्रथम विचार केला जातो. लोकांना रस्ता ओलांडताना पाहून येणाऱ्या-

जाणाऱ्या गाड्या थांबतात. आपल्याकडे प्रचंड लोकसंख्येमुळे ही गोष्ट शक्य नाही कारण मग गाड्यांना थांबूनच राहावे लागेल; मग चालणाऱ्या

लोकांसाठी काय करावं ? मला वाटतं की, आपल्या सिग्नलयंत्रणेत त्यासाठी थोडा बदल करावा. चौकात सिग्नल असतात. सर्व रस्त्यासाठी ते एकदा देऊन झाले की सर्व सिग्नलवर एक मिनिट लाल दिवाच ठेवावा त्यामुळे सर्व दिशांची वाहने थांबून राहतील आणि त्यावेळी चालणाऱ्या लोकांना रस्ता ओलांडू द्यावा त्यामुळे वृध्द, लहान मुले,

हातात जड सामान, पिशव्या असलेले लोक ....सर्वांनाच रस्ता ओलांडणं सहजसुलभ आणि निर्धोक होईल.

मोबाईलवर बोलत रस्ता ओलांडणारे तरुण ही एक नवीनच समस्या आता निर्माण झाली आहे. मोबाईलवर बोलण्यात किंवा इयरफोन लावून गाणी ऐकण्यात ही मुले इतकी दंग असतात की कितीही हॉर्न वाजवला तरी त्यांना तो ऐकूच येत नाही. त्यामुळे एखाद्या वेगात असलेल्या गाडीचा ब्रेक दाबला गेला नाही तर अपघात होऊ शकतो म्हणून रस्त्यावरून चालतांना मोबाईल वापरलात तरी रस्ता ओलांडताना मोबाईलवर बोलू नये, असा नियम करावा.

पुष्कळ वेळा असं होतं की, निम्मा रस्ता नवीन केला की त्याची पातळी (level) वाढते व जुना निम्मा रस्ता मग खाली राहतो. त्यामुळे अशा वेळी वाहनं चालवताना त्रास होतो. तेव्हा रस्ता बनवताना, एकाच रस्त्याची पातळी समान राहील याची काळजी घ्यावी.

आपल्या रस्त्यांमध्ये स्पीड ब्रेकर्स हीसुध्दा चिंतेची गोष्ट आहे. काही रस्त्यांत ते अर्धवट उखडून टाकलेले तर जेथे आहेत तेथे ते तुटलेल्या स्थितीत आहेत. म्हणजे एका दिशेने गाडी स्पीड ब्रेकरवरून वर न्यावी आणि पुन्हा खाली उतरताना त्या ठिकाणी स्पीड ब्रेकरचा भागच तुटला आहे, अशी स्थिती असेल तेव्हा अपघातांची शक्यता वाढते. तेव्हा स्पीड ब्रेकर्स योग्य स्थितीत असावेत. तसेच ते गडद रंगात रंगवून फार लांबूनही दिसतील याची काळजी घ्यावी.

महामार्गावर होणारे अपघात, विशेषतः रात्रीच्या वेळी, ते सुध्दा खूप अस्वस्थ करतात. लोकांनी शक्यतो रात्रीचा प्रवास टाळावा. तो करणे आवश्यकच असेल तर ड्रायव्हरने सावध आणि जागरूक असावे. कधी कधी सुग्रास असे समारंभाचे जेवण जेवल्यानंतर ड्रायव्हरला आलेल्या डुलकीमुळेही अपघात झाले आहेत. तेव्हा गाडी चालविताना ड्रायव्हरने झोप येणार नाही याची काळजी घ्यावी. वेगावर नियंत्रण ठेवावे. ओव्हरटेक करताना पूर्ण दक्षता घ्यावी.

'वाहतूक सुरक्षा वाहनचालक एकदिलाने काम करू' हे अपघात टाळण्यासाठी जितके आवश्यक आहे, तितकेच रस्ते सुस्थितीत असणे हेही गरजेचे आहे. त्यामुळे अपघात टाळणे, निदान कमी करणे शक्य होईल.

सुरक्षा कवच

श्वेता स्वप्निल डाबरे

आजच्या धावपळीच्या आयुष्यात सर्वांना घाई असते प्रत्येकाला लवकरात लवकर पोहोचायचं असतं. काही आपले वाहन म्हणजे मोटारसायकल तर काही कार, काही बसेसने जातात. आपल्या स्वतःच्या वाहनाने जायचे असले तरी उशीर होईल म्हणून वाहतुकीचे नियम तोडतात तर काही अतिवेगाने गाडी चालवत असतात, जिवाशी खेळतात. परिणाम अपघातच होत असतो. 'अति घाई संकटात नेई' म्हण खरी ठरते.

'सुरक्षा' म्हटलं की प्रत्येकाने आपल्या जिवाची काळजी घेणे. सुरक्षा म्हणजे मोठ्यातल्या मोठ्या संकटातून वाचविणारे कवच आहेत. या जगात प्रत्येक जिवाला मग ते मनुष्य, पक्षी असो किंवा पशू (जनावरं) त्यांना सर्वांना आपल्या जिवाची काळजी असते. त्यांना सतत काळजी असते की माझ्या जिवाला काही इजा होऊ देणार नाही.

छोट्या पक्ष्यांना उडता येत नाही म्हणून ते चालत असताना मागेपुढे करत असतात. त्या चिमण्या पक्ष्यांची आई त्यांना काळजीने सोबत घेऊन त्यांना उडण्याचे शिकवते. (त्यांना थोड्या कमी उंचीवरून ढकलत असते) मोठ्या हिंसक पक्ष्यांच्या डोळ्यांपासून आपल्या पिलांचे रक्षण करत असते.

जनावरांचे पण जीवन पक्ष्यांचे जीवनासारखेच असतं. गाई, म्हशी, बकरी आणखी ह्यांच्यासारखं जीवन आपले. लहान पिलांची काळजी घेत असतात, त्या त्यांना थोडं मोठं झाल्यानंतर त्यांच्यासोबत घेऊन स्वतःचे रक्षण करायला शिकवतात. जंगलामध्ये हिंसक प्राण्यांच्या तोंडातून वाचविणे ही जंगलामध्ये राहणाऱ्यांची काळजी, ते आपल्या छोट्या पिलांना सुरक्षा कवच तयार करून देतात. म्हणजे एखाद्या गृहे (गुफा) मध्ये ठेवत असतात. जेणेकरुन पिलांचे जीव सुरक्षित राहतात. मोठं झाल्यानंतर ते स्वतंत्रपणे जंगलामध्ये राहू शकतात. कुणी त्यांच्यावर डोळा ठेवून आहे? आपलं भलं कोणत्या ठिकाणी होणार किंवा सुरक्षित राहू हे सर्व माहिती केल्यानंतर निर्भयपणे राहतात. ज्या ठिकाणी जास्त धोका असतो त्या ठिकाणी ते जात नाहीत. तेवढी काळजी घेतात. मनुष्यजीवनात प्रत्येक क्षणी, घरी असो किंवा बाहेर सावध राहावं लागते उठल्यापासून ते झोपेपर्यंत काळजी घ्यावी लागते. म्हणजे बाथरूममध्ये पाय घसरू नये, किचनमध्ये सुरक्षा कवच घालून गॅस शेगडीपासून सुरक्षा करणे, लहान मुलं उंचीवरून खाली पडू नयेत त्याची काळजी घेणे. बाहेर जाताना चोरांपासून आपल्या घराची सुरक्षा करणे, रस्ता ओलांडताना गाड्या बघून व्यवस्थित दुसऱ्या बाजूला पोहोचणे हे सर्व सुरक्षित राहण्याचे उत्तम

उपाय आहेत.

अपघातांची संख्या वाढू नये किंवा होऊ नये म्हणून काही सुरक्षा अभियान सुरू केले जातात. ह्या अभियानामध्ये वाहतुकीबद्दल माहिती दिली जाते. म्हणजे वाहन चालवणाऱ्यांना काळजीपूर्वक वाहन चालवण्याचे सांगितले जाते. मोटार गाडी चालकांनी हेल्मेटचा वापर करून आपले रक्षण करावे. कार किंवा मोठी गाडी चालवताना सीटबेल्टचा वापर करावे. नयवेवर गाडी चालवत असताना चढा-ओढी (ओव्हरटेक) नाही करायचं. प्रत्येक वाहनाला एक विशेष वेग मर्यादा आणि कोणत्या बाजूने गाडी ठेवायची, हायवेवर चित्राद्वारे सांगितलं जाते. रात्रीच्या वेळी मद्यपान करून गाडी न चालवणे, रात्री गाडीचे लाइट्स व्यवस्थित सुरू-बंद करणे, कोणत्या वेळी कोणते लाइटचे वापर करणे हे सर्व अभियाना मध्ये सांगितलं जाते. अभियानाचे मुख्य कारण म्हणजे काळजी घेणेच आहे.

वाहतूक कोंडी हे आणखी एक सुरक्षामध्ये बाधा घालणारे कारण आहे. काही रस्ता खराब असल्यामुळे ट्राफिक जाम होतात. पावसाळ्यात किंवा हिमपातामुळे सर्व जाण्यायेण्याने रस्ते बहुतेक वेळा बंद असतात किंवा हळूहळू सुरू असतात. ह्या परिस्थितीमध्ये हॉर्न वाजविण्यापेक्षा संयमाने थांबून कार्य कारणाऱ्यांची मदत करावी. वाहतुकीचे नियम तोडणे हे पण अपघातास कारण ठरते. काही चालक लाल सिग्नलवर गाडी न थांबवता निघून जातात परिणामी समोरच्या बाजूने येणाऱ्या गाडीमुळे अपघात होतात. स्वतःच्या चुकीमुळे अपघात होऊ नये ह्याची काळजी प्रत्येक चालकाने घ्यायला पाहिजे. हेच लक्षात ठेवून सावध राहायला पाहिजे.

सुरक्षित जीवन जगणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. ह्याच्याकरिता वाहन चालवत असताना किंवा रस्ता ओलांडताना वाहतुकीचे नियम पाळून स्वतःचे आणि इतरांचे जीवनाचे कवचाप्रमाणे रक्षण करणे, हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा व्हायला पाहिजेत, जेणे करून पुढच्या वेळेस व्यक्ती लक्षात ठेवून गाडी चालविणार. दंड पडल्यानंतर प्रत्येक व्यक्ती सुरक्षित अभियानमध्ये मदत करते.

काही छान ओळी आहेत, ज्या आपल्याला मध्येमध्ये आठवण करून देतात की आपलं जीवन किती अमूल्य आहे.

सावकाश, पुढे वळण आहे.

ड्रायव्हर अप्पा मारू नका गप्पा.

दुर्घटना से देरी भली

जान है तो जहान है

धीरे चलाए घर पर कोई आपकी राह देख रहा है

आणखी काही चित्रांद्वारे दाखवून रक्षण कवचचे काम करतात.

सुरक्षा अभियानमध्ये मदत करून सर्वांचे रक्षण कवच बनणे हे कर्तव्य आहे; त्याचबरोबर जबाबदारी सुध्दा आहे. ज्याप्रमाणे युध्दामध्ये सुरक्षा कवच त्यांच्या जिवाची रक्षा करतो, त्याचप्रमाणे वाहतुकीचे नियम आपली सुरक्षा कवच आहेत. सर्वांनी सहभागी होऊन कवच घालून युध्द जिंकावे हीच विनंती.

''सुरक्षित प्रवास आनंदी प्रवास.'"

गती व गतीमानता

कै. स. गो. बिवलकर

वेग = गती
वेग=तारूण्य
वेग=जोम
वेग=उत्साह
वेग=धडाडी
वेग=साहस
वेग=मर्दुमकी
वेग=हिंम्मत
वेग=फाजील आत्मविश्वास
वेग=आत्मघात

आपल्या दुचाकीवर रुबाबात स्वार झालेल्या कॉलेज कुमाराला जेव्हा मी वेग म्हणजे काय विचारलं तेव्हा तो असं म्हणाला पपा शेवटचे दोन अर्थ मी त्याला समजावीत होतो. तरुणामध्ये असा वेग, आवेग बघायला कोणाला आवडणार नाही. पण हे सगळं योग्य वेळी, योग्य स्थळी घडायला हवं तरच त्याला खरा अर्थ नाहीतर ?

आकाशाला गवसणी घालणारा हा तरुण अशी भरारी घेतो की त्याच्या निर्जीव, निःचेष्ट कलेवरावर त्याच्या आईबाबांना फुलमाळा चढवावी लागते. तारुण्यात वेग असावा, जोम असावा पण इच्छित ध्येय गाठण्यासाठी, आयुष्याची होळी करण्यासाठी नव्हे, आपल्या जीवनापेक्षा, आपल्या बाइकच्या वेगावर प्रेम करणारी ही तरुण मंडळी आपल्या गंतव्य ठिकाणी वेळेच्या अगोदरच पोहोचतील का ? शेवटी प्रश्न पडतो काय मिळवलं ह्या तरुणांनी अपघात नव्हे आत्मघात.

अपघात हा शब्द मुळातच काहीतरी भयंकर असल्याची सूचना देतो. दुदैवाने या शब्दाची दाहकता जोपर्यंत काही घडत नाही तोपर्यंत लक्षात येत नाही. आज सार्वजनिक मृत्यूंचे प्रमाण हे रस्त्यावर होणाऱ्या अपघाती मृत्यूंचे आहे. मानवी चुकांमुळे घडणारे अपघात टाळता येणासारखे आहेत. ९०% अपघात टाळता येऊ शकतात. मानवी चुका अनेक असतात; पण येथे आपण फक्त एका चुकीबद्दल विचार करणार आहोत आणि ती

चूक म्हणजे गती-विशेषतः कॉलेजतरुणांमध्ये हे वेगाचे वेड-धूम स्टाईल, रायडिंग विशेष आवडीचे.

प्रथम एक अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्ट लक्षात घ्यां असं म्हटलं जातं की चुका करणे हा मानवधर्म आहे आणि क्षमा करणे हा त्या ईश्वराचा धर्म आहे. पण वाहन संचलनाच्या बाबतीत हा नियम लागू होत नाही. वाहन संचालन हा त्या नियमांचा अपवाद आहे. इथे तुमच्या कुठल्याही चूकीला मग ती कितीही क्षुल्लक असो क्षमा नाही. प्रत्येक चुकीला शिक्षा ही आहेच कधी कधी तर मृत्यूलाही सामोरं

जावं लागतं.

सामान्य जीवनात झालेली चूक सुधारण्यासाठी संधी मिळते पण इथे तर तेही संभवत नाही. म्हणूनच स्वतः एकही चूक न करता इतरांच्या चुकीच्या वागणुकीचा अंदाज येत प्रतिकूल परिस्थितीतून अपघातविरहित संचलन करणे ही एक शास्त्रीय



कला आहे.

गतीमुळे निर्माण होणारी पहिली अडचण म्हणजे निर्णय घेण्यास मिळणारा अत्यंत कमी वेळ.

तुमचे डोळे चित्र काढते दृष्टिपटावर
डोळ्यांच्या
मेंदूलाही खबर देतसे संभावित त्या धोक्याचा
विचार करणे, कृती मग करणे काम असे हे
मेंदूला सेकंदाचा समय लागतो प्रतिक्रिया
म्हणती त्याला ।।

हा वेळ व्यक्तीपरत्वे बदलू शकतो. वय, लिंग, शिक्षण, अनुभव, सराव व इतर बाह्यपरिस्थिती इ. कारणे विचारात घ्यावी लागतात. योग्य निर्णय संकटातून पार पाडतो तर अयोग्य धोकादायक ठरू शकतो.

गतीचा मानवी दृष्टीवर पण परिणाम होतो. मानवी दृष्टीच्या मर्यादा विचारात घ्याव्या लागतात. जसजशी गती वाढते तसे तुमच्या दृष्टिकोनावर (Angle of vision) परिणाम होतो. ४० -४५ कि. मी. वेगाने जात असता दृष्टीचा कोन १६० ते १७० अंश (से.) असतो पण जेव्हा गती १०० कि.मी. होते तेव्हा तो कोन फक्त ३० ते ३५ अंश (से.) इतका होतो. तुम्हांला दृष्टिपटावर येते त्याचा ठसा मेंदूमध्ये उमटण्यापूर्वी दृष्टी गतीमुळे पुढे गेलेली असते. म्हणून अपघातानंतर जेव्हा चालकाला विचारण्यात येते की तुला तेथे माणूस दिसला नाही का ? त्यावर तो उत्तरतो तेथे कुणी नव्हतं मग अपघातग्रस्त काय आभाळातून आला कां ? नाही व्यक्ती तिथेच होती पण मेंदूवर आलेख येण्यापूर्वी गतीमुळे त्याच्या पर्यंत पोहोचलात नाही.

गतीमुळे आजूबाजूची दृश्ये धूसर होतात. झाड दिसते पण कशांच आहे ओळखणं कठीण जातं. दृष्टिभ्रम होतात अंदाज घेणे कठीण होते.

वाढत्या गतीमुळे वेळेची बचत होते हा एक समज आहे पण जेव्हा तुलनात्मक दृष्टीने विचार करता ते बरोबर वाटत नाही. तुम्ही ५० कि. मी. वेगाने जात आहात वेळेच्या बचतीसाठी गती ७० कि. मी. पर्यंत वाढवली तर पुढच्या १० कि. मी. मध्ये तुम्ही फक्त २ मी. २४ से. वाचवू शकता. धोका किती वाढला, नुकसान किती झालं ह्याचा विचार करता सौदा फायद्याचा वाटत नाही.

वाढत्या गतीमुळे इंजिनाची घर्षण शक्ती वाढते. मूल्य मेट्रिक क्षमता कमी होते. जादा ताकद निर्माण करण्यास जादा इंधन लागते. गाडीवर येणाऱ्या वाऱ्याचा दबाव वाढतो व इंधन बचत कमी होते.

गाडीचा थरार व आवाज वाढते. धक्के अधिक

बसतात आणि थकवा लवकर येतो. वाढत्या गतीबरोबर गाडीवर परिणाम करणाऱ्या बाह्यशक्तीचे परिणाम अधिक वाढतात. गुरुत्वमध्य, गुरुत्वाकर्षण, घर्षण, संवेग, अपकेंद्रितबल ह्या शक्तीमुळे गाडीवरील चालकाचे नियंत्रण कमी होते. काही वेळेस गाडी नियंत्रणाबाहेर जाते व अपघात घडू शकतो. प्रत्येक चालकाला ह्या अदृश्य शक्तीचा अंदाज असतोच असे नाही.

गाडीची गती वाढताच ती थांबविण्यास लागणारे अंतर ही व्यस्त पटीत वाढत जाते. टायरची झीज अधिक प्रमाणात होते. २० कि. मी. वेगाने जाणारी गाडी ९ मि. अंतरात उभी करता येईल पण ४० कि. मी. वेगाने जाणारी गाडी २२ मि. इतके अंतर घेईल १८ मि. नव्हे; तर ६० कि. मी. वेगाने जाणारी गाडी ७६ मि. इतके अंतर घेईल ३६ मि. नव्हे; तेव्हा लक्षात ठेवा अधिक गती धोकादायक.

रात्रीच्या प्रवासात तर गती अत्यंत धोकादायक कारण तुमची दृष्टी तुमच्या गाडीच्या प्रकाशझातातील रस्ता पाहू शकते तेव्हा तुमच्या गाडीच्या प्रकाशझोतातच तुम्ही गाडी थांबवू शकाल इतकीच गती हवी.

ह्या सर्व गोष्टींचा विचार करता एक गोष्ट लक्षात येईल की घाई नको, गतीत वाढनको. मला तर काही वेळा असं मनांत येतं की ''गती ही गाडीला लागणारे वरदान नसून तो एक शाप आहे. गाडीची गती वाढताच एक झिंग डोक्यात चढते अन् मग लगाम घालणे अवघड ठरते.''

तेव्हा स्वत:ला सांभाळा, गती मर्यादेत ठेवा.

स्वत: जगा व इतरांना जगू द्या.

With Best Compliments From

SAI GANESH

Tours & Travels

Bus Contractors For Marriage, Picnic, School, Company.
Available Mini / Semi / Luxury Buses / Car on hire basis

Head off. : 3, Jay Bhuvneshwari, Shahaji Raje Marg, Near Prabodhankar Thakre Sankulan, Vile Parle E. Mumbai - 400 057
Brach Off. : Sangam By Rustomjee, A - 506, 5th Floor. Opp Vijay Sales Showroom, S. V. Road Santacruz (w.) Mumbai - 400 054
Email : bookings@saiganesh.in, saiganeshholidays@gmail.com, saiganeshtt@yahoo.co.in, **Website :** www.saiganeshtravels.com

सूरक्षेची जाणीव

डॉ. कृष्णकांत वि. नाबर

मना सज्जना अपघात टाळावे,
काळजीपूर्वक राहूनी स्वास्थ्य मिळवावे ।।

रोज सकाळी पेपर उघडला की लहानमोठ्या अपघातांच्या बातम्या नजरेला पडतात व उराला भिडतात. मन विषण्ण होते. काही चालकांच्या चुकीमुळे तर काही वाहनांतील त्रुटीमुळे कारण काही का असेना. जीवित हानी अटळ असते. लग्नाच्या मोसमात तर त्यांचे पेवच फुटते. वऱ्हाड घेऊन जाणारे टेम्पो, बसेस विशेषतः रात्रीच्या वेळी भरधाव सोडले जातात. व सर्वांना मृत्यूच्या खाईत लोटतात किंवा जन्मभरासाठी अपंग बनवून ठेवतात. नवपरिणित वधूवरसुध्दा बळी पडतात. रात्रीचा प्रवास करण्याचा अट्टहास का? चालक दिवसभर काम करून थकतात. डोळ्यावर झोपेचा अंमल असतो. त्यामुळे एकाग्रता होणे दुरापास्त. त्यातच लवकर पोहोचायचे म्हणून वाढवलेली गती. सर्वच बाबी अपघात घडण्यास पोषक. परंतु ह्या परिस्थितीपासून दूर राहणे तर आपल्या हातात असते. सर्व ठिकाणी विशेषतः घाटांत जागोजागी सूचनावजा फलक लावलेले असतात. ''लवकर निघा. सावकाश जा व सुखरूप पोहोचा.'' रस्ता धोकादायक असल्याची ती सूचना असते. परंतु पण लक्षात कोण घेतो ही वृत्ती नडते. ती सोडली तर....

सफरीवर निघताना वाहनाची कार्यक्षमता तपासून पाहणे व आवश्यक ती डागडुजी करणे अपरिहार्य ठरते. वाटेवरच्या संभाव्य संकटाशी सामना करण्यासाठी आवश्यक ती हत्यारे व त्यांचा जाणकार समवेत असणे आवश्यक आहे. ह्या बाबतीतील दुर्लक्ष दुर्घटनेला आमंत्रण देऊ शकते. अशीच दुर्लक्षित बाब म्हणजे वाहनांची क्षमता. प्रत्येक वाहनाला प्रवाशांची क्षमता असते. तिचे उल्लंघन झाल्यास वाहन प्रवाशाला बाहेर फेकील किंवा स्वतःचाच समतोल घालवील. म्हणजे कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या अपघाताला आमंत्रण. ही बाब काहीशी अशी आहे. क्षमतेपेक्षा जास्त खाल्ल्यास पोट अन्न बाहेर फेकून देणारच ना! परिस्थिती खूपच गंभीर होते. जेव्हा शालेय विद्यार्थ्यांची वाहनांनी नेआण केली जाते; पालकांकडून पुरेशी फी घेऊनसुध्दा त्यांच्या पाल्यांना पुरेशा सुविधा तर दिल्या जात नाहीत, परंतु त्यांच्या सुरक्षेचा विचारसुध्दा केला जात नाही. एखादी भयानक घटना घडली की आवर्त उठतात. चौकशीच्या फैरी झडतात. पुन्हा जैसे थे. आपापसांत साटेलोटे करून सगळे नामानिराळे होतात व मुले त्याच दिव्यातून जातात. संबंधित संस्थांनी थोडा कमी फायदा घेऊन (मुलांची संख्या कमी करून) मुलांच्या सुरक्षेचा विचार केल्यास परिस्थिती सुधारण्याची शक्यता आहे. अशीच काहीशी अवस्था असते शाळांच्या आजूबाजूच्या

परिसरात शाळा भरतांना व सुटताना दंगामस्ती करणाऱ्या मुलांवर काबू ठेवू पाहणारे पालक व त्यातच शाळांच्या बसेसची ये -जा. अशा प्रसंगी

चालकांनी डोळ्यांत तेल घालून बस चालविणे जरुरीचे नाही का ? फक्त शाळेच्या बसेसच नाहीत तर इतर वाहनेसुध्दा येतजात असतातच. प्रत्येकालाच जायची घाई असते. रस्त्यावरून चालणाऱ्यांना सर्वांकडे लक्ष ठेवणे कठीण असते. तेव्हा वाहनचालकांनी आजूबाजूच्या आणीबाणीसदृश परिस्थितीचे भान ठेवणे अपेक्षित असते. तसे बहुतेक शाळांच्या परिसरात गतिरोधक (Speed breaker) असतातच. नसले तर ते असावेत. तरीसुध्दा गतीवर नियंत्रण हे वाहकाचे ब्रीदच असावे. चिमुरड्यांच्या जीवनमरणाचा विचार केला तर....

अपघाताच्या बाबतीत सर्वांत धोकादायक दुचाकी (सायकल नव्हे स्कूटर व तत्सम प्रकार) वाहने. मागून, पुढून, मधून म्हणजे जिथून वाव मिळेल तिथून ते वाट काढतात व समोर येणाऱ्याची वाट लावतात. कित्येक वेळा सिग्नलला सुध्दा ते जुमानत नाहीत. 'हे ही नसे थोडके' म्हणून ते सरळ फुटपाथवर वाहन चढवतात. म्हणजे पादचाऱ्यांच्या चालण्यास अडथळा. ज्येष्ठ नागरिकांची तर त्रेधा तिरपीट उडते. परंतु कुणाला काय हो त्यांचे, अपुले ईप्सित गाठावे, हीच मनोवृत्ती असल्यास आणखी कसला विचार केलाच जात नाही मग पादचाऱ्यांनी चालायचे कुठून ? क्वचित प्रसंगी ट्रॅफिक हवालदार हजर असतात, पण ते निराळ्याच ड्युटीमध्ये गुंग असतात. त्यांना पध्दतशीर गुंगारा देणारे वाहनचालक त्यांना गुंगीच आणत असावेत. आता कल्पना करू या फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविले आहेत. (सध्या त्यांचे पेवच फुटले आहे. परंतु ते कोणालाच 'फेवर' करीत नाहीत. त्यामुळे एकमेकांना ढकलून, वाटसरूंवर रागावून वेगवेगळ्या दिशांना तोंडे फिरवून वाकडे तिकडे बसलेले असतात.)समजा त्यातूनच पादचारी वाट काढून चालू पाहत आहे. त्यातच रस्त्यावरून दुचाकी स्वारी करते. काय स्थिती (म्हणजे वाईट) होईल त्या पादचाऱ्यांची ? त्यांत तो वयस्कर असेल तर अपघात अटळच! म्हणजे ही फुटपाथ अपघातांची नवी मालिकाच! दुचाकीधारकाने फुटपाथवर चढण्याचा मोह आवरला तर..

भीषण रस्ते अपघातांची आणखी एक मालिका असते. त्यांत निद्रिस्त वाटसरू उडविले जातात किंवा चिरडले जातात. बहुतांशी ह्या प्रकाराला कारणीभूत असतात मद्यधुंद चालक. धनदांडग्यांचे सुपुत्र पबमध्ये जाऊन अमली पदार्थांचे सेवन करून त्याच धुंदीत भरधाव गाडी चालवताना अंमल राहणे शक्यच नाही. गुन्हेगार सापडणे कठीण

व सापडला तरी त्याला शिक्षा करणार कोण ? शिक्षा ठोठावणाऱ्यांचे व संबंधितांचे गुन्हेगार संबंधी असतात ना ! त्यामुळे सगळे व्यवस्थित मॅनेज केले

जाते. तरुणाईचा जोश असल्या संहारक कृतीत दर्शविण्यापेक्षा काही विधायक कार्य केले तर..

अर्थात अपघात घडण्यात तुमचा-आमचा म्हणजेच जनतेचा सुध्दा सहभाग असतोच की वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळले तर अपघात टळलेच समजा. सिग्नलशिवाय कुठेही क्रॉस न करणे, वाहने थांबली असता (ट्रॅफिक जॅममुळे) मधूनच वाट काढून रस्ता पार न करणे अशासारखे नियम पाळणे आपल्याच फायद्याचे असते. 'निष्काळजीपणा टाळा सकलांचे संरक्षण मिळवा' हे अंगीकारले तर....

त्यातच भरीस भर म्हणून फूटपाथवर कडेने बसणारे फेरीवाले व खाद्यपदार्थांचे गाडीवाले, त्यांच्याभोवती गिऱ्हाईकांचे सदैव कोंडाळे. पादचाऱ्यांसाठी ती अडथळ्यांची शर्यतच ठरते. फेरीवाल्यांसाठी ते उदरनिर्वाहाचे साधन असले तरी ठराविक विभागांत त्यांनी आपला धंदा करावा. फुटपाथवर जागा नाही ह्या कारणास्तव रस्त्यावरून चालणे भाग पडते. त्यातच दुतर्फा विश्रांती घेत असलेली वाहने पळण्यापासून चालत्या वाहनावर आदळण्यापर्यंत कोणतेही अपघात होऊ

शकतात. महानगरपालिका सतर्क राहिली तर...

हे सर्व करता येते रस्त्याच्या रचनेनंतरच रस्त्याच्या जडणघडणीच्या वेळी पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य दिल्यास व निगुतीने त्यांची काळजी घेतल्यास जनतेच्या दृष्टीने ते सुखावह होईल. अपघातांचे प्रमाण नक्कीच घटेल. रचनेत काही त्रुटी आढळल्या व त्यामुळे अपघात झाल्यास नाव तरी कोणाला विचारणार? कारण ह्या बाबी शासनाच्या असतात. ह्या बाबतीत थोडी अस्था दाखविली तर...

हृदयी धरा हा बोध खरा,
वाहतूक नियमांचे पालन करा ।।
चालक असो वा चालणारा,
सुरक्षिततेची कास धरा ।।
वाहनांची करा सार्थ सेवा,
गतीवरती संयम ठेवा ।।
दुर्घटनांसी दूर सारा,
समाजाचे कल्याण साधा ।।

अपघात

अ - असंख्य अशी वाहने रोज रस्त्यावरुन सैरावैरा धावतात.. ..

प - पण, आपली घरी कोणीतरी वाट पाहतय हे कितीजण लक्षात ठेवतात.. ..

घा - घाट, महामार्गावर गाडी चालवताना कितीजण वाहतूकीचे नियम पाळतात.. ..

त - तयार व्हा ... सुरक्षित वाहन चालक म्हणून मग बघा कसे अनुभव मिळतात...

शपथ घ्या की आजपासुन सुरक्षित वाहन चालवणार... आणि सुरक्षित वाहन चालक म्हणुन सन्मान मिळवणार....?

- गणेश वेदपाठक

रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात!

सुरेश गोविंद देहेरकर

सकाळी वर्तमानपत्र उघडल्यावर कुठे ना कुठे तरी झालेल्या अपघाताची बातमी वाचायला मिळते. कुठे खचाखच भरलेला मालट्रक पुलाचा कठडा तोडून नदीत पडलेला असतो तर कुठे लहान मुलांच्या स्कूल बसला समोरून येणाऱ्या वाहनाने धडक दिलेली असते. कुठे एस. टी. बस दरीत कोसळलेली असते तर कुठे खाजगी बस, ब्रेक फेल झाल्याने झाडावर आदळलेली असते. कुठे श्रीमंत बापाच्या मुलाने नशेमध्ये ड्रायव्हिंग करून फुटपाथवर झोपलेल्या गरीब लोकांना चिरडले असते तर कुठे रस्त्यातील खड्ड्यांमुळे गाडी आदळून कलंडलेली असते. एक ना दोन अशा बऱ्याच घटना दररोज घडत असतात. कधी कधी मनात विचार येतो की मृत्यू समोर दिसत असताना प्रवाशांची काय अवस्था होत असेल.

जिवाच्या आकांताने; भारलेल्या किंकाळ्या, अपघातग्रस्तांना होणाऱ्या जखमा, वेदना, त्यांच्या हाल-अपेष्टा, हे सारे किती भयानक असेल याची घरबसल्या कल्पनाही करवत नाही. आपला तर नुसत्या विचारांनी थरकाप उडतो आणि मग जे असल्या जीवघेण्या प्रसंगातून वाचले आहेत त्यांची तर गोष्टच वेगळी. या अशा घटना वाचून आपले मन खिन्न व उदास होऊन जाते आणि मग मनात विचार येतो की या दु:खद घटना व अपघात टाळता येणार नाहीत का? या प्रश्नाचे उत्तर अर्थातच 'होय' हे आहे.

रस्ते अपघात टाळण्यासाठी, वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी व सुरक्षित प्रवासासाठी नानाविध उपाय योजले जातात. संबंधितांना योग्य ते मार्गदर्शनही केले जाते व रस्तासुरक्षा अभियानही चालवले जाते. तरीदेखील रस्ते अपघात होतच असतात आणि म्हणून आता गंभीरपणे या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे व रस्ते अपघात कसे टाळले जातील याचा विचार केले गेला पाहिजे. वाहनचालकाला गाडी चालवताना सावधगिरी व खबरदारी या दोन्हींचे महत्त्व समजून सांगण्याची गरज निर्माण झाली आहे.

रस्ते अपघात टाळण्यासंदर्भात बऱ्याच विचारवंतांनी व तंत्रज्ञांनी आपली मते वेळोवेळी मांडली आहेत. त्या सर्व मतांचा एकत्रितपणे विचार करता असे दिसून आले आहे की ९५% रस्ते अपघात, रहदारीचे व वाहतुकीचे नियम न पाळल्याने व पायदळी तुडविल्याने झाले आहेत. तसेच त्या सर्व दु:खद घटना व अपघात मानवनिर्मित होत्या व सहज टाळता येण्यासारख्या होत्या. फक्त ५% अपघात किंवा दुर्घटना अशा आहेत की, ज्यांना 'दुर्दैव' असे म्हणता येईल.

कुठलाही अपघात व दुर्घटना टाळण्याकरिता सर्वांत आवश्यक गोष्ट कुठली असेल तर ती म्हणजे खबरदारी! तसेच वाहन चालवताना मनाची एकाग्रता व सावधपणाही आवश्यक आहे. वाहनचालक हा तणावमुक्त असायला हवा.

चिंताग्रस्त, व्यसनी, हृदयविकार असलेला चालक कठीण परिस्थितीत गडबडून जातो व त्याच्या या कमजोरीमुळे गाडीवरचा व मनावरचा ताबा सुटतो व कठीण परिस्थितीत गाडीवर नियंत्रण मिळविणे त्याला अवघड जाते. चालकाला कुठल्याही



प्रकारचा दृष्टिदोष नसावा कारण वाहन चालवताना नजर स्वच्छ आणि साफ असावी लागते. विशेषतः रात्रीच्या प्रवासात तर १००% फिट असलेला चालकच हवा. अपघात टाळण्यासाठी इतर बऱ्याच गोष्टींची आवश्यकता असते.

उदा : - १) सुस्थितीत असलेली गाडी किंवा वाहन २) चांगल्या स्थितीत असलेले ब्रेक्स ३) उत्तम प्रतीचे टायर्स ४) गाडी चालवताना पाळावयाच्या नियमांचे ज्ञान ५) सरकारी वाहन किंवा एस. टी. बस चालकाला आवश्यक असलेली जबाबदारीची जाणीव वगैरे वगैरे, तसेच लाब-रुंद व खड्डे नसलेले रस्ते.

रस्त्यावरून चालणाऱ्या खरं म्हणजे धावणाऱ्या वाहनांची वर्गवारी दोन प्रकारे करता येईलः १) सरकारी वाहने व २) खाजगी वाहने. अपघात टाळण्याची व होऊ न देण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. परंतु या देशातील बहुसंख्य जनता, सरकारी वाहनांनी विशेषतः एस. टी. बसने प्रवास करत असल्याने त्यांच्या सुरक्षेची, सुव्यवस्थेची व जीविताची काळजी घेणे हे सरकारचे आद्य कर्तव्य ठरते.

सरकारी वाहने : यामध्ये सरकारची सर्व प्रकारची वाहने येतात. पण जास्त करून एस. टी. बसेसचा संबंध आपल्या दैनंदिन जीवनात येतो. एस. टी. चालक जेव्हा एस. टी. डेपोतून प्रवासाकरता बाहेर काढतो, त्यावेळी त्याने हे पाहायला हवे की, ती चांगल्या स्थितीत आ्हे की नाही. कारण बिघडलेली व नादुरूस्त गाडी बाहेर घेऊन जाणे म्हणजे संकटाला आमंत्रण-बरेचसे अपघात चांगल्या स्थितीत नसलेल्या गाड्यांमुळे होतात हे लक्षात घ्यायला हवे. जर १००% व्यवस्थित व चांगल्या स्थितीत असलेल्या गाड्या वापरल्या तर बरेचसे अपघात टळू शकतात. सरकारी वाहनचालकांनी हे नेहमीच लक्षात ठेवायला हवे की, प्रवाशांच्या जिवाशी खेळण्याचा त्यांना कुठलाही अधिकार नाही. इतर गोष्टीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

त्या खालीलप्रमाणे : -

१) सरकारी वाहनचालकांनी गाडी बाहेर नेताना तिचे ब्रेक्स चांगल्या कंडिशनमध्ये आहेत की नाहीत हे तपासून पाहायला पाहिजे. जर ब्रेक्स् नादुरुस्त असतील तर ती गाडी न नेता डेपोतच ठेवायला पाहिजे. बऱ्याचशा अपघातात गाडीचे ब्रेक्स फेल झाल्यामुळे दुर्घटना घडल्या आहेत हे नजरेआड करून चालणार नाही. याकरिता



चालकानी ब्रेक्स् जर व्यवस्थित असतील तर अपघात होणार नाहीतच ते टाळता येतील.

२) एस. टी. व सरकारी वाहनांचे टायर हे चांगल्या कंपनीचे असणे अतिशय आवश्यक आहे.

टायर चांगले नसतील तर ते वारंवार पंक्चर होण्याचा धोका असतो. गाडी अथवा वाहन बाहेर नेताना टायरमध्ये हवा पूर्णपणे भरली आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. टायर चांगले असतील तर प्रवास सुखाचा होईल नाहीतर गाडी रस्त्यातच बंद पडेल. गाडीबरोबर स्टेपनी नेणे देखील गरजेचे आहे. मानवी बॉडी व गाडीची बॉडी यात पुष्कळ साम्य आहे. मानवाला तंदुरुस्त राहाण्याकरता जसे औषध-पाणी तसेच गाडीचे इंजिन व्यवस्थित चालण्याकरिता शुध्द पेट्रोल व डिझेलची गरज आहे. गाडी व्यवस्थित चालण्याकरिता व इंजिन बंद पडू नये म्हणून भेसळयुक्त पेट्रोल व डिझेल वापरून चालणार नाही. इंजिन मध्येच बंद पडले व त्यात बिघाड झाला तर अपघात होण्याची भीती असते आणि म्हणून गाडीचे हृदय (Heart) असलेले इंजिन हे बंद पडणार नाही याची काळजी घेतल्यास रस्ते अपघात टाळण्यास मदतच होईल.

माणसाला चालण्यासाठी व पळण्यासाठी जसे पाय आहेत तद्वतच गाडीकरिता टायर असलेली चाके हे गाडीचे पाय आहेत. हे टायर, टायर्ड होईपर्यंत वापरल्याने त्यांची झीज होते व ते सहज पंक्चर होतात. असे टायर चालल्यास अपघाताचा

धोका वाढतो आणि म्हणून ते योग्य वेळी बदलले पाहिजेत. थोडक्यात सांगायचे तर ब्रेक्स, इंजिन व टायर या तीन महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष दिल्यास अपघातांचे प्रमाण खूपच कमी होईल.

वाहनचालक मेडिकली फिट असावा व त्याला दारूचे व्यसन नसावे. बहुतेक ड्रायव्हर दारू पिऊन गाड्या चालवतात. दारूच्या नशेत गाडीवरचा व



स्वतःवरचा ताबा सुटला तर अपघात होतात हे सांगायला कुणा ज्योतिषाची गरज नाही आणि म्हणून गाडीचालकाने दारू प्यायचे टाळले पाहिजे म्हणजे अपघातही टळतील. सरकारी सेवेतल्या वाहनचालकाला तर नोकरीतून काढून टाकावयास हवे. वाहनचालकाची भरती करताना ज्याचे डाळे व हृदय कमजोर आहे अशा उमेदवाराची वाहनचालक म्हणून नेमणूक करू नये. तसेच वाहनचालकाला गाडी चालवताना रहदारीचे व वाहतुकीचे सारे नियम हे माहीत असलेच पाहिजेत. प्रवासी बसचालकाने कधीही ओव्हरटेक करून पुढे जाऊ नये तर ठरवून दिलेल्या मार्गातूनच गाडी पुढे न्यायला हवी; कारण पुढच्या गाडीला ओव्हरटेक करताना अपघात झाल्याची बरीच उदाहरणे आहेत. घाई करून पुढे जाण्यापेक्षा ठरवून दिलेल्या स्पीडने गाडी चालवणे प्रवाशांच्या सुरक्षेकरिता आवश्यक आहे. एस. टी. चे ब्रीद वाक्य आहे, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' पण आजकालच्या एसटी चा प्रवास 'बहुजन दुःखाय, बहुजन पीडाय' ठरत आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे लाबरुंद व खड्डे नसलेले रस्ते ही आहे. ज्या रस्त्यावरून हजारो वाहनांची ये-जा चालू असते ते रस्ते चांगल्या स्थितीत असायलाच हवेत. रस्त्यांवर कुठल्याही

प्रकारचे खड्डे नसावेत कारण गाडीची चाके खड्ड्यात अडकून गाडी उलटण्याचे, कलंडण्याचे प्रकार घडले आहेत आणि म्हणून खड्डेविरहित रस्ते आवश्यक आहेत. खड्ड्यामध्ये अडकून गाडी कलंडून अपघात झाल्याची उदाहरणे अलीकडच्या काळात घडली आहेत. त्याकरिता रस्ते वेळच्यावेळी दुरुस्त केले पाहिजेत म्हणजे



अपघाताची शक्यता उरणार नाही. लांब-रुंद व स्वच्छ, सुंदर रस्ते ही काळाची गरज आहे हे कुणाला नाकारता येणार नाही.

खाजगी वाहने : सरकारी वाहनचालक हा जनतेला व सरकारला भिऊन व घाबरुन असतो. त्याला वाहन चालवताना खबरदारीही घ्यावीच लागते व जबाबदारीही स्वीकारावी लागते. परंतु खाजगी वाहनचालक, या मध्ये कार चालवणारे व मालवाहू ट्रक चालवणारे यांचाही समावेश आहे. या लोकांनी स्वतःच स्वतःची, जनतेची व गाडीची काळजी घ्यायला पाहिजे पण त्यांच्यातले बरेचसे जण नशापाणी करून गाडी चालवतात व गाडीवरचा ताबा सुटला की त्यांच्या हातून अपघात होतात. मालवाहू ट्रकात क्षमतेपेक्षा जास्त माल भरतात त्यामुळे गाडी एवढी भार सांभाळू न शकल्याने कलंडते व अपघात होतात. खाजगी वाहनांद्वारा प्रवाशांची ने -आण करणारे चालकही क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहनात घेतात व अतिभाराने गाडी उलटली की अपघात होतात. रिक्षावाले, मोटार-सायकलवाले व इतर खाजगी वाहन असलेले सारेजण, रहदारीचे, वाहतुकीचे व प्रवाशांची ने-आण करणारे नियम दररोज मोडत असतात. गाड्या ओव्हरटेक करत असतात. आर.टी.ओ. कडून यांच्यावर जर कडक कारवाई झाली, दंड झाला व नियमबाह्य वर्तन केल्यामुळे जर त्यांचे गाडी चालवायचे परवाने (Licence) रद्द केले तर ते सुतासारखे सरळ होतील व त्यामुळे अपघाताचे प्रमाणही कमी होईल. रस्ते रुंदीकरण, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन, वनवे ट्रॅफिकची पध्दत सर्वच ठिकाणी आणणे वाहनचालकाला वाहन चालवत असताना मद्य प्राशन करण्यास मनाई करणे, गाड्यांची वेळोवेळी तपासणी करणे, आऊटडेटेड गाड्या व वाहने वापरातून काढून टाकणे, वाहनचालकाकडून (सरकारी व खाजगी) तो गाडी किंवा वाहन चालवायला योग्य आहे असे सर्टिफिकेट घेणे व सुरक्षेच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे, यासारखी पावले जर सरकारी यंत्रणेद्वारे उचलली गेली तर नक्कीच अपघात टाळता येतील. या करिता 'रस्ते सुरक्षा अभियान' चालवणाऱ्या ज्या सामाजिक संस्था आहेत त्यांचा सहभाग मोलाचा ठरेल. सरकारने अशा संस्थांना उत्तेजन देऊन व पुरस्कार देऊन गौरविले पाहिजे. नुसते 'हॅपी जर्नी' बोलून प्रवास हॅपी होत नाही. 'आपला प्रवास सुखाचा होणे' असे गाडीच्या मागे लिहून प्रवास सुखाचा होणार नाही तर सावधगिरी व खबरदारी घेऊन प्रत्येकाने आपली जबाबदारी योग्य रितीने पार पाडूनच प्रवास सुखाचा, आनंदाचा, आरामाचा व बिनअपघातांचा करता येईल. शेवटी एवढेच म्हणता येईल की हे देवा

नको आता घातपात
नको आता अपघात
नको विघ्न प्रवासात
तुझ्या कृपेची कर बरसात
प्रवास होण्या आरामात!

घोषवाक्य

१) वेग कमी जीवनाची हमी.

२) आवरा वेगाला सावरा जीवाला

३) अति घाई संकटात नेई.

४) नजर हटी दुर्घटना घटी

५) नाही पहाल तर खड्यात जाल.

६) प्रवासी आहात स्पर्धक नाही.

७) चुक छोटीशी खेळू आयुष्याशी.

८) रांगेची शिस्त, प्रवास अस्त

९) नको प्राणहानी ,नको वित्तहानी नको गंभीर जखमा ,नको अपंगत्व वाहतुकीचे नियम पाळू यिंरस्ते अपघात टाळू या ..

१०) होऊ नये दुर्घटनांचे भक्ष्य, गाडी चालवतांना सदा रहा दक्ष.

११) धोका ओळखा अपघाताचा, गाडीवर नियंत्रण ठेवा योग्यतेचा.

१२) जीवन आहे अनमोल, नका करू मातीमोल.

१३) Don't be hurry, your death will be in hurry.

१४) Don't take shortcut, your life will be cut.

१५) Don't overtake anybody, your death will overtake you

१६) A slip, a slip, a hospital trip.

१७) वेगाच्या ओघात, वाहतुकीच्या नियमाला द्या साथ दक्षतेने करू होणाऱ्या अपघातावर मात

१८) रक्तदान रुग्णांना करा रस्त्याला नको.

१९) स्वसंरक्षणाची मनी धरू इच्छा, आपल्या हाती आपली सुरक्षा.

२०) छोट्या पुलावर मन मोठे करा, इर्षा टाळा, समोरच्याला आधी जाऊ द्या.

- **विवेक कोठारे**

With Best Compliments From

M. J. R.
&
COMPANY

5, Kastur Mahal, Opp. Canara Bank, Sion,
Mumbai - 400 022
Email : kanusho@gmail.com
Tel : 9820083703, 9821198762, 9773984190

अती वेग अपघाताचे प्रमुख कारण

कै. स. गो. बिवलकर

'अपघात' हा शब्दच मुळात काहीतरी भयंकर असल्याची सूचना देतो. दुर्दैवाने या शब्दाची दाहकता जोपर्यंत काही घडत नाही तोपर्यंत लक्षात येत नाही. सडकेवर होणाऱ्या अपघाती मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. विश्लेषणानंतर असे आढळून आले आहे की शेकडा ७५% पेक्षा अधिक अपघात चालकाच्या चुकीने घडतात. मानवी चुकांमुळे होणाऱ्या ह्या गेल्या अपघातांपैकी शेकडा ९०% अपघात टाळता येऊ शकतात. गेल्या १-२ महिन्यांत राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातांकडे लक्ष देताच असे आढळून येते की त्या सर्व घटनांमध्ये गती-वेगमर्यादा पालनाचा अभाव हेच प्रमुख कारण होते. इतरही चुका तितक्याच महत्त्वाच्या आहेत पण ह्या गतीबद्दल प्रथम विचार करावासा वाटतो त्याचे कारण ह्या गतीची नशा एकदा चालकाच्या मस्तकात भिनली की त्याचे इतर सर्वत्र दुर्लक्ष होते. 'अती गती, अती घाई, जीव घेऊन जाई.'

साधारणपणे 'चुका करणे हा मानवाचा धर्म आहे' असे म्हटले जाते. पण वाहनसंचालनाबाबत हा नियम अपवाद आहे. वाहनसंचालनात चुकीला क्षमा नसते. चूक क्षुल्लक तर होणारे नुकसान क्षुल्लक पण चूक मोठी असेल तर मृत्युदंडाचाही स्वीकार करावा लागतो. दैनंदिन व्यवहारात चुकीची दुरुस्ती करता येते पण वाहन चालविताना चुक भोगावीच लागते. इथे दुसरी सोय नाही म्हणूनच सदोदित सतर्क असावे लागते. प्रतिकूल परिस्थितीचा अंदाज घेऊन चूक होणार नाही ह्याची काळजी घ्यावयाची इतकेच नव्हे तर इतरांच्या संभाव्य चुकांचा अंदाज घेऊन स्वतःचा बचाव करावयाचा ह्यालाच सुरक्षित संचालन म्हणतात.

अधिक गतीमुळे निर्माण होणारा पहिला प्रश्न म्हणजे तुम्हाला प्रतिक्रियेसाठी मिळणारा कमी वेग. सडकेवरील दृश्य जेव्हा तुम्ही बघता तेंव्हा

तुमचे डोळे चित्र काढते, दृष्टिपटावर डोळ्यांच्या।\
मेंदूलाही खबर देतसे, संभावित त्या धोक्याचा।।\
विचार करणे, कृती मग करणे, काम असे त्या मेंदूला।\
सेकंदाचा समय लागतो, प्रतिक्रिया म्हणती त्याला।।

ह्या एक सेकंदाति तुमची गाडी मात्र त्याच संभाव्य संकटाकडे वेगाने झेपावत असते. प्रतिक्रियेसाठी हा लागणारा वेळ देखील निरनिराळा

असू शकतो. वय, लिंग, शिक्षण, शारीरिक क्षमता. दृष्टिक्षमता, सराव, थकवा ह्यांचा विचार करावा लागतो. ह्या अत्यंत अवघड स्थितीत योग्य निर्णय

तुम्हाला संकटातून तारून नेईल व अयोग्य निर्णय संकटाला निमंत्रण देईल ह्या एक सेकंदात तुम्ही किती अंतर पार केले असेल ते पाहा.

ह्या नंतर मेंदू विचार करून -शरीराकडून आवश्यक त्या क्रिया घडवून आणील. तुम्ही ब्रेक लावाल तेव्हा, गती कमी गाडीचा भार, टायरची स्थिती, ब्रेकची क्षमता ह्या बाबी विचारात घ्याव्या लागतात. सर्व स्थिती आदर्श असल्यास लागणारे अंतर पुढीलप्रमाणे :

गाडी उत्तम, सडक पक्की, प्रशिक्षित चालक, आदर्श स्थितीतील गाडी ब्रेक मारताच उभी राहणार ही कल्पना किती चुकीची हे त्यावरून लक्षात येईल.

गाडी चालविताना डोळे व मेंदू ह्यांचा योग्य समन्वय घालून वेगाप्रमाणे किती अंतराचे विश्लेषण डोळ्यांनी करावे ह्यात तुमचे कौशल्य अवलंबून असे. आपल्या ताशी वेगमर्यादेच्या ३ पट अंतर मीटरमध्ये विचारात घेणे अत्यंत जरुरीचे आहे, कारण हे अंतर पुढील ११ सेकंदात तुम्ही पार करणार असता. हा वेळ संभाव्य धोक्याचा अंदाज घेऊन विचार व कृती करण्यास जेमतेम पुरेशी आहे.

अशा वेळी तुमचे लक्ष जर ५ सेकंद जरी विचलित झाले तर ५० कि. मी. वेगाने जाणारी गाडी थांबविण्यास अधिक ३५ मीटर लागेल म्हणजे ही गाडी आता ९७ मी. अंतरावर थांबेल. हे अंतर फूटबॉल मैदानापेक्षा अधिक आहे. तेव्हा लक्ष विचलित होणार नाही हे पाहा.

मोबाईल, कॅसेट बदलणे, सिगारेट पेटविणे, पत्ता शोधणे किंवा वाचणे, खाणेपिणे, मित्रमंडळींशी गप्पा इ. गोष्टी टाळा.

दिवसाच्या स्वच्छ प्रकाशात सर्वत्र दूरवर पाहता येते. रात्रीच्या वेळी आपले दृष्टिक्षेत्र आपल्या गाडीच्या हेडलाईटच्या प्रकाशाइतके मर्यादित होते. सर्वसाधारणपणे योग्य जुळविलेला प्रकाशझोत १००मी. इतका प्रकाश देतो. तेव्हा माझी गाडी ह्या १०० मी. थांबेल एवढीच गती मला ठेवावी लागेल अधिक गती अपघाताचे कारण ठरेल. समोरून येणाऱ्या वाहनाचा प्रकाशझोत तुम्हांला त्रासदायक होऊ शकतो. तुमचे लाईट डीम करा. सडकेची डावी किनार बघून अंदाज घ्या. गती कमी करा. एकाच वेळी ५ - ६ वाहने येत असतील तर वाहन बाजूला थांबवा पण धोका स्वीकारू नका.

वाढत्या गतीमुळे तुमच्या दृष्टीची क्षमता किंवा तुमच्या दृष्टीस पडणारा टापू कमी होत जातो. किंवा



अधिक गतीमुळे दृष्टिकोन कमी होतो. १० कि. मी. वेगाने जाणारा चालक आपली नजर १४० अंशांपर्यंत बघू शकतो. पण गती वाढून ८० कि. मी. झाली तर दृष्टीक्षेत्र फक्त ४५ ते ९० अंशांपर्यंतच बघू शकते. दृष्टिपटलावर येणारे प्रत्येक दृश्य

मेंदूपर्यंत पोहोचण्यापूर्वी तुम्ही तेथे पोहोचता. सोबत दिलेली आकृती पाहा. पुष्कळदा जेव्हा चालकाला विचारलं जातं, ''तुला तो माणूस दिसला नाही का ? '' चालक थंडपणे सांगतो, ''तेथे कुणी नव्हतं.'' तो मनुष्य तेथे होता पण डोळ्याच्या पडद्यावरील त्याची छबी मेंदूपर्यंत पोहोचलीच नव्हती. प्रशिक्षण नसलेल्या चालकाला त्यांची कल्पनाच येत नाही !

गाडीची गती वाढताच गाडीवर परिणाम



करणाऱ्या बाह्यशक्तीचा जोरही वाढतो. अपकेंद्रित बळ, संवेग, गुरुत्वमध्य याबद्दल चालक अज्ञानी असतो. वळणावर वेग कमी करणाऱ्या फलकांवर तो दुर्लक्ष करतो. वळणावर वेग अधिक असल्यास अधिक केन्द्रोत्सारित शक्ती वाहनाला बाजूस ढकलते. अशा वेळी गाडी नियंत्रणाबाहेर जाते किंवा दुसऱ्या लेनमध्ये प्रवेश करते. घाटात गाडी घसरल्याचे हे मुख्य कारण आहे. वळणांवर गाडी वेगात असताना ब्रेकचा एकदम वापर गाडी उलटविण्यास मदत करतो; कारण वळणावर आतल्या त्रिजेत फिरणारी चाके, वळणाच्या बाहेरच्या त्रिजेच्या चाकापेक्षा कमी गतीने फिरत असतात. त्यांना ब्रेक अधिक लागतो ह्याचा परिणाम गाडीच्या गुरुत्वमध्यावरही होतो. ह्याबद्दल आम्ही आमच्या चालकांना ज्ञान दिले आहे का ?

वाढत्या गतीबरोबर इंधन जास्त लागते, आवाज व थरथराट वाढतो त्याचा परिणाम जसा गाडीवर होतो तसा चालकावर होतो. चालकाचा ताण व थकवा वाढतो.

द्रुतगती मार्गावर गाडी चालविताना सतत गाडीच्या गती निर्देशावर नजर ठेवावी. सतत एका गतीत अनवधानाने वेगाचे भान राहत नाही. वातानुकूलित वाहनात हा परिणाम अधिक जाणवतो व गती वाढते. ह्यालाच द्रुतगतीमार्ग संमोहन असे म्हणतात.

वाढत्या गतीमुळे इंधन जास्त लागते. गती वाढविल्याने वेळेची बचत होते हा असाच एक समज आहे. तुम्ही ५० कि. मी. वेगाने जात आहात आणि वेळ बचतीसाठी गती ७० कि.मी. केलीत तर पुढच्या १० कि.मी. अंतरात तुम्ही फक्त २ मि. २४ सेकंद वेळ वाचविता. पण इंधन जास्त लागेल, गाडीची झीज, आलेला थकवा व ताण ह्यांचा विचार करता बचत फायद्याची ठरेल असे नाही.

वरील सर्व विवेचनानंतर मी तर इतकेच म्हणेन की गती हे वाहनाला मिळालेले वरदान नसून तो एक शाप आहे. गतीची नशा डोक्यात भिनली की त्याला लगाम घालणे अवघड ठरते; परिणामस्वरूप अपघाताला निमंत्रण जाते. तेव्हा स्वतःला सांभाळायचे असेल तर गती मर्यादित ठेवा.

स्वतः सुरक्षित राहा - इतरांना सुरक्षित ठेवा

कै. स. गो. बिवलकर सुरक्षा अभियानाच्या चळवळीचे सहकारी होते. रस्ता सुरक्षा विषयी चांगल्या प्रकारे लेखन करणाऱ्या बिवलकरांचे निधन होण्याअगोदर त्यांनी हे लेख दिले होते. त्यांच्या आत्म्याला सद्गती मिळो अशी प्रार्थना आम्ही ईश्वरचरणी करतो.

(सुरक्षा अभियान परिवार)

कुटुंबासमवेत प्रवास

ॲड. महेश वाघोलीकर

तुम्ही ज्या ठिकाणी जाणार आहात, तेथील हवामानाला योग्य होतील असे मोजकेच कपडे घ्या. विनाकारण जास्त कपडे घेऊन सामान वाढवू नका व बॅगांचेही वजन वाढवू नका. बरोबर लहान मुले असतील तर त्यांच्यासाठी खेळणी, मनोरजंक छोटीछोटी पुस्तके, ड्रॉईंगपुस्तके, कलर पेन्सिल घ्या. प्रवासात मुलं कंटाळतात व रडून गोंधळ घालतात. तेव्हा या गोष्टी लहान मुलांच्या कामी येतात. लहान मुलांसाठी खाऊ किंवा त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या काही गोष्टी ठेवण्यासाठी एखादी छोटी बॅग जवळ ठेवा. त्यात हवं तितक सामान घेऊनच तुम्हाला फिरायला जाता येईल. जर तुम्ही समुद्रकिनारी जाणार असाल तर स्विम सूट किंवा शॉर्टस जरुर घ्या. तुमच्या बॅगेत जास्तीत जास्त कॅज्युअल वेअर असू द्या. ज्यातून पिकनिकचा मस्त मूड पण बनतो. तुमच्याबरोबर काही वयस्कर मंडळी असतील तर त्यांची औषध घ्यायला अजिबात विसरु नका. शिवाय हवामाना प्रमाणे सर्वांनाच नेहमी लागणारी औषधं जवळ असू द्या.

प्रवासात पुढील गोष्टी टाळाव्यात :

फॅशन म्हणून उगाच जास्त कपडे वाहून नेणं टाळा. छोट्या बाळासाठी आवाज करणारी खेळणी नेण्यापेक्षा कलरफूल पण कमी आवाजाची खेळणी न्या; त्यामुळे इतर प्रवाशांना आवाजाचा त्रास होणार नाही. मुलासाठी लाईट कलर्सचे कपडे नको गडद रंगाचे कपडे घ्या. त्यामुळे गर्दीत आपली लहान मुलं चटकन ओळखता यऊ शकतात. खाण्यापिण्याच्या भरपूर वस्तू शक्यतो नेऊ नका. अगदी गरज पडली तर थोडा सुका खाऊ सोबत असू द्या.

फक्त तो आणि ती प्रवासाला निघतात तेव्हा....

हनीमून कपल, नवीन किंवा जुने जोडपे जेव्हा प्रवासाला पर्यटनाला निघताते तेव्हा त्यांनी पॅकिंगबाबत काळजी घ्यावी ती अशी.

तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत असाल तर जवळपासची काही ठिकाणे चालत पाहता येतात. उदा. अजिंठा-वेरुळ लेणी. ही चालतच पाहायची असतात. त्यामुळे स्पोर्टस् शूज जवळ असू द्या. कॅमेरा, चार्जर व स्पेअर बॅटरी बरोबर घ्या. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही ज्या ठिकाणी जाणार असाल तेथील वातावरणाला अनुसरुन मोबाईल

मध्ये गाणी भरुन घ्या. जर तुमच्याकडे व्हिडिओ कॅमेरा असेल तर व्हिडिओ शूटीग करीत असताना मोबाईलची गाणी लावा व व्हिडीओ शूटिंग करा. घरी आल्यावर कॉम्पुटर वा टीव्हीवर ते शूटिंग पाहताना तुम्ही एखाद्या चित्रपटातील दृश्य पाहत आहात असा अनुभव येईल.

एक उदाहरण देत आहे. आम्ही तारकर्ली (मालवण) येथील बीचवर गेलो होतो. रुपेरी वाळूतं हे गाणे मोबाईलवर लावले व पार्टनरबरोबर व्हिडिओ शूटिंग केले. प्रसंगा अनुरुप व स्थळ-अनुरूप मोबाईलवर गाणी ऐकताना-व्हिडिओ शूट करताना एक वेगळाच आनंद मिळतो. मात्र या सर्वाचे अगोदर नियोजन हवे.

पार्टनरबरोबर फिरायला जाताना हे टाळा :

तुम्हाला अनकम्फर्टेबल असलेले कपडे नेणं टाळा. स्लीप ऑन्स नेऊ नका, त्या कधीही दगा देऊ शकतात. तुमची आणि तुमच्या जोडीदाराच्या मिळून २ पेक्षा अधिक बॅग्ज करु नका.

मित्र, मैत्रिणीबरोबर फिरायला जाताना :

मित्र, मैत्रिणीसोबत कुठेही जाताना एक गोष्ट तर नक्की असते की तुम्ही निश्चित होऊन धम्माल करायला जाताय. थ्यामुळे पॅकिंगकडे तुमचं थोडं दुर्लक्ष होणं साहजिकच आहे. पण त्या धम्माल मस्तीसाठी हव्या असलेल्या गोष्टी नेमक्या त्यावेळी जवळ असाव्यात म्हणूनच खाली दिलेल्या काही टिप्स लक्षात ठेवायला हरकत नाही.

कॅम्पिंग किंवा ट्रेकिंगला जाणार असाल तर मॉस्क्यूटो रिपेलेट टेन्टस, खाजगी वापराच्या वस्तू न्यायला विसरु नका. डिजिटल कॅमेरा वा व्हिडिओ शूटिंगचा कॅमेरा याशिवाय कोणतेही पर्यटन अपूर्णच असते तेव्हा या वस्तू आवर्जून घ्या. कॉमन लागणाऱ्या गोष्टी वाटून घ्यायला हरकत नाही. उदाहरणार्थ सगळ्यांनी स्वतंत्र टूथपेस्ट व कपडे धुण्याचा साबण आणण्याऐवजी एकच टूथपेस्ट व साबण घेतला तर चालण्यासारखे असते. तुम्ही जिथे जाणार आहात ती जागा विचारात घेऊन वस्तू-साहित्य निवडा. जंगल सफारी असल्यास पक्षी-प्राणी निरीक्षणासाठी छानशी दुर्बिण बरोबर घ्या. ठिकाण निवडल्यावर तिथलं वातावरण लक्षात घेऊन त्यानुसार कपडे घ्या.

विशेष खबरदारी :

शक्यतो प्रवासात मौल्यवान वस्तु दागदागिने नेऊ नका. लग्नकार्यासाठी जाणार असाल तर दागिने घालून प्रवास करु नका. संबधित समारंभ आटोपल्यावर दागिने परत बॅगेत ठेवून द्या.

शक्यतो रात्रीचा प्रवास टाळा. रस्ता व जाण्याचे ठिकाण अपरिचित असेल तर रात्रीचा बिलकूल प्रवास करु नका. एखाद्या रस्त्याची माहिती हवी असेल तर पोलीस अथवा सुरक्षित ठिकाणी माहिती विचारा. शेवटी तुमची सुरक्षितता तुमच्याच हाती आहे. त्यासाठी नेहमी सतर्क राहा.

रस्ता सुरक्षा काळाची गरज

ओमनी फीचर्स

कार, रिक्षा, लॉरी वगैरे अनेक वाहनांचे अपघात होतात हे सर्वांना माहीत आहे. त्यांत काही गाड्यांवर गाड्या आपटून तर काही झाडाला ठोकर लागून तर काही दारुड्या ड्रायव्हरच्या हातून तर काही आपली गाडी पुढे काढण्याच्या चढाओढीत पण ही कारणे मामुली आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे रस्ते जर ठाकठीक नसतील, खड्यांचे असतील पावसाने वाहून गेलेले असतील, रस्त्यांना भेगा पडल्या असतील व दगडधोंडे वर आले असतील तर त्या सर्व गोष्टी चुकवून ड्रायव्हिंग करण त्याला अशक्य असत.

अर्थात रस्ते सुरक्षित ठेवण्यासाठी सुरक्षा आभियानतर्फे रस्त्यांची तपासणी करून जर वाहने जाणाऱ्या रस्त्यांची सिमेंट कॉंक्रिटचे करून वा डांबरी करून जर काळजी घेतली तर वाहनात असणाऱ्या माणसांचे जीव तरी वाचतील. कारण महत्वाचे कारण ॲक्सिडेंट आहे. खडकाळ आणि खड्डे असणाऱ्या रस्त्यावर वाहन चालवणं कठीण असते त्यासाठी सरकार आणि स्थानिक शासन संस्थांनी रस्त्याकडे लक्ष देऊन तपासणी करणं फार महत्त्वाचे आहे. कंत्राटदारांकडून वेळेवर काम करून घेऊन रस्ते व्यवस्थित ठेवणं महत्त्वाचे आहे. हलगर्जीपणाने नाहक निरपराधी माणसं रस्ते खराब असल्यामुळे मरण योग्य नाही. खराब रस्त्यामुळे ॲक्सिडेंट होण हे त्याला त्याच्या इभ्रतीला शोभत नाही. प्रत्येक इन्चार्ज असलेल्या व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखून पब्लीकला मदत करण हे त्या जबाबदार माणसाच आाद्य कर्तव्य गाडी चालवणाऱ्या ड्रायव्हरला दोष देण्यांत काही अर्थ नाही. वाहन चालवायला जर मार्ग चांगला ठीक नसेल तर तो तरी काय करणार ?

अर्थात वाहन मार्ग ठीक ठेवण हे काम रोड अधिकाराच्या हातात आहे. त्यामुळे निरअपराध लोकांचा मृत्यू तरी टळेल.

आता जी माणस आपल्या घरातील सर्व लहानासह म्हातारे आणि पोराबााळासा देवदर्शनासाठी किंवा सिध्द योग्याच्या दर्शना करता स्वत:चे घर सोडून स्वत:च्या किंवा भाड्याच्या कार किंवा टूरीजमधून दर्शनाकरता जातात आणि रस्ते खराब किंवा सुस्थितीत नसतील आणि अशा स्थितीत जर केवळ खराब रस्त्यामुळे ॲक्सिडेंट झाला तर काही यमाच्या दरबारात जातात तर काही हॉस्पिटलमध्ये जाऊन ट्रीटमेंट घेत असतांत त्यांत दर्शनासाठी गेलेल्या माणसांचा किंवा ड्रायव्हरचा काय दोष ?शय कार्यासाठी निघालेल्या माणसांच्या अडथळा निर्माण करणारा खराब रस्ता हे कारण असते अशा वेळी रस्ता दुरुस्त करणारे कॉण्ट्रक्टर आणि ज्यांच्या ताब्यात रस्ते असतात ते साहेब कानावर हात ठेवून मोकळे होतात आणि गुन्हा दुसऱ्यावर लादतात.

रस्ते-सुरक्षा म्हणजे जीवन सुरक्षा

सुनंदा सपकाळ

आपले जीवन हा एक प्रवास मानला जातो. मानवांच्या गरजेमधून असंख्य वस्तूंची निर्मिती झाली. त्यातलीच एक महत्त्वाची बाब वाहने. वाहनांच्या वाढत्या संख्येतून अनेक समस्या निर्माण झाल्या. वाहतूक सुरक्षित, व्यवस्थित होण्यासाठी रस्ते रुंद असणे महत्त्वाचे तसेच स्वच्छ सुध्दा असायला हवेत. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो, घरातील कचरा रस्त्यांवरील कचराकुंडीत न टाकता बाहेर इतरत्र टाकता त्यामुळे रस्ते अस्वच्छ, घाणेरडे होतात. शहरातील, महानगरातील रस्ते, बागा, शहराच्या सौंदर्यात भर टाकण्यास मदत करतात. शहर किती स्वच्छ, नीटनेटके आहे याची कल्पना रस्त्यांवरून केली जाते. पण आज सर्वत्र वाहतुकीच्या कोंडीमुळे दैनंदिन जीवनात अडथळे येत आहेत याला जबाबदार कोण? तर वाहनांची वाढती संख्या, शहरीकरण, वाढणारी लोकसंख्या.

आजच्या काळात रस्त्यावरून पायी चालत जाणं व अपेक्षित ठिकाणी वेळेवर पोहोचणं म्हणजे एक भव्य दिव्यच मानलं पाहिजे! असंख्य वाहने, फेरीवाले, विक्रेते, शाळेच्या बस, मोकाट जनावरे, रस्त्याच्या कडेलगत असणाऱ्या कचरा कुंड्या, वाढदिवस, उद्घाटन, जाहिरातींचे फलक, विजेचे खांब, रस्त्यालगतची झाडे, अनधिकृत दुकाने, हातगाड्या, रस्त्यालगत टाकल्या जाणाऱ्या केबल्स, ड्रेनेज पाईप, सांडपाण्याची जमिनीखालून टाकलेली वाहिनी, गटारे, निकृष्ट केलेले रस्त्याचे डांबरीकरण यामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा होतो, काही चौकात चारही दिशांनी येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूकीस अडथळा येतो. नादुरुस्त सिग्नल यंत्रणा व वाहतूकदलात अपुरी असणारी मनुष्यबळ यंत्रणेमुळे प्रचंड तणाव सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना येतो. मग समस्या नित्याच्याच म्हणून सर्वांच्या अंगवळणी पडल्यासारखे आपण सर्वच दैनंदिन जीवन कंठत असतो.

वाहनाची वाढत जाणारी संख्या यामुळे ध्वनिप्रदूषण व वायुप्रदूषणाच्या समस्या तीव्र बनत चालली आहे. त्याबरोबर चालकांचे वेगावर नियंत्रण नसणे, तसेच अतिवेगाचा हव्यास इतरांचे नाहक बळी घेतो. आपला आनंद इतराचं दुःख होणार नाही याची दक्षता सर्वांनीच घ्यायला हवी. 'अति घाई संकटात नेई' याचे स्मरण नित्य असायला हवे. वाहतुकीचे नियम सर्वांनीच पाळायला हवेत. म्हणजे असे सुरक्षा सप्ताह राबवण्याची गरज भासणार नाही. त्यासाठी सर्वांचेच सहकार्य मोलाचे ठरेल.

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करायला हवी. चारचाकी वाहने

वाहतुकीच्या रस्त्यावर थांबणार नाही अशी काळजी वाहतूक विभागाने घ्यायला हवी. संध्याकाळी वा

शाळा भरण्याच्या -सुटण्यावेळी अवजड वाहनांना प्रवेश बंद करावा. पण काही ठिकाणी सर्रासपणे वाहतूक चालूच असते. वृध्द, लहानमुले यांना रस्ता ओलांडणे, गर्दीतून वाट काढून पुढे जाणे फारच कठीण होत चालले आहे.

वाहतुकीसाठी अनेक प्रकारची वाहने वापरली जातात. त्यातील दूरवरची वाहतूक करणारी वाहने कधी कधी नादुरुस्त होतात व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. बऱ्याच वेळा अवजड वाहने ही अतिवेगाने चालवली जातात. घाटातून दरड कोसळून वाहतूक विस्कळीत होते. तर कधी कधी रस्ते खचतात. काही वेळा रस्त्यावरील दुभाजकाला वाहने धडक देतात. नदीवरील घाटात अनेक वेळा प्रवासी वाहतूक करणाऱ्या परिवहन महामंडळाच्या बसेस व खाजगी बसेस दरीत कोसळण्याच्या घटना घडतात. राष्ट्रीय महामार्ग गावाजवळून जात असेल तर तेथे उड्डाणपूल अथवा सिग्नल यंत्रणा सतत अद्ययावत स्थितीत असायला हवी!

'प्रवास' हा आजच्या काळात अत्यावश्यक असून तो करताना आपली काळजी आपणच घ्यावी, म्हणजे नंतर पश्चात्ताप करण्याची वेळ येत नाही. आज वाहतुकीमुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्या सोडवणेसुध्दा तेवढेच अपरिहार्य आहे. रस्ते रुंदीकरणामुळे काही ठिकाणी मोठमोठे वृक्ष जमीनदोस्त होत आहेत. मुंबई, पुणे महामार्ग चौपदरी करूनही अपघात वाढत आहेत.

अतिवेगाने वाहन चालवणे हे धोक्याचे असूनसुध्दा असंख्य लोक आपल्या जिवाशी खेळत आहेत. बऱ्याच वेळा रस्त्यावर होणाऱ्या अपघातांत जखमी झालेल्या व्यक्तींना लवकर रुग्णालयात नेले जात नाही. त्यामुळे त्यांचा अखेरचा क्षण जवळ येतो व आपले कायदे किचकट असल्यामुळे अपघातग्रस्तास हात लावण्यास कोणी पुढे येत नाही.

परवाच वाचनात आले. पनवेलजवळ राष्ट्रीय महामार्गावर एक महिला व मुलगी यांच्या अंगावरून पन्नास वाहने गेली त्यामुळे ती व्यक्ती ओळखणे कठीणच! आजच्या धावपळीच्या जगात थांबायला कोणी तयार नाही. दिवसेंदिवस वाहने अपघात यांचे प्रमाण वाढत असून त्यासाठी योग्य उपाययोजना करायला हवी!

कल्याणला दुर्गाडी सर्कलजवळ एक अपघात झाला होता. एक सायकलवरून जाणाऱ्या



माणसाला पाण्याच्या टँकरचे चाक त्याच्या पायावरून गेले होते. किती तरी विव्हळत होता बिचारा! वाहतूक पोलिसांनी ताबडतोब रिक्षावाल्याला आणले. तसेच कल्याणला संतोषी

माता रोडवर अपघातग्रस्ताला पाहण्यास असंख्य माणसं होती पण जवळ जाऊन दवाखान्यात नेण्यास कोणी तयार होईना. शेवटी एका महाविद्यालयीन तरुणीने आपल्या ओढणीस जखमेवरील रक्तस्राव थांबवण्यास बांधली पण तिला अपयश आले.

जगा आणि जगू, हेल्मेटचा वापर करा,
वेगावर नियंत्रण ठेवा, करा जीवनाचे रक्षण!

भऱ्याच क्षेत्रांत सुरक्षा शब्द फक्त कागदावरच राहताना दृष्टिक्षेपात येतो. ख्कारण समाज सर्वच क्षेत्रांत असुरक्षितता निर्माण झाली आहे. रस्त्यावरील खड्डे हे अनेकांचे बळी घेतात. दोनचार दिवसांनंतर पुन्हा तीच परिस्थिती दिसून येते. 'रस्ते सुरक्षा म्हणजेच आरोग्याची सुरक्षितता सुखी जीवनाची सुरक्षिता' या सुरक्षिततेसाठी गरज आहे आपणा सर्वांच्या सहकार्याची!

वाहन टिप्स्

१) वाहन चांगल्या अवस्थेत असावे.
२) ब्रेक उत्तम स्थितीत असावे.
३) कार्बोरेटरमध्ये कचरा नाही ना हे पहावे.
४) बॅटरीत पाणी व्यवस्थित असावे.
५) पेट्रोल चांगलेच वापरावे.
६) त्याबरोबर मशिनरींना वेळोवेळी तेल द्यावे.
७) पेट्रोल डिझेल बरोबर ऑईलचे योग्य प्रमाण असावे.
८) चाकांची स्थिती चांगली असावी.
९) चाकात हवा योग्य प्रमाणात असावी.
१०) गाड्यांचे मागचे-पुढचे दिवे चांगल्या पध्दतीने काम करणारे असावेत. वायरीची (गाडीच्या) वेळोवेळी तपासणी करून घ्यावी

- ओमनी फीचस

With Best Compliments From

ROCKY TRANSPORTS & CRANE SERVICES

Hiring All Type of Cranes Up to 400 Tons
Hydraulic Axles & Trailers

Bldg. No. XXI/2(A), Sea Port Air Port Road, H.M.T. Colony P.O,
Kochi, Kerala, India - 683 503. Phone : 0484-3228927
E-mail : rockytransports2003@yahoo.com
Website : www.rockycranes.com

वेग (SPEED)

रुपाली केळुसकर

ती काळोखी रात्र डोळ्यांसमोरून जात नाही. त्या रात्री पावसाने वातावरणात आलेला गारवा या क्षणीसुध्दा जाणवत होता. एक वेगळीच हुरहुर लागून राहिली होती. त्या दिवशी वेगळीच अस्वस्थता जाणवत होती. आजही स्पष्ट आठवतात ते भयानक क्षण...

रात्रीचे नऊ वाजले होते. त्या दिवशी समोरचा रस्ता निर्मनुष्य होता किंवा रात्र असल्यामुळे तसा भासत होता. वाहनांचा कलकलाट तसा कमी.

शेजारचे फाटक काका त्यांच्या पत्नीला जोरजोरात काहीतरी सांगत होते. बाहेर शांतता असल्यामुळे त्यांचा आवाज आमच्या घरात स्पष्ट ऐकू येत होता. आवाज थांबला. पुन्हा काही वेळानंतर ते फाटक काकूंना म्हणाले, ‘मी खाली जरा चक्कर मारून येतो. बसूनबसून पाय आखडले आहेत. दार लावून घे’. बहुतेक काकूंनी दरवाजा बंद केला असावा कारण दार जोरात आपटण्याचा आवाज आला.

मी गॅलरीत उभी राहून आकाशाकडे एकटक पाहत होते. आईचा आवाज कानांवर पडला, ‘‘सोनू, आत चल, जेवायला बस’’. मी म्हणाले, ‘‘बाबा आले की एकत्र बसू जेवायला’’. पुन्हा माझी नजर मी आकाशाऐवजी रस्त्याकडे वळवली. आमचे घर रेल्व स्टेशनजवळ असल्यामुळे गाडी आली की लोकांची झुंबड उडायची. आतासुध्दा गाडी आली असावी कारण निर्जन असलेला रस्ता अचानक गर्दीने फुलला.

स्टेशन शेजारी मोटार-सायकल ठेवायला जागा आहे. त्यामुळे गाडीतून उतरल्यावर लोक आपापली मोटार-सायकल घेऊन सुसाट वेगाने घराच्या दिशेने धाव घेतात. जवळ राहणाऱ्या लोकांना हे कष्ट सोसावे लागत नाहीत. असो ! मी त्याच रस्त्याकडे नजर लावून होते. बाबा येण्याची वाट पाहत होते. लोक मोटारसायकल घेऊन भरधाव वेगाने जात होते.

कट्ऽऽट्... कट्ऽऽट्...अचानक आवाज आला. अजूनही तो आवाज माझ्या कानांत घुमतोय. खूप गर्दी जमा झालेली दिसत होती. लोकांची कुजबूज चालू होती. स्पष्ट काहीच ऐकूं येत नव्हते. अचानक फाटककाकूंचा दरवाजा वाजला. कुणीतरी धबाधब दरवाजा वाजवत होते. काय झाले ते पाहण्यास मीसुध्दा दरवाजा उघडला. गणूदादा आला होता. काकूंनी दरवाजा उघडताच तो म्हणाला, ‘‘काकी, लवकर खाली चला. जोशी काकूंनी खाली बोलावलंय, ते काका... त्यांना ...’’. त्यांच्या आवाजात कापरेपणा जाणवत होता. त्यांचे पाय लटपटत होते. काकूंना तर काय करावे समजेना. त्या खाली कोसळल्या. मी आईला हाक मारली. काकी भानावर येताच आम्ही त्यांना घेऊन खाली

गेलो. तोवर गर्दी तशीच होती. त्यात एका- दोघांची भर झाली असेल कदाचित. काकू शेजारी उभ्या असलेल्या माणसांवर वसकारल्या, ‘‘अहो, नुसते बघत काय उभे तुम्ही ? यांना हॉस्पिटल मध्ये न्या कुणीतरी.’’ फाटककाकांचा तो रक्तबंबाळ देह काही केल्या डोळ्यांसमोरून जात नव्हता. काकुंचे तर देहभान हरपले. तो माणूस हताश होऊन म्हणाला, ‘‘अहो बाई, हे इसम जागच्या जागीच मृत्युमुखी पडले’’. काकींच्या पायाखालची जमीनच सरकली. कुणीतरी पोलिसांना कळवले असावे कदाचित. पोलिस येताच त्यांनी पंचनामा करायला सुरुवात केली. घटनास्थळी हजर असलेल्यांची विचारपूस केली असता, एक इसम म्हणाला, ‘‘अहो साहेब तो माणूस बाईक घेऊन भरधाव वेगात त्या दिशेने गेला. तो काय सापडायचा नाही.’’फाटककाकूंची अस्वस्थता कमकुवत झाली होती. त्यांचे जग संपुष्टात आले होते.

काही दिवस उलटले. पोलिसांनी त्या आरोपीला गजाआड केले. या गोष्टीला आता एक वर्ष उलटले. हळूहळू सारे काही पूर्ववत होत होते. फाटककाकू जास्त कुणाशी बोलायच्या नाहीत. हे सर्व त्या जोरदार बाईक चालवणाऱ्या माणसामुळे झाले होते, स्टेशन जवळ असलेल्या सरळ रस्त्यामुळे झाले होते. रहदारीच्या ठिकाणी स्पीडब्रेकर असणे गरजेचे आहे. प्रत्येकाने आपापल्या गाडीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. गाडीच्या वेगावर करण्यात आलेले कायदे व नियम लोकांनी पाळणे गरजेचे आहे. जर प्रत्येक माणूस जबाबदारीने वागला तर अपघातांना आळा बसेल.

वाहने सावकाश चालवा !!

With Best Compliments From

BHAVANI ABHISHEK TRAVELS

5, Keshrani Bhuvan, L.B.S. Marg, Near Patidar Hall,
Next to Keshva Bar, Ghatkopar (W), Mumbai - 400 036
Tel. : 2515 2042 / 2514 1958 (R) : 2506 2060

रस्ता

सरोज आपटे

संध्याकाळचे साधारण ६ वाजलेले, आमचे घराजवळच शिवाजी पार्क आहे, तेव्हा रमतगमत मैत्रिणीबरोबर गप्पा मारत चालले असतांना कोणीतरी मला साद घालत होते. ताई जरा आजच्या दिवस माझ्यासाठी वेळ काढशील? एक दिवस शिवाजी पार्कला फेरी न मारता मी जी माझी कहाणी सांगणार आहे. ती गोष्टीरूपाने सर्व जनतेसमोर मांड. तुला व जनतेला माझ्या त्रासाची कल्पना येईल.

''आपण कोण बोलता आहात? मी आपणांस ओळखत नाही तर मी काय जनतेसमोर तुमची व्यथा मांडणार?'' ''अग! तू सर्व प्राणिमात्र, वाहने सारे माझ्या अंगावरून चालता तो रस्ता. तुझ्याशी आज बोलायचेच ठरवले आहे. तेव्हा आज माझ्यासाठी थोडा वेळ काढशील ना?'' त्याच्या विनंतीपुढे माझे मन द्रवले मी त्याला माझ्यासमवेत शिवाजी पार्कच्या कट्यावर मैत्रिणींना घेऊन बसले. आज आपण रस्त्याची कहाणी ऐकूया म्हणून सामील करून घेतले. तेवढ्यात तेथे शेंगदाणेवाला आला. त्याच्याकडून दाणे घेतले व दाणे खात खात कथा ऐकू असा विचार करून रस्तोबाला सुरू कर म्हटले. त्याने सुरूवात केली तो एकीने खाऊन झालेला रिकामा कागद रस्त्यावर टाकला. बिचाऱ्याने दीर्घ श्वास सोडत म्हटले पाहा ह्या अशा चुका तुम्ही माणसं सारख्या करता याचाच मला त्रास होतो. जर कचरा कचराकुंडीत टाकत गेलात तर मी स्वच्छ राहीन ते किती बरे वाटेल. तुम्हांला आपले घर स्वच्छ असावे असे वाटते ना! मग रस्ताही स्वच्छ असावा असे का वाटत नाही?

आम्हांला आमची चूक कळली. ते कागद कचराकुंडीत टाकत आम्ही त्याला सॉरी म्हणालो. तेव्हा कुठे तो बोलू लागला. ''मला किती प्रकारे त्रास होतो ह्याची यादी ऐकाल तर थक्क व्हाल. दर दोन - चार महिन्यांनी कुऱ्हाडीचे कुदळीचे घाव बसतात. कधी गॅस लाईन, कधी टेलिफोन लाईन, कधी पाण्याची लाईन असे कायम काही ना काही कारणांनी माझी मोडतोड केली जाते. कधी पाण्याचा पाईप फुटला तर अंघोळ ठरलेली. परत फोडाफोडी आणि दुरुस्ती नको होतो जीव अगदी. तुम्ही माणसं आपल्या हौशीखातरं प्राणी पाळता व सकाळ, संध्याकाळ फिरावयास आपल्याबरोबर त्यांना आणता ते प्राणी माझ्याच अंगावर घाण करतात. तुमची घरे स्वच्छ आणि मी घाण किती

सोसावी! माझ्या कडेला गटारे असतात ती बंद आहेत तोवर ठीक असते पण त्यावरची झाकणे पळविली जातात आणि त्या दुर्गंधीने माझा जीव

कासावीस होतो. पावसाळ्यात तर पावसाच्या पाण्याबरोबर गटारातीत घाण माझ्या अंगभर पसरते. किती त्रास होत असेल मला, कल्पना करा.

माझ्या अंगावरून सतत ट्रक, बस, मोटारी, सायकली धावत असतात. काहींच्या अतिवेगामुळे मी हादरून जातो. कधी कधी तडे जातात, भेगा पडतात. मग दहा वेळा पाहणी, ठोकाठोकी व वरून गरम डांबरी थर या सर्व गोष्टींचा सतत त्रास होतो.

लहान मुले रस्त्याने सरळ चालत नाहीत. मारामाऱ्या धक्काबुक्की करत जातात. मग पडतात. दोष माझाच म्हणतात. त्यांना जखम झाली तर ते रक्त माझ्या अंगावर पडते त्याचेही वाईट वाटते. अपघात घडतात तेव्हा तर रक्ताचा सडाच माझ्या अंगावर पडतो. त्याने मी काय सुखावत असेन का ? मनाला क्लेशच होतात.

तुम्ही माणसं ऋतुमानाप्रमाणे कपडे, आहार सर्व बदलता माझा कधी कोणी विचारच करत नाही. मी उन्हाळ्यात तापतो, अंगाची लाही लाही होते. तुम्ही मारे छत्री, गॉगल, चपलांनी स्वतःचे संरक्षण करता. पावसाळ्यात खूप पाऊस आला. नद्यांना पूर आला, समुद्राला उधाण आले की ते सारे माझ्याच अंगावर येते. गटारे उघडी असली तर घाण अंगावर घेत नरकयातनाच भोगव्या लागतात. जोरदार वारे वादळ झाले की ते सारे उन्मळून माझ्या अंगावर पडतात. तो मार सहन करावा लागतो. विज जर अंगावर पडली तर मोठी जखम होते. पण तुम्हा लोकांचे लक्षच नसते. तुम्ही सारे स्वतःतच दंग असता.

हिवाळ्यात मी थंडगार पडतो. मला थंडी वाजते. गार वारे अंगाला झोंबतात. तुम्ही माणसे स्वेटर, मफलर, कानटोपी वगैरे घालून बाहेर जाऊ शकता. रात्री रग घेऊन झोपू शकता पण मी काय करावे. रात्री १२ ते ४ थोडी वर्दळ कमी होते तेवढीच विश्रांती मिळते. बाकी वर्षाचे ३६५ दिवस माझ्यावरुन अंसख्य माणसे, वाहने धावत असतात.मीसुध्दा समाजाचा एक घटकच आहे. कधी तरी आजारी पडतोच मी. अती तप्त झालो की तडे जातात. जमिनीतून गरम गरम लाव्हारस बाहेर पडून धरणीकंप होऊ लागतो. आतून बसणारे ते धक्के, तो तप्त रस ह्यांचाही त्रास होतो. लाखाची वस्ती धरणीमाता पोटात घेते तेव्हा तर मी गायबच होतो.

असा हा सारा त्रास. सांगू तरी कुणाला ? अनेक लेखक -कवी आतापर्यंत मला भेटले पण कोणालाच

वेळ नाही. तेव्हा तुला धरले, तू शांतपणे ऐकून घेतलेस त्याबद्दल धन्यवाद''.

मी त्याची कथा देशाची नागरिक या नात्याने

ऐकली व तुम्हासमोर मांडली.

कसे काय वाटले रस्त्याचे मनोगत? माझ्याप्रमाणेच त्याची कथा ऐकून तुम्हांलाही वाईट वाटेल असेल. ह्यावरून आपणांस बोध घेता येईल की आपण त्याच्याशी एकरूप झाले पाहिजे, आपल्याकडून होणारा त्रास तरी आपण कमी केला पाहिजे.

मी तर त्याची कथा ऐकून सुन्न झाले. कथा ऐकतांना माझ्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले. त्याच्या अंगावर दोन थेंब पडताच तो मला म्हणाला, ए ताई! अशी रडू नकोस ग, मी कोणापाशी तरी मन मोकळे करावे म्हणून तुला सांगितले तुला त्रास झाला असेल तर 'सॉरी हं' आता हास पाहू म्हणजे मला बरे वाटेल. अशी ही रस्त्याची आत्मकथा मला भावली, म्हणून गोष्टीरूपाने तुमच्यासमोर मांडली.

वाहन चालवताना खालील सूचना जरूर पाळा

१) आपल्या वाहनास अपघात झाल्यास नुकसान भरपाई मिळण्यासाठी वाहनाचा विमा उपयुक्त आहे, तसेच तो कायद्द्याने आवश्यक देखील आहे. कृपया विमा मुदतीत असल्याची खात्री करून घ्या आणि विम्याचे पेपर सोबत बाळगा.

२) आपले वाहन सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. त्यामध्ये टायर्स, ब्रेक स्टेअरिंग, सस्पेन्शन या बाबत विशेष खबरदारी घ्यावी. किरकोळ दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे साहित्य जवळ बाळगावे.

३) वाहनाची आसन क्षमता वाढवू नका.

- शांती सकपाळ

With Best Compliments From

PRAKASH ENGINEERS & INFRAPROJECTS (P) LIMITED

506-509, Shrikant chambers, adjacent to R.K. Studio, V.N. Purav Marg, Chembur, Mumbai - 400 071
t (Board) 022-2521 3483/3484/3485/3486 / f +91 22 2521 3481
Email : prakashengineers24@yahoo.com, prakashengineers24@rediffmail.com, prakashengineers24@gmail.com

वाहतूक

घनश्याम शेंडगे

देवदैवतांची वाहने आकर्षक, सुंदर, परम आनंद देणारी अशीच आहेत. हे दृश्य आपण नित्य-नेमाने मंदिरात त्यांचे दर्शन घेत असतोच. मंदिराच्या गाभाऱ्यात पाऊल टाकताक्षणी सर्वप्रथम दर्शन घडते ते नंदीचे. हा नंदी एकाग्र चित्ताने विचारमग्न झालेला असतो व म्हणत असतो (मनातल्या मनात) की, माझा मालक, धनी मला कधी आज्ञा देतो व कधी मी त्यांची सेवा करू शकतो. विविध देव, देवतानी विविध प्रकारचे आपली वाहने पशु-पक्ष्यांची निवडली आहेत. या वाहनांवरून आरामदायी प्रवास केला आहे. वाहतुक निर्विघ्नपणे पार पाडली आहे.मग कालानुरूप या वाहनामध्ये व वाहन चालकमध्ये बदल घडून आले. देवदेवतांची वाहतूक सुरळीतपणे पार पडू शकते मग आम्हा मानवांची वाहतूक सुरळीतपणे का होऊ शकत नाही ?

राजेमहाराजे हत्तीवरून सवारी करीत असे. सैनिक घोड्यावरून घोडेस्वार होऊन शत्रुवर तुटून पडत असत. बैलगाडी, घोडागाडी, उंट सफारी. लग्नसमारंभासाठी उमद्या घोड्यांचा वापर वाहन म्हणून केला जातो. आता यामध्ये बदल झाले, त्यांची जागा, सायकल, स्कूटर, बाइक, मोटार, चारचाकी वाहनाचा वापर होऊ लागला. रस्त्यावर ही वाहने दिसू लागली त्याचबरोबर वाहतुकीचे नियम, नियमावली तयार झाले. सर्व वाहनचालकांचे एकच ध्येय, वाहतुकीच्या साधनांचा वापर करावयाचा इच्छित स्थळी, वेळेतहुकुम पोहचणे. तरुणाला वेगात, अतिवेगात, जोशात जायचे असते, मग मनाचा ब्रेकच सर्वोत्तम ब्रेकचीलागण झाली. वेगावर मर्यादा आल्या. नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे पाळण्यावर भर दिला गेला. वाहतुकीचे नियम प्रत्येक वाहनचालकावर बंधनकारक झाले. त्याकरीता परीक्षा आल्या, पास-नापास, पुन्हा परीक्षा. जोपर्यंत वाहतुकीचे नियमांची परीक्षा पास होत नाही तोपर्यंत परवाना मिळत नसे. सदरचा परवाना वाहन चालक शिकत आहे. असा परवान्यावर शेरा दिला गेला. या शेऱ्यामुळे इतर वाहनचालकांना कल्पना आली की, समोरचा वाहनचालक नवखा शिकाऊ आहे. त्यामुळे नवख्या वाहनचालकास सांभाळून घेण्याचे इतरांना शिक्षण मिळाले, त्यामुळे वाहतूक सुरळीतपणे चालू राहण्यास मदत झाली. वाहतुकीचे नियम, प्रत्येक वळणावर चढउतारावर, नदी,

नाल्यावर, पुलावर, उजवीकडे, डावीकडे दिसू लागले. त्यामुळे वाहतुकीस अडथळे येण्याबाबत चिन्हे मदत करू लागली. रात्रीच्या वेळी चमकणारे

सूचना, चिन्हांचा स्पष्टता वाहनचालकास स्पष्ट दिसू लागल्या त्यामुळे रात्रीचा प्रवास, वाहतूक सोपी झाली.

वाहतूक सुरळीतपणे व्हावी म्हणून वेगावर मर्यादा आल्या. वाहन हळू चालवा, सावकाश जा, सुरक्षित पोहोचा, शाळा,दवाखाना, हॉर्न यांचे चित्र चिन्हे दर्शविण्यात आल्याने प्रवास सुखाचा झाला. वाहतूक शिस्तबध्द होण्यावर सर्वच स्तरावरून प्रयत्न सुरू झाले.शासन स्थरावरून जोर धरू लागले. प्रशिक्षण सर्व स्तरावरून राबविण्यात आले.सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी सामील झाले.सर्वांचे एकच लक्ष, वाहतुक सुरळीतपणे बिनदिक्कत व्हावी.

वाहतुकीत पादचाऱ्यांचे अडथळे येऊ नयेत म्हणून झेब्रा लाईन्स टाकल्या गेल्या. झेब्रा लाईन्सवरून पादचारी रस्ता ओलांडताना सक्ती करण्यावर भर दिला गेला. झेब्रा लाईन्सवरून पादचारी रस्ता ओलांडताना वाहनचालक काळजी घेत व प्रथम पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्याचे प्राधान्य दिले गेले. सिग्नलवर हिरवा, लाल मनुष्य दाखविण्यात आला. पादचारी हिरवा मनुष्य चालत आहे चिन्ह पाहून रस्ता ओंलाडत असे व तसे ते अंगवळणी येऊ लागले. त्यामुळे वाहतुकीत सुसूत्रता येऊ लागली.

आईचे, बाबांचे, ताईचे, भाऊचे बोट पकडून रस्ता ओलांडण्याचे शिक्षण चिमुकल्यांना झाले. लहान मुले-मुली रस्ता सुखासुखी ओलांडू लागले हेच तर सुरळीत वाहतूक चालण्याचे लक्षण आहे.

वाहनावर अतिबोजा आहे का? याची दखल पोलिसामार्फत घेतली गेली. दोन चाकी वाहनावर दोनपेक्षा जास्त सवारी जात आहे असे निदर्शनास आल्याबरोबर पोलिसामार्फत कारवाई होत गेली व वाहनचालकास वाहतुकीच्या नियमांचे प्रशिक्षण त्क्षणी मिळाल्याने वाहतूक बिन्नदिक्कत पुढे जाऊ लागली. त्याच बरोबर दोन चाकी वाहनचालकाचे बरेवाईट होऊ नये म्हणून व वाहतूकीत समस्या येऊ नयेत म्हणून दोन चाकी वाहन चालवणाऱ्यांवर हेल्मेट सक्तीचे केले. त्यामुळे वाहतूक निर्भळपणे पुढे जाऊ लागली.

विविध वस्तूंची वाहनांमार्फत वाहतूक होत असते. हलक्या वस्तू, जड वस्तू, रेती, पाणी, दगड, मुरुम, सिमेंट पोती, लोखडांच्या सळ्या, गॅस

सिलेंडर, सिमेंट पाईप इ. अति जड वस्तूंची वाहतूक होत असतांना पोलिसांमार्फत त्यांच्या वर लक्ष दिले जाते. योग्य त्या सूचना, योग्य ते सिग्नल, लाईटचे बिकिलिंग, वाहनचालकांची तंदुरुस्ती, त्याची दृष्टी, सोबत त्याचा सहाय्यक, परवाना इ.

तपासल्याने जड वाहनावरील वाहतुक सुरळीतपणे होण्यास मदत झाली. त्याचबरोबर हलक्या वस्तू वाहून नेणारे वाहन जसे, कुरमुरे, कापसाचे पोते, तंबाखू पानांचे पोते, कापसाचा गाड्या, वेळूचे खांब, उसाची चिपाडे, जुनी रद्दी पेपर, उसाच्या मोळ्या, भंगार वस्तू, प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्या, कचरा गाडी यांची वाहतूक वाहनांमार्फत होत असते. अशा वेळी सदरचा माल बरोबर फिट केला आहे का तपासले जावे. टाईट गाठी बांधल्या आहेत का तपासले जावे. वाहनचालकास या बाबी घेऊन जाण्याचा अनुभव आहे का तपासले जावे. नशापाणी केली आहे का ? किंवा नशापाणी मध्येच करतो का हे सुध्दा तपासले जावे. सदरची वाहतूक दिवसाच करावी, हलक्या वस्तू रात्री अपरात्री वाहनातून ने आण करणे टाळावे, वाहनातून अल्पसा भाग रस्त्यावर पडल्यास मागून येणाऱ्या वाहनास समस्या येतात. अचानक वस्तू दिसल्यामुळे वाहनचालक घाबरून जाऊ शकतो त्यामुळे वाहतुकीस अडथळा, समस्या येऊ शकतात.

अन्नधान्य, गहू, ज्वारी, बाजरी, डाळी, साखर यांच्या गोण्या उत्कृष्ट मापनाच्याच हव्यात, थोडीशी

बोळवण झाल्यास रस्त्यावरून त्याची गळती दिसू शकते. त्याचा परिणास मागील वाहनास अपघात होण्याचे समस्या उद्‌भवनाचे प्रकार होऊ शकतात.

रस्त्याच्या बाजूने चालणारे पादचारी त्यांचे लक्ष या बोळवणाकडे गेल्यास धान्य जमा करण्याकडे लक्ष जाते. पर्यायाने वाहतुकीच्या समस्या निर्माण होऊ



शकतात.

वजन, आकार यांची सांगड बरोबर आहे याची खात्री करावी वाहनात पुरेसे इंधन आहे, चाकातील हवा, नटबोल्ट फिट आहेत याची खात्री करावी. वाहनचालक, सहाय्यक तंदुरुस्त, परवानगीची पत्रे, चलन, ड्रायव्हिंग परवाना, टॅक्स परवाना, सर्व पुरावे सोबत आहेत याची खात्री करावी त्यामुळे इच्छित स्थळी पोहोचण्याचा आनंद वेगळाच असतो. पोहच केलेल्या मालाचे कौतुक केले जाते. बक्षीस मिळते, हा क्षण वेगळाच असतो.

वाहतुकीत केवळ आपण एकच आहोत असे नाही. आमच्यासोबत नाना तहेचे, नाना प्रकारचे, विविध आकारांचे, विविध रंगाचे, विविध आवाजांचे, विविध वजनांचे, विविध तोंडाचे, विविध सुविचारांचे, म्हणीचे, सूचनांचे, विविध अमृत डोसांचे, वाहने, वाहनचालका बरोबर असतात. आपली वाहतूक विविधतेने नटलेली असते. विविधतेतून एकता पाहावयास मिळते म्हणून म्हणावेसे वाटते सारे जहाँसे अच्छा! हिंदोस्तां हमारा! असेच गुणगुणत प्रवास होत असतो. मनाला भावेल असाच सुरक्षित प्रवास हेच गमक वाहतुकीत आहे असे वाटते म्हणून मेरा भारत महान !

वाहनचालक परवाना कसा मिळवायचा?

केतेकी सोनावणे

कुठल्याही सार्वजनिक स्थळावर मोटार वाहन चालवण्यासाठी चालक परवाना आवश्यक आणि अनिवार्य आहे. चालक परवाना स्थानीय वाहतूक प्राधिकारी देतात. चालकाजवळ त्याचे स्वतःचे नाव असलेला योग्य व त्या श्रेणीतल्या वाहनाचा चालक परवाना असणे आवश्यक आहे.

वाहन आणि सारथी : वाहतूक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी आणि संपूर्ण देशात एकसारखी व्यवस्था लागू करण्यासाठी सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने सेंट्रल मोटर व्हेईकल रूल्स १९८९ मध्ये काही तरतुदी केल्या आहेत. त्याप्रमाणे स्मार्टकार्ड आधारित चालक परवाना आणि नोंदणी प्रमाणपत्र दिलि जात. मंत्रालयाते त्यासाठी मानक सॉफ्टवेअर (नोंदणी प्रमाणपत्रासाठी वाहन व चालक परवान्यासाठी सारथी) तयार करून सर्व राज्यांना उपलब्ध केले आहे. हे सॉफ्टवेअर एकीकडे स्वचलनास मदत करते तर दुसरीकडे चालक परवाना आणि नोंदणी प्रमाणपत्र स्मार्टकार्डच्या रूपात देण्यास सक्षम करते. सर्व RTO डाटा वापरण्यासाठी आपसांत जोडली आहेत. मंत्रालयाने राज्य व राष्ट्रीय स्तरावर चालक परवाने व नोंदणी प्रमाणपत्रांचे राष्ट्रीय नोंदणी पुस्तक तयार करण्यासाठी ह्या डाटाचा उपयोग करण्याचे ठरविले आहे.



चालक परवान्याचे मुख्य दोन प्रकार आहेत

शिकाऊ परवाना

हा परवाना अस्थायी असून फक्त ६ महिन्यासांठी मान्य असतो. हा परवाना विशेष परिस्थितीत वाहनचालक शिकण्यासाठी देण्यात येतो.

स्थायी परवाना

हा परवाना स्थायी स्वरूपाचा असतो. हा वाहनचालकासाठी स्थायी दस्तऐवज आहे. कोणीही व्यक्ती शिकाऊ परवाना मिळाल्यापासून १ महिन्यात स्थायी परवाना घेण्यास पात्र असते.

पात्रता

चालक परवाना मिळविण्यासाठी विनंतीपत्र देताना व्यक्तीचे किमान वय १८ वर्षे असणे आवश्यक आहे. (व्यावसायिक वाहनांसाठी २० वर्षे, ५० सी सी इंजिन क्षमता असलेल्या वाहनांसाठी १६ वर्षे) पालक किंवा मातापित्यांची परवानगी आवश्यक आहे.

आवेदकाला वाहतुकीच्या नियमांची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

शिकाऊ परवाना कसा मिळवावा?

शिकाऊ परवाना मिळविण्यासाठी खालील

कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विनंतीपत्र (स्थानीय वाहतूक अधिकाऱ्यांजवळ उपलब्ध)

२. निवास प्रमाणपत्र

३. वय प्रमाणपत्र

४. आवेदकाचे ३ पासपोर्ट आकाराचे अलीकडील फोटो

५. फॉर्म -१ ए वर आरोग्य प्रमाणपत्र

६. फार्म- १ स्वप्रमाणित आरोग्य पत्र

७.अधिकाऱ्याने निर्धारित केलेली फी

सर्व आवश्यक कागदपत्रांची तपासणी

झाल्यावर रंग अंधत्वाची तपासणी केली जाते. त्यानंतर २० मिनिटांची एक शिकाऊ परिक्षा घेतली जाते. त्यात २० वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातात व ही परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्यास शिकाऊ परवाना दिला जातो. शिकाऊ परवाना मिळविण्यासाठी होणाऱ्या परीक्षेपुर्वी तयारीसाठी अधिकारी आवेदकाला एक लहान पुस्तिका देतात. सर्व परीक्षा संपल्यावर शिकाऊ परवाना त्याच दिवशी देतात.

स्थायी परवाना मिळवणे

१. आवेदकापाशी वैध शिकाऊ परवाना असला पाहिजे.

२. स्थायी परवाना मिळविण्यासाठी शिकाऊ परवाना मिळण्याच्या ३० दिवसांनंतर आणि १८० दिवसांच्या आत आवेदन करणे आवश्यक आहे.

३. आवेदकाला वाहनचालन नियमांची आणि वाहतूक नियमांची, वाहनांच्या रचनेबद्दल संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

आवश्यक दस्त ऐवज

१. वैध मूळ शिकाऊ परवाना.

२. फॉर्म क्रमांक ४ वर आवेदन.

३. आवश्यक शुल्क.

४. वय व निवास प्रमाणपत्र.

५.एक अलीकडचा पासपोर्ट आकाराचा फोटो.

६. व्यावसायिक परवान्यासाठी फॉर्म क्रमांक ५.

७.ज्या वर्गासाठी परवाना हवा असेल ते वाहन.

शर्व आवश्यक कागदपत्रांच्या तपासणीनंतर आवेदकाला वाहन चालनाची परीक्षा द्यावी लागते. त्या परीक्षेत आवेदकाची वाहनचालन कौशल्य, वाहनाची सवय, वाहतुकीच्या नियम कायद्याबद्दल त्याच्या ज्ञानाची परीक्षा होते. आवेदक ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास त्याला / तिला स्थायी वाहन चालन परवाना दिला जातो. आवेदक अनुत्तीर्ण झाल्यास तो / ती ७ दिवसानंतर परत परिक्षा देऊ शकतो / शकते.

वाहन चालवताना खालील सूचना जरूर पाळा

१) हेड लॅम्पमध्ये प्रखर किंवा रंगीत दिव्यांचा वापर करु नका, तसेच डिपरचा वापर करा.

२) मादक द्रव्यांचे सेवन करुन वाहन चालवू नका.

३) लेनची शिस्त पाळा ,वळण्यापूर्वी योग्य तो इशारा करा.

४) वाहन चालविताना मोबाईल फोनवर संभाषण करु नका.

- स्वाती कदम

रस्त्यावरील चालताना चिन्हांचा वापर अत्यावश्यक

मोघना देसाई

सडकेचा विशिष्ट भाग जिथे वापरला जातो तिथे हे संकेत अनिवार्य आहेत. हे संकेत काय करायचे व काय नाही करायचे असे दाखवतात. आवश्यक सडक चिन्हे साधारणपणे वर्तुळाकार असून त्यांना लाल किनार असते. त्यांतले कांही निळेही असतात. ''थांबा'' अन् ''मार्ग द्या'' हे क्रमश: अष्टकोनी व त्रिकोणी आकाराचे असतात. ह्यांचे उल्लंघन करणाऱ्यास भारी दंड व शिक्षा होऊ शकते. महत्वाचे म्हणजे, ह्याचे उल्लंघन केल्याने मोठे अपघातही होऊ शकतात.

थांबा

हे एक अत्यंत महत्वाचे आणि ठळक सडक संकेत आहे. संकेताप्रमाणे चालकाने एकदम वाहन थांबवावे. साधारणपणे, पोलीस, वाहतूक आणि टोल अधिकारी हे संकेत वापरतात.

मार्ग द्या

हे संकेत चौकात लावलेले असतात. जिथे विशिष्ट रेषेत वाहतूक शिस्त ठेवावी लागते. हे संकेत बरोबरीच्या वाहनांना उजवीकडे मार्ग देण्यासाठी असतात.

प्रवेश निषेध

हे संकेत कुठल्याही वाहनांना प्रवेश नसल्याचे दर्शवितात. काही भागातले काही खंड किंवा रस्ते ''प्रवेश नाही'' असे निर्धारीत केले असतात. इथे प्रवेश सीमित असू शकतात किंवा हे वाहन रहदारी मुक्त क्षेत्रही असू शकते.

येणाऱ्या वाहनांना प्राथमिकता

रस्त्याच्या सुरूवातीला असणारा हा संकेत येणाऱ्या वाहनांना प्राथमिकता देण्याबद्दल दर्शवितो. निमुळत्या रस्त्यावर जिथे वाहतूक कठीण किंवा शक्य नसते तिथे वाहतुकीचे नियमन प्राथमिकते प्रमाणे केले जाते. तिथे एका विशिष्ट दिशेने जाणाऱ्या वाहतुकीला प्राथमिकता देवून हे नियमान केले जातात. वाहतुकीचे दिवे लावून नाही. हा संकेत प्राथमिकता नसणाऱ्या वाहतुकीच्या बाजूने दाखवला जातो. ज्या बाजूला हा संकेत असतो त्या बाजूची वाहतूक तेंव्हाच सुरू होईल जेंव्हा समोरून येणारी वाहतूक नसेल.

सर्व मोटर वाहने प्रतिबंधित

हे संकेत दाखवतात की त्या भागाच्या आतली किंवा बाहेरची सर्व वाहने प्रतिबाधित आहेत. त्या भागाला मोकळेपणा द्यायला हे केले जाते. हे पादचारी क्षेत्र म्हणून वापरले जाते.

ट्रक प्रतिबंधित

संकेता प्रमाणे ह्या ठरलेल्या भागात ट्रक किंवा एचएमव्ही ना प्रतिबंध असतो. हे निमुळते क्षेत्र असू शकते किंवा जिथे जास्त रहदारी असू शकते तिथे भारी वाहन गाड्यांनी रस्त्यांच्या वाहतूकीस अडथळा

येऊ शकतो.

बैलगाड्या व हातगाड्या प्रतिबंधित

हे संकेत दर्शवितात की ह्या मार्गावर बैलगाड्या व हातगाड्या प्रतिबंधित आहेत. हळू चालणारी ही वाहने अनेक वेळा वाहन प्रवाह रूढ होतो.

बैलगाड्या प्रतिबंधित

परिवहनांचे सर्वात मंदगति साधन - बैलगाड्या - बऱ्याचवेळा वाहतूक सरळ प्रवाह अवरूध्द करतात म्हणून काही क्षेत्रे बैलगाड्यांसाठी निषिध्द करतात.

टांगे प्रतिबंधित

टांगे किंवा घोडागाड्या आतापर्यंत परिवहनाचे लोकप्रिय साधन होते. परिवहनाची नवी आणि जलद गति साधन आल्याने ह्या वाहनाने आता वाहतुकीत व्यत्यय येतो. काही क्षेत्रे टांग्यांसाठी प्रतिबंधित आहेत.

हातगाड्या प्रतिबंधित

हा संकेत चिन्हित मार्गावर हातगाड्या प्रतिबंधित असल्याचे दाखवतो कारण त्यामुळे जलदगति परिवहनांत व्यत्यय येतो.

सायकल प्रतिबंधित

सायकलस्वारांच्या सुरक्षिततेसाठी जलद गति परिवहनातले काही मार्ग सायकलींसाठी प्रतिबंधित केले जातात. हा संकेत असलेल्या रस्त्यावरून सायकल स्वारांनी जावू नये.

पादचारी प्रतिबंधित

हे संकेत त्या मार्गावर किंवा क्षेत्रांत पादचारी वाहतूक प्रतिबंधित करतात. हे जलद गति

वाहतुकीच्या लेनसाठी किंवा राजमार्ग इ. वर असू शकते. पर्यायी पारगमन व्यवस्था जसे उपमार्ग, पादचारी फूल इ. असणाऱ्या चौकांच्या ठिकाणी हे संकेत लावले असू शकतात.

उजवीकडचे वळण प्रतिबंधित

हा संकेत कोणत्याही परिस्थितीत उजावी कडे न वाळण्याचो वाहनचालकाला दर्शवितो.

डावी कडचे वळण प्रतिबंधित

हा संकेत डावी कडचे वळण प्रतिबंधित असल्याचे दर्शवितो

यू-टर्न प्रतिबंधित

हा संकेत काही व्यस्त चौकात दिसतो. व्यस्त चौकात यू-टर्न केल्याने मोठे अपघात होऊ शकतात किंवा वाहतूक अवरूध्द होऊ शकते. दंड आणि कुठलाही अपघात टाळण्यासाठी वाहनचालकाने ह्या संकेताचे उल्लंघन करू नये.

ओव्हरटेकिंग प्रतिबंधित

हायवे व ऑटोमोबाइल टेक्नॉलॉजीच्या प्रगतीमुळे वाहनांची गति वाढली जाते. त्यामुळे रस्त्यावर ओव्हरटेकिंग फार महत्वाचे झाले आहे. निमुळते रस्ते, पूल, वळणांवर ओव्हरटेकिंग फार घातकी झाले आहे. अश्या ठिकाणी हा संकेत लावल्याने ओव्हरटेकिंग प्रतिबंधित होऊन सुरक्षित देता येते.

हॉर्न प्रतिबंधित

आधुनिक काळात अति आणि अनावश्यक हॉर्न उद्दंड वागणे समजले जाते. तरीही काही ठिकाणी शांतता

क्षेत्र ठरवली गेली आहेत जसे इस्पितळं, शाळा वगैरे. हा संकेत वाहन चालकांना शांतता क्षेत्राची मर्यादा राखून हॉर्न न वाजवण्याची सूचना देतो.

रूंदी सीमा

हा संकेत पुढील क्षेत्रात जावू शकणाऱ्या वाहनांच्या रूंदी बद्दल सूचना देतो दोन मीटर पेक्षा जास्त रूंद वाहने ह्या क्षेत्रात प्रतिबंधित आहेत. हे क्षेत्र निमुळती लेन किंवा पूल असू शकतो.

उंची सीमा

काही रस्ते कमी उंचीच्या ठिकाणाहून उदा. पूल, रेल्वे लाईन खालून जातात. अनिष्ट टाळण्यासाठी प्राधिकरण पुलाखालून निघू शकणाऱ्या वाहनांची उंची निश्चित करते. अपघात आणि दंड टाळण्यासाठी ठराविक उंचीची सीमा निक्षून पाळणे आवश्यक आहे.

लांबी सीमा

हा संकेत ठराविक क्षेत्रातून जावू शकणाऱ्या वाहनांची लांबी दाखवतो. हे एक तीक्ष्ण वळण, पिन वळण इ. ही असू शकते हा संकेत लांब आणि विशाल गाड्यांसाठी असतो.

वजन सीमा

रस्त्यावर चालणाऱ्या वाहनांचे वजन सीमा दाखवणारा हा संकेत आहे. हा संकेत दाखवतो की ५ टन पेक्षा अधिक वजन असलेल्या गाड्या ह्या रस्त्यांवर जावू शकत नाही कारण पुढे असणारा पूल एवढे वजन पेलू शकत नाही किंवा रस्ता नरम असून एवढे वजन सहन करू शकत नाही.

एक्सल वजन सीमा

हा संकेत साधारणपणे पुलाच्या आधी लावला असतो. पूल किती वजन पेलू शकतो हे ह्या संकेताने कळते. ह्या संकेताची सीमा ४ टन आहे ह्याचा अर्थ फक्त तीच वाहने ज्यांचे एक्सल वजन ४ टन किंवा त्यापेक्षा कमी असेल पुलावरून जावू शकतात.

गतिसीमा

हा संकेत रस्त्यावर वाहनांची गति निर्धारित करतो. रस्त्यावर अपघात व दंड टाळण्यासाठी ठरवून दिलेली सीमा पाळायलाच हवी.

नो पार्किंग

मोठ्या शहरांमध्ये हा संकेत फार ठळक असतो. ठराविक क्षेत्रांत पार्किंग करायचे नाही अशी सूचना हा संकेत देत असतो. ह्या क्षेत्रात पार्क केलेले कुठलेही वाहन उचलले जाऊ शकते व मालक किंवा चालकाला दंड भरावा लागू शकतो. म्हणून चालकांनो गाड्या निर्धारित क्षेत्रातच पार्क कराव्या.

थांबू किंवा वाट बघू नये

काही रस्त्यांवर वाहती वाहतूक हवी असते आणि एका वाहनाचे थांबण्याने संपूर्ण वाहतूक गडबडते. अश्या ठिकाणी 'थांबू नये' संकेत लावतात. अश्या ठिकाणी थांबलेल्या गाड्यांना अपघात होऊ शकतो किंवा काही कारवाई केली जाऊ शकते.

आवश्यक डावे वळण (उजवे जर संकेत उलटा असला तर)

संकेत बघून डावीकडे वळावे. हे पथांतरणामुळे करावे लागू शकते.

आवश्यक पुढे (फक्त पुढे)

वाहतुकीने पुढे जावे व कोणतेही वळण

घेतल्यास दंड होऊ शकतो व सुरक्षिततेसाठी धोका ठरू शकतो असे हा संकेत सूचित करतो.

पुढे आवश्यक उजवे वळण (डावे जर संकेत उलटा असला तर)



हा संकेत चालकाला फक्त उजवीकडे वळण्यास निर्देश देतो. हा संकेत पाळल्याने सुरक्षित आणि सुखदायी प्रवास होतो.

आवश्यक पुढे किंवा उजवे वळण

हा संकेत वाहतुकीला सरळ पुढे जाण्यास किंवा उजवीकडे वळण्यास निर्देश देतो. डावीकडचे वळण प्रतिबंधित आहे.

आवश्यक पुढे किंवा डावे वळण

हा संकेत वाहतुकीला सरळ पुढे जाण्यास किंवा डावीकडे वळण्यास निर्देश देतो. उजवीकडे वळण प्रतिबंधित आहे. ह्या नियमांच्या उल्लंघनाने तुमच्या सुरक्षितता धोक्यात येवू शकते व इंग्रजी सराव लागू शकतो.

आवश्यक डावीकडे रहा

वाहत्या वाहतुकीसाठी चालकाने डाव्या लेन मध्ये रहावे असे हा संकेत दाखवतो. एकाच रस्त्यावर दोन्हीकडच्या वाहतुकीसाठी विभाजन नसेल अशा ठिकाणी हा संकेत लावतात.

आवश्यक सायकल मार्ग

आवश्यक सायकल मार्ग म्हणजे सायकल स्वारांनी आवश्यकरीत्या तोच मार्ग वापरायला हवा. ह्यामुळे इतर कुठल्याही वाहनांची वाहतुक ह्या मार्गावर निषिध्द होते.

आवश्यक हॉर्न द्या

काही परिस्थितीत हॉर्न वाजवणे आवश्यक असते. एखादे आंधळे वळण घेताना विशेष करून पर्वतीय रस्त्यांवर वळण घेण्याआधी हॉर्न वाजवणे हा सुरक्षा उपाय असतो. तुम्ही जिथेही हा संकेत बघाल तिथे येणाऱ्या वाहतुकीला तुमचे अस्तित्व कळण्यासाठी हॉर्न वाजवा.

आवश्यक कमीतकमी गतिसीमा

रस्त्याच्या सुरूवातीला जिथे हा संकेत लावला आहे तिथून पुढे त्या रस्त्यावर जाणारी वाहने कमीत कमी निर्देशिलेल्या गतीने वाहने चालवतील. दंड आणि अपघात टाळायला गतिसीमा काटेकारपणे पाळायला हवी.

प्रतिबंध अंत

रस्त्यावर संकेतद्वारे लागणारे प्रतिबंध इथे संपतात. ह्या विध्ष्ट जागेपुढे संकेताद्वारे लावलेले प्रतिबंध संपतात असे हे संकेत दाखवतात. तरीही, वाहनचालकांनी बेसावध असू नये व अपघात टाळण्यासाठी सर्व सावधगिरी बाळगावी.

सचेतक सडक चिन्ह

हे संकेत चालकाला पुढे सडकेवर येणाऱ्या धोक्यां/परिस्थिती बद्दल सावध करतात. चालकांनी त्यांच्या सुरक्षिततेसाठी हे संकेत पाळावे. तसे ह्या संकेतांचे उल्लंघनांनी काही कायदा मोडला जात नाही तरीही त्यांचे उल्लंघन केल्याने मोठे अपघात होऊ शकतात म्हणून ते खूप महत्वाचे आहेत. संचेतक संकेत त्रिकोणी असून त्यांना लाल किनार असते.

उजवीकडचे वळण

रस्त्यावर पुढे उजव्याबाजूचे वळण असल्याचे हा संकेत दाखवतो. त्यामुळे तुम्ही वाहनाला तश्या प्रकारे चालऊ शकता व त्यामुळे अचानक वळण आले तरी अपघाताची शक्यता नसते.

डाव्या कडचे वळण

रस्त्यावर पुढे डाव्याबाजूचे वळण असल्याचे हा संकेत दाखवतो. त्यामुळे तुम्ही वाहनाला तश्या प्रकारे चालऊ शकता. तुम्हाला वेग कमी करायला वेळ मिळतो व तुमचे डोळे वळणावर असतात. अचानक वळण आले तरी अपघाताची शक्यता कमी असते.

उजवे हे अरपिन वळण

हेअरपिन वळणं तिक्ष्ण असतात विशेष करून पहाडी रस्त्यांवर हा संकेत तुम्हाला पुढे उजवीकडे तीक्ष्ण वळण असल्याचे दाखवतो. वळणावर तुम्हाला वेग कमी करायला वेळ मिळतो व तुमचे डोळे वळणावर असतात हा संकेत नसला तर मोठे अपघात होऊ शकतात कारण पहाडी रस्त्यांवर तीक्ष्ण वळणं लवकर दिसत नाहीत.

डावीकडचे हे अरपिन वळण

हा संकेत तुम्हाला पुढे डावीकडे तिक्ष्ण वळण असल्याचे दाखवतो. हे संकेत विशेष करून पहाडी रस्त्यांवर लावले जातात. वळणावर तुम्हाला वेग कमी करायला वेळ मिळतो व तुमचे डोळे वळणावर असतात हा संकेत नसला तर मोठे अपघात होऊ शकतात कारण पहाडी रस्त्यांवर तीक्ष्ण वळणं लवकर दिसत नाहीत.

उजवे उलट वळण

हा संकेत वास्तविक चित्र दाखवतो उदा. Z सारखे पुढे रस्त्याला वळण. हा संकेत चालकाला पुढे उजवीकडे वळणदार रस्ता असल्याबद्दल सचेत करतो. चालकाने हा संकेत बघताच वेग कमी करावा व तश्या प्रकारे वाहन चालवावे.

डावे उलट वळण

हा संकेत वास्तविक चित्र दाखवतो उदा. Z सारखे पुढे रस्त्याला वळण. हा संकेत चालकाला पुढे डावीकडे वळणदार रस्ता असल्याबद्दल सचेत करतो. चालकाने हा संकेत बघताच वेग कमी करावा व तश्या प्रकारे वाहन चालवावे.

उभे चढण

पुढे उभे चढण असल्याचे हा संकेत दाखवून सचेत करतो. चालकाने चढण चढायची तयारी करून वाहन योग्य गियरमध्ये टाकावे. बहुधा हे संकेत डोंगरी रस्त्यांवर असतात जिथे उभेचढण व उतार वाहतूक नेहमीचीच आहे.

उभा उतार

पुढे उभा उतार असल्याचे हा संकेत दाखवून सचेत करतो. चालकाने चढण चढायची तयारी करून वाहन योग्य गियरमध्ये टाकावे. उतारावर वेग वाढऊ नये कारण त्याने वाहनावरची पकड सैल होते. अधिकतर हा संकेत पहाडी रस्त्यांवर असतात जिथे उभेचढण व उतार वाहतूक नेहमीचीच आहे.

पुढे निमुळता मार्ग

जेंव्हा रस्त्याची रूंदी कमी होऊन पुढे तो निमूळता होतो तिथे वेगाने येणारे वाहन समोरून येणाऱ्या वाहनाला

धडक देण्याची शक्याता असते. हा संकेत चालकाला पुढच्या निमुळत्या रस्त्याची सूचना देतो.

पुढे रूंद मार्ग

हा संकेत पुढे रस्ता रूंद असल्याचे दाखवतो. रस्त्याची रूंदी ह्या संकेताच्या पुढे वाढते व वाहतुकीने त्याप्रमाणे समायोजन करावे.

अरूंद पूल

अनेकवेळा रस्ता कमी रूंदीच्या पुलाकडे निमुळता होतो. हा संकेत अश्या पुलांच्या आधी लावलेला असतो. जिथे रस्त्यापेक्षा पूल अरूंद असेल. सुरक्षिततेसाठी चालकाने वेग कमी करून समोरून येणाऱ्या वाहतुकीकडे लक्ष द्यावे.

निसरडा रस्ता

हा संकेत रस्ता निसरडा असल्याचे दाखवतो. त्याची ही अवस्था गटारीच्या पाण्याने किंवा तेल इ.सांडल्याने होऊ शकते. चालकाने अपघात टाळण्यासाठी अश्या ठिकाणी वेग कमी करावा.

सैल बजरी

हा संकेत जास्त करून डोंगरी क्षेत्रात लावला असतो जिथे डोंगर कोसळत असल्याने सडकेवर रेव असते. ह्या संकेता नंतर चालकाने वाहन हळू व सावधतेने चालवावे कारण थोड्याही बेपर्वाइने मोठा अपघात घडू शकतो.

सायकल क्रॉसिंग

हा संकेत पुढे मुख्य रस्त्याला सायकलपथ पार करत असल्याचे किंवा सायकलस्वारांची रहदारी जास्त असल्याचे दाखवतो. चालकाने सावधतेने चौरस्ता पार करावा म्हणजे सायकल स्वारांना सुरक्षितपणे रस्ता पार करता येईल.

पादचारी पार पथ

पादचारी रहदारीचा राजा असतो. हा संकेत चालकाला वेग कमी करायला किंवा वाहन थांबवून पादचाऱ्याला रस्ता पार करू देण्यास सावध करतो. रस्त्यांवर काही भाग पांढऱ्या पट्यांनी रंगवलेला असतो ह्याला झेब्रा क्रॉसिंगवर म्हणतात. झेब्रा क्रॉसिंगवर पादचाऱ्याचा पहिला हक्क असतो.

पुढे शाळा आहे

हा संकेत पुढे किंवा जवळच शाळा असल्याचे दर्शवितो. अपघात टाळण्यासाठी चालकाने वाहनाचा वेग कमी करावा. बहुधा मुले पळून रस्ता पार करतात किंवा अनपेक्षित हालचाली करतात. म्हणून त्यांच्या सुरक्षेसाठी शाळांजवळ नेहमीच सावधतेने वाहन चालवावे.

यातायात संकेत

हा संकेत रस्त्यावर वाहतूक तीन रंगी दिव्यांच्या संकेतांनी नियमित केल्याचे दाखवतो कारण चालकाला रस्त्यावर असल्या भागाची अपेक्षा नसू शकते.

जनावरं

व्स्त्यावर जनावरं भटकत असल्याची शक्यता असल्याचे हा संकेत दाखवतो. वाहतुकीला जनावरं अनपेक्षित प्रतिक्रीया देत असल्याने रस्त्यावरच्या जनावरांमुळे मोठा अपघात होऊ शकतो. म्हणून असा संकेत दिल्यास चालकाने सावधतेने वाहन चालवावे.

फेरी

अनेक ठिकाणी रस्त्यावर पूल नसतो व रस्ता

नदीने विभागला जातो. असे रस्ते फेरीसेवेने जोडले जातात. हा संकेत फेरीसेवा उपलब्ध असल्याचे दाखवतो.

कोसळत्या शिळा

टोकाच्या हवामानांत जमीन घसरणीच्यावेळी डोंगरी रस्त्यांवर शिळा येऊन पडतात. पुढील रस्त्यावर शिळा पडू शकतात असे हा संकेत दाखवतो. अपघात टाळण्यासाठी चालकाने सावधतेने वाहन चालवावे.

घातक खड्डा

पुढे रस्त्तांवर घातक असल्याचे हा संकेत दाखवतो. चालकाला वेग कमी करून खड्यात पडण्यापासून हा संकेत वाचवतो.

उंचवटा किंवा खडबडीत रस्ता

वाहतुकीचा वेग कमी करण्याकरता अनेकवेळा रस्त्यावर मुद्दाम उंचवटे केलेले असतात. उंचवटा आरामाने पार करण्यासाठी हा संकेत चालकाला वेग कमी करण्याची सूचना देतो.

पुढे अवरोध

अनेकवेळा रस्ता टोलनाके /तपास चौकी इ. ला जातो. अश्या ठिकाणी अवरोध असू शकतात. पुढे रस्त्यावर अवरोध असून वाहनाला थांबण्याचा हा संकेत असतो.

रस्त्यांतील खिंडार

रस्ता विभाजकात पुढे खिंडार असून यू वळणा सावधान असल्याचे हा संकेत दाखवतो. चालकाने अपघात टाळण्यासाठी वेग कमी करून योग्यती लेन ठेवावी.

चौरस्ता

हा संकेत पुढे चौरस्ता असल्याचे दाखवतो. चालकाने वेग कमी करून दोन्ही बाजूला बघून सावधतेने चौरस्ता पार करण्यास सूचना देतो.

डाव्या बाजूचा रस्ता

हा संकेत मार्ग द्या ह्या घटकातला आहे. हा विशिष्ट संकेत डाव्या बाजूला संकेत असल्याची सूचना देतो. सडकेवर जाणाऱ्या गाड्यांनी या बाजूच्या वाहतुकीला रस्ता द्यावा.

उजव्या बाजूचा रस्ता

हा संकेत मार्ग द्या घटकातला आहे. हा विशिष्ट संकेत उजव्या बाजूला संकेत असल्याची सूचना देतो. सडकेवर जाणाऱ्या गाड्यांनी या बाजूच्या वाहतुकीला रस्ता द्यावा.

वाई - विभाजन

हे सडक संकेत वास्तविक रस्त्याबद्दल सावधान करतात. रस्ता y आकारांत दोन रस्त्यांत विभागला असतो. संकेतामुळे चालकाला विभाजन पार करण्यास मदत होते.

वाई - विभाजन

हे सडक संकेत वास्तविक रस्त्याबद्दल सावधान करतात. रस्ता Y आकारांत दोन रस्त्यांत विभागला असतो. संकेतामुळे चालकाला विभाजन पार करण्यास मदत होते.

टी विभाजन

हा संकेत रस्त्यावर पुढे असणाऱ्या T आकाराच्या संगमाबद्दल व पुढे सरळ मार्ग नसल्या बद्दल सावधान करतो.

वाहतुकीला डावे किंवा उजवे वळण घ्यावे लागते. ह्या संकेताने चालकाला रस्त्यावरच्या योजना करता येतात.

विस्खळित विभाजन

कमी अंतरावर डावी व उजवीकडे रस्ते असल्याचे हा संकेत दाखवतो. ह्या क्षेत्रांत रस्ता पार करण्याची परवानगी नाही.

विस्खळित विभाजन

कमी अंतरावर उजवी व डावीकडे रस्ते असल्याचे हा संकेत दाखवतो. ह्या क्षेत्रांत रस्ता पार करण्याची परवानगी नाही.

घोलाकार

रस्त्यांच्या चौकाचे पर्याय म्हणजे हे गोल आहेत. ह्यामुळे वाहतुक दिव्यांशिवाय नियमित राहते. पुढे गोल असल्याचे हा संकेत दाखवतो व त्यानुसार चालकाने वळण घेण्याआधी योग्य लेन घ्यावी.

सावध लेबल क्रॉसिंग



अनेकवेळा रस्ता रेल्वे रूळांवरून जातो. ह्या संकेताप्रमाणे पुढील रेल्वे क्रॉसिंग व्यक्ति द्वारा सतर्क केले असल्याचे कळते. चालकाने अधिक काळजी घ्यायला हवी. एक किंवा दोन लाल पट्या रेल्वे क्रॉसिंग १०० किंवा २०० मीटर दूर असल्याचे सूचित करतात.

बेसावध रेल्वे क्रॉसिंग

ह्या संकेताप्रमाणे पुढील रेल्वे क्रॉसिंग व्यक्ति द्वारा सतर्क केले नसल्याचे कळते. हे बेसावध रेल्वे क्रॉसिंग चालकानेच रेल्वे जवळपास नाही हे बघून फार सावधतेने पार करायला हवे. एक किंवा दोन लाल पट्या रेल्वे क्रॉसिंग १०० किंवा २०० मीटर दूर असल्याचे सूचित करतात.

घाट किंवा नदी किनारा

न संकेत पुढे घाट किंवा नदी किनारा असल्याचे सूचित करतो. चालकाने काळजीपूर्वक सावधतेने वाहन चालवावे.

माणसे काम करीत आहेत

व्स्त्यात पुढे दुरूस्ती/सफाई इ. चालू असून त्यात कामगार लागले असल्याचे हा संकेत दाखवतो. व्स्त्यावर काम करणाऱ्या लोकांना वाहतुकी पासून सुरक्षा लागते म्हणून दुरूस्तीची काम होत असलेल्या ठिकाणाआधी हा संकेत लावला जातो. कामगारांच्या सुरक्षेसाठी चालकाने वाहन हळू व सावध होऊन चालवावे.

माहितीपरक चिन्हे

हे संकेत सडकेवर जाणाऱ्या माणसांना दिशा, गंतव्य, सडकांवरच्या सुविधा इ. बद्दल माहिती देतात. खालील माहितीपरक संकेत इकडे तिकडे न भटकता सरळ गंतव्याला पोहचायला चालकाचा वेळ वाचवतात. हे संकेत चालकाला सुसाध्य असून बहुधा निळ्या रंगाची असतात. संकेतावर सुविधेची दिशा दाखवली असू शकते आणि संकेतापासून सुविधेचे अंतरही.

पुढील दिशा संकेत

हा संकेत त्या रस्त्यावर असलेल्या वेगवेगळ्या गंतव्यांच्या दिशा दाखवतो. बहुधा हा संकेत रस्ते जिथे मिळतात त्या जागेच्या आधी लावला जातो.

व्स्ते जिथे मिळतात त्या जागेच्या आधी

गंतव्य स्थानाचे संकेत

हा संकेत त्या रस्त्यावर असलेल्या वेगवेगळ्या गंतव्यांच्या दिशा बाणांने दाखवतो त्यामुळे चालकाला बरोबर रस्त्यांवर असल्याची खात्री असते.

पुढील दिशा संकेत

हा संकेत त्या रस्त्यावर येणारी विविध गंतव्य स्थानांची दिशा व तिथले अंतर दाखवतो. बहुधा हा संकेत रस्ते जिथे मिळतात त्या जागेच्या आधी लावला जातो.

दिशा संकेत

हा संकेत गंतव्य स्थानांची दिशा व तिथले अंतर दाखवतो. ह्या संकेत फलकाने चालकाला गंतव्य स्थान शोधायला मदत मिळून वेळ व इंधन वाचते.

स्थान पुष्टी संकेत

हा संकेत स्थानाची क्षेत्राची पुष्टी करतो. त्या दिशेस क्षेत्राची सुरूवात झाल्याची सूचना हा संकेत देतो. राष्ट्रीय राजमार्गावरचा हा संकेत एक उदाहरण आहे.

पेट्रोल पंप

हा संकेत पुढे पेट्रोल पंप असल्याची सूचना देतो. कधीकधी संकेतावर अंतरही दिले असल्याने संकेतापासून पेट्रोल पंपाच्या जागेबद्दल कल्पना येते.

हॉस्पिटल

हा संकेत पुढे हॉस्पिटल असल्याची सूचना देतो. ह्या रस्त्यावर जाताना चालकाने सावध असावे व हॉर्न वाजवू नये.

प्राथमिक उपचार

हा संकेत पुढे प्राथमिक उपचार सेवा उपलब्ध असल्याची सूचना देतो. आणिबाणीच्या वेळी किंवा अपघाताच्या वेळी हे फार उपयोगी पडते. साधारणपणे हे संकेत हायवेज व ग्रामीण क्षेत्रात उभारले जातात.

खाण्याच्या जागा



हा संकेत जवळच खाण्याच्या जागा उपलब्ध असल्याची सूचना देतो. हे संकेत हायवेज व लांब रस्त्यांवर सामान्य आहेत.

आहार गृहे

हा संकेत जवळच आहार गृहे उपलब्ध असल्याची सूचना देतो.

विश्राम स्थळ

हा संकेत मोटेल, लॉज किंवा इतर विश्राम स्थळांच्या जवळ असतो. हे संकेत हायवेज वर दिसतात.

पुढे सार्वजनिक रस्ता नाही



'पुढे सार्वजनिक रस्ता नाही' हा संकेत पुढे रस्ता नसल्याची सूचना देतो. चालकांना हा संकेत पुढे रस्ता नाही असे सुचवितो.

बस स्टॉप

हा संकेत बस स्टॉप असल्याचे दाखवतो. (सर्व बसेस सार्वजनिक परिवहन) इथे थांबतील असे हा संकेत सूचित करतो.

रेल्वे स्टेशन

हा संकेत रेल्वे स्टेशनची जागा दाखवतो.

सार्वजनिक टेलीफोन

हा संकेत जवळच टेलीफोनची सोय असल्याचे दाखवतो.

पुढे बोगदा आहे.



हा संकेत पुढे बोगदा असल्याचे दाखवतो. कांहीवेळा ह्या संकेतावर बोगद्याची लांबी व त्याचे नावही लिहिले असते.

पादचारी भुयारी मार्ग

हा संकेत पादचारी भुयारी मार्गाचे द्वार दाखवतो. रस्ता पार करायला पादचाऱ्यांनी हमखास हा रस्ता वापरावा.

दोन्ही बाजूला वाहने उभी करा



'वाहने उभी करा' हा संकेत विशिष्ट प्रकारच्या वाहनांना उभी करण्याची अधिकृत जागा दाखवतो. चालकांनी म्हणूनच ते आपले वाहन बरोबर व अधिकृत जागेवर उभी करत आहेत ह्याची खात्री करून घ्यावी. जसे हा संकेत दाखवतो की वाहने दोन्हीकडे उभी करू शकता.

पार्किंग स्थळ सायकल

वाहने उभी करा - हा संकेत विशिष्ट प्रकारच्या वाहनांना उभी करण्याची अधिकृत जागा दाखवतो. चालकांनी म्हणूनच ते आपले वाहन बरोबर व अधिकृत जागेवर उभी करत आहेत ह्याची खात्री करून घ्यावी. जसे हा संकेत दाखवतो कि ही जागा सायकल उभी करण्यासाठी निश्चित केली आहे.

पार्किंग स्थळ सायकल रिक्शा

वाहने उभी करा - हा संकेत विशिष्ट प्रकारच्या

वाहनांना उभी करण्याची अधिकृत जागा दाखवतो. चालकांनी म्हणूनच ते आपले वाहन बरोबर व अधिकृत जागेवर उभी करत आहेत ह्याची खात्री करून घ्यावी. जसे हा संकेत दाखवतो कि ही जागा सायकल रिक्शा उभी करण्यासाठी निश्चित केली आहे.

पार्किंग स्थळ स्कूटर्स व मोटार सायकली

वाहने उभी करा - हा संकेत विशिष्ट प्रकारच्या वाहनांना उभी करण्याची अधिकृत जागा दाखवतो. चालकांनी म्हणूनच ते आपले वाहन बरोबर व अधिकृत जागेवर उभी करत आहेत ह्याची खात्री करून घ्यावी. जसे हा संकेत दाखवतो कि ही जागा स्कूटर्स व मोटार सायकली उभी करण्यासाठी निश्चित केली आहे.

पार्किंग स्थळ टॅक्सी

वाहने उभी करा - हा संकेत विशिष्ट प्रकारच्या वाहनांना उभी करण्याची अधिकृत जागा दाखवतो. चालकांनी म्हणूनच ते आपले वाहन बरोबर व अधिकृत जागेवर उभी करत आहेत ह्याची खात्री करून घ्यावी. जसे हा संकेत दाखवतो कि ही जागा टॅक्सी उभी करण्यासाठी निश्चित केली आहे.

पार्किंग स्थळ ऑटो रिक्शा

वाहने उभी करा - हा संकेत विशिष्ट प्रकारच्या वाहनांना उभी करण्याची अधिकृत जागा दाखवतो. चालकांनी म्हणूनच ते आपले वाहन बरोबर व अधिकृत जागेवर उभी करत आहेत ह्याची खात्री करून घ्यावी. जसे हा संकेत दाखवतो कि ही जागा रिक्शा उभी करण्यासाठी निश्चित केली आहे.

कविता

वाहतुकीचे नियम

वाहतूकीचे नियम सारे
कधीच तुम्ही मोडू नका
मिनीटांच्या त्या घाईसाठी
जिवन उधळून लावू नका ।।
दुचाकीवर स्वार होऊनी
वाऱ्यासंगे धावू नका
मृत्युआधी कधीच तुम्ही
स्वार मृत्युवर होवू नका ।।
हॅल्मेट आणि सीटबेल्टचा तो
वापर तुम्ही टाकू नका
मिळेल जागा तेथुन तुम्ही
ओव्हर टेक ते करु नका ।।
शिस्त लेनची आणि सिग्नल
कधीच तुम्ही मोडू नका
स्पर्धा करून वाहनांची ती
द्वार यमाचे ठोकू नका ।।
वाट पहाते घरी कोणी ते
भान तयाचे विसरू नका
अनाथ करुनी माय लेकरे
कष्टी तयाना करु नका ।।
गणरायाचा दास सांगतो
अती काहीही करु नका
अमुल्य असे हे जीवन आपले
व्यर्थ तयाला दवडू नका ।।

-राजेश बा. अधटराव

मार्ग व पायवाट

रस्ता आणि हमरस्ता
गल्ली आणि बोळ
सारे मार्ग चालण्याचे
वाट नेईल तिकडे जाण्याचे।।

सारे ऐकमेकांशी भांडू लागले
ते पाहून पायवाटेला हसू आले
साऱ्यांनी भांडण आपले थांबवले
वाटेकडे डोळे वर करुन पाहिले।।

पायवाट म्हणाली हसून त्यांना
आपण सारे एका माळेचे मणी
मग कशाला बरे काढता
एकमेकांची तुम्ही उणी-धुणी ।।

मी तर बाई वाट पाहते
कधी तुमचे भांडण मिटते
चला माझी आता वाट सोडा
मग खूशाल करा तुम्ही राडा ।।

नाही कुणाची मी वाट लावते
नाही कुणाची मी वाट अडवते
वाट करुन देणे माझे काम आहे
त्यातच मला समाधान आहे ।।

-सुरेश देहेरकर

कायदा पुस्तकावर - सुरक्षा वाऱ्यावर

कितीही मेळावे भरवले
कितीही चर्चासत्रे आयोजले

तरीही जागृतीचा अर्थ, जाग येत नाही
अन् त्यावर कृती होत नाही. ।।१।।

कळले आहे अनुभवे जनतेला
जरी अभियान माध्यमी टाहो फोडला
तरी तसेच चाले,जे मंजुर यंत्रणेला
कारण बदल पेक्षा युनियन दल असे पाठीला।।२।।

आता सांगा कोणाची जागृती करायची
जनतेपेक्षा करायला हवी नियंत्रकांची
अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांची
बोंबा मारी जनता, भिती दोषी ठरण्याची ।।३।।

ना अधिकार, कायदा पुस्तकी लिहलेला
प्रत्येकाचा गॉड फादर सांगतो तोड नियमाला
खिसा भरती, फाट्यावर मारती जनतेला
तरी आवाहन छापून येती जाहिरातीला ।।४।।

सुरक्षा –सुविधासाठी नियमात अभाव आहे
नियम कोणासाठी केले सरकार सायलेंट आहे

जनता वाऱ्यावर, पर्वा न येथे जनतेची
जनता होरपळते, हीच आहे गोची ।।५।।

-र.सोनार

कधी चांगले दिवस येणार...

वर्तमानपत्र जगाचा आरसा
बातम्याद्वारे चेहरा दिसे चांगला-वाईटसा

सर्व क्षेत्रात दिसे ती मुजोरी
रिक्षा वा टुरीस्ट वाहन फिरती गावदारी ।।१।।

नियंत्रण नाही दरपत्रकात, वाढे सणावारी
सी एन जी गाडी, दर पेट्रोलचे घेती भारी
जनतेची परवड होते, लाचार जनता ती
युनियनवाले, वाहनमालक खिसे भरती ।।२।।

कायदा सांगतो, कोणी ना ऐकतो अधिकारी भला
अभियान सांगते मत पाठवा जागृतीला
कोणाची जागृती करावी, हे ना ठरवी कोणी
जनतेला शिक्षा येथे, वाली ना कोणी ।।३।।

रिक्षा, ट्रान्सपोर्ट, डॉक्टर संप करती
अपघाती मुजोरी त्याची ,जिवनाशी ते खेळती
खड्डे तसेच, अपघाती पांढरे बगळे मिळून
मासा खाती, पैशाचा खिसा भरुन ।।४।।

पंतप्रधान म्हणती चांगले दिवस येणार
गरीब मरती, गुन्हेगारांची मुजोरी वाढणार

जनता सुरक्षा, सुविधांची वाट पहाणार
श्रीमंत वाढतील, सरकार क्रमवारी ठरवणार. ।।५।।

-रमाकांत सोनार

रस्त्याचे वास्तव

इथं तिथं विखुरले रस्त्यांचे जाळे
त्यांच्यामुळेच आपल्याला इच्छित स्थळ मिळे
खरोखरचं रस्ते असतात स्वच्छ, छान
पण, आपणच टाकतो त्यांच्यावर घाण
रस्त्यावर होतात भेटीगाठी
रस्ते असतात खरेदी आणि विक्रीसाठी
पूर्वी रस्त्यावर काढलेली असायची सुंदर चित्र
बाजुलाच बसलेल असायचं अनोळखी व्यक्तिमत्तव
रस्ते असतात वळणाचे घाटातून जाणारे
रस्ते असतात लक्ष वेधून घेणारे
असेल वेगावर नियंत्रण तर प्रवास होतो सुखाचा
नाहीतर प्राण जातो कित्येकांचा
रस्त्यानांही दिलेली असतात सुंदर नावं
रस्त्यामुळेच जोडली गेली असंख्य गावं

-सुनंदा सपकाळ

वाहतुक-सुरक्षा

घाई गर्दी करु नका
वाहतुकीचे नियम मोडू नका।।

गर्दी हो या सर्दी
आज्ञा पाळा साब वर्दी।।

नको पैसे नको दंड
हवा शिस्तीचा माप दंड।।

वाहतूक सुरक्षेचा घ्या धडा
हेल्मेट वापरा-जीवन घडवा ।।

आर.टी.ओ हे मंदिर माना
सुरक्षित वाहतूक हेंच जीवन माना ।।

-गिरीजा पागनीस

सुरक्षित ड्रायव्हिंगचे दहा नियम

१. प्रवास सुरु करण्याअगोदर-ड्रायव्हिंग लायसन्स आपल्या जवळ आहे याची खात्री करा.
२. टायर मधील हवा, रेडीयेटर मधील पाण्याची तपासणी करा.
३. स्टेपनी, फॅन बेल्ट, होस पाईप, टुल बॉक्स गाडीमध्ये ठेवा.
४. सर्व लाईट व्यवस्थित काम करतात याची खात्री करा.
५. नंबर प्लेट स्वच्छ आणि व्यवस्थित दिसते याची खात्री करा.
६. सर्व खिडक्या साफ आहेत व त्यातून बाहेरचे स्पष्टपणे दिसते याची खात्री करा.
७. मागील वाहने पाहण्यासाठी असलेला आरसा व्यवस्थितपणे आहे याची खात्री करा.
८. सर्व दरवाजे व्यवस्थित बंद असल्याची खात्री करा.
९. कोणतीही वस्तू अगर जनावर गाडीच्या खाली नसल्याची व पुढील मार्ग मोकळा असल्याची खात्री करा.
१० गाडी सुरु झाल्यानंतर ब्रेक लावुन पहा

- ओमनी फीचर्स